

FOR FREE DISTRIBUTION

# सप्तरंग

## तृतीयपंथी व ट्रान्सजेंडर मुलामुलींच्या आत्मकथा

संकलन : बिंदुमाधव खिरे

# सप्तरंग

## तृतीयपंथी व ट्रान्सजेंडर मुलामुलींच्या आत्मकथा

FOR FREE DISTRIBUTION

संकलन : बिंदुमाधव खिरे

© या पुस्तकातील कोणताही मजकूर, कोणत्याही स्वरूपात वा माध्यमात पुन:प्रकाशित अथवा संग्रहित करण्यासाठी लेखक आणि प्रकाशक दोघांचीही लेखी पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे.

# तृतीयपंथी व ट्रान्सजेंडर मुलामुलींच्या आत्मकथा

संकलन : बिंदुमाधव खिरे

**प्रकाशक**
समपथिक ट्रस्ट
१००४, बुधवार पेठ, ऑफिस नंबर ९,
(विजय मारुती चौकाजवळ)
पुणे - ४११ ००२
फोन - (०२०) ६४१७९११२
E-mail : samapathik@hotmail.com

**डिटीपी आणि ले-आऊट**
चंद्रशेखर बेगमपुरे

**मुखपृष्ठ**
नीलम नागवेकर

आवृत्ती पहिली : एप्रिल २०१३

**किंमत : रु. १२५/-**

FOR FREE DISTRIBUTION

# तृतीयपंथी व ट्रान्सजेंडर
# मुलामुलींच्या आत्मकथा

## अनुक्रमणिका


| | | पान क्र. |
|---|---|---|
| सूची | – | ०४ |
| प्रस्तावना | – | ०५ |
| ऋणनिर्देश | – | ०८ |
| **भाग एक – माहिती** | | |
| (१) | प्राथमिक माहिती | १० |
| (२) | मुलाखत : डॉ. भूषण शुक्ल | २२ |
| (३) | लिंगबदल शस्त्रक्रिया (एसआरएस) | ३१ |
| (४) | कायदा | ३९ |
| **भाग दोन – 'F to M' आत्मकथा** | | |
| (१) | **सिद्धांत** (मुंबई) | ४३ |
| **भाग तीन – 'M to F' आत्मकथा** | | |
| (१) | **श्रेया** (यवतमाळ) | ५५ |
| (२) | **अबिना** (मुंबई) | ७४ |
| (३) | **पायल** (पुणे) | ८६ |
| (४) | **रूपाली** (सोलापूर) | ९७ |
| (५) | **बापी** (पुणे) | १०४ |
| (६) | **विद्या** (पुणे) | ११० |
| (७) | **संती** (पुणे) | ११८ |
| परिशिष्ट (अ) | – अधिक वाचन | १३२ |
| परिशिष्ट (ब) | – संस्था | १३३ |


FOR FREE DISTRIBUTION

# तृतीयपंथी व ट्रान्सजेंडर मुलामुलींच्या आत्मकथा

सूची

| | |
|---|---|
| **जेंडर आयडेंटिटी** | : लिंगभाव (व्यक्ती स्वत:ला मानसिकदृष्ट्या पुरुष समजते का स्त्री समजते तो त्या व्यक्तीचा लिंगभाव असतो.) |
| **'F to M' (Female to Male) ट्रान्सजेंडर (ट्रान्स/टीजी)** | : शरीराने स्त्री व पुरुषाचा लिंगभाव असलेली व्यक्ती |
| **'M to F' (Male to Female) ट्रान्सजेंडर (ट्रान्स/टीजी)** | : शरीराने पुरुष व स्त्रीचा लिंगभाव असलेली व्यक्ती |
| **एसआरएस** | : सेक्स रिअसाइनमेंट सर्जरी (लिंगबदल शस्त्रक्रिया) |
| **एमएसएम** (MSM) | : पुरुषांबरोबर लैंगिक संबंध करणारे पुरुष (Men who have Sex with Men) |
| **आउट** (Out) | : आपली लैंगिकता इतरांना सांगणे |
| **क्लोजेट** (Closet) | : आपली लैंगिकता इतरांपासून लपवणे |
| **रिसेप्टिव्ह जोडीदार/बॉटम** | : लैंगिक संबंधात स्त्रीची (स्वीकृत) भूमिका घेणारा जोडीदार |
| **इन्सर्टिव्ह जोडीदार/टॉप** | : लैंगिक संबंधात पुरुषाची भूमिका घेणारा जोडीदार |
| **होमोसेक्शुअल/गे** | : समलिंगी |
| **लेस्बियन** | : समलिंगी स्त्री |
| **बायसेक्शुअल** | : उभयलिंगी व्यक्ती |
| **हेटरोसेक्शुअल/स्ट्रेट** | : भिन्नलिंगी व्यक्ती |
| **होमोफोबिया** | : समलिंगी व्यक्तीची भीती व त्यातून उत्पन्न होणारा द्वेष |

FOR FREE DISTRIBUTION

# प्रस्तावना

मी बिंदुमाधव खिरे. पुण्यात एका मध्यमवर्गीय, सनातनी, धार्मिक कुटुंबात वाढलो. वयात आल्यावर मला पुरुषांबद्दल भावनिक व शारीरिक आकर्षण वाटू लागलं. स्त्रियांबद्दल अजिबात आकर्षण वाटत नव्हतं. (तेव्हा समलिंगी हा शब्द माहीत नव्हता.) इतर मित्रांसारखं मला स्त्रिया आवडत नाहीत, पुरुष आवडतात या गोष्टीचा मला खूप त्रास झाला. मी या इच्छांना पाप समजायचो. साहजिकच याचा माझ्या प्रतिमेवर, आकांक्षांवर परिणाम झाला. माझा आत्मविश्वास खचला. खूप नैराश्य आलं. आत्महत्या करावी असा विचार मनात आला. मी स्वत:चा द्वेष करू लागलो. एखादा बॉयफ्रेंड मिळवावा असं वाटायचं, पण ती इच्छा मनात येताच मी किती घाणेरडा आहे असा विचार मनात यायचा. पुढे स्त्रीशी लग्न झालं, वर्षात घटस्फोट झाला.

अंदाजे १९९८-१९९९मध्ये अमेरिकेत असताना (मी कम्प्युटर सायन्स इंजिनिअर होतो व काही वर्षे अमेरिकेत नोकरीसाठी होतो.) मी सॅन फ्रॅन्सिस्कोतील 'त्रिकोण' नावाच्या समलिंगी आधार संस्थेची मदत घेतली. मला या संस्थेत माझ्यासारखे अनेक भारतीय समलिंगी पुरुष भेटले. त्यांच्या सहवासात मी स्वत:ला स्वीकारायला लागलो. माझ्या मनावरचं ओझं उतरलं. माझ्यामध्ये कमालीचा फरक पडला. २०००च्या सुरुवातीला मी कायमचा पुण्यात आलो.

घरचे माझ्या दुसऱ्या लग्नाचा विचार करत होते. (तोवर घरच्यांना मी समलिंगी आहे हे माहीत नव्हतं.) मी पुण्यात आल्या आल्या त्यांना सत्य सांगितलं. त्यांना खूप धक्का बसला. वडिलांनी मी गेल्या जन्माचं पाप आहे असं स्पष्ट सांगितलं. आईनी साधू/बाबांची मदत घेतली. शेवटी मी आईला मानसोपचारतज्ज्ञांकडे घेऊन गेलो. त्यांनी तिची समजूत काढली, की माझ्यात काहीही दोष नाही. काही कमी नाही. तेव्हा हळूहळू मी बदलेन ही तिची आशा विरली. आता दुसरा पर्याय नाही, हे दिसल्यावर मला स्वीकारायचा ती प्रयत्न करू लागली. मी

FOR FREE DISTRIBUTION

आईवडिलांबरोबर राहत असलो तरी वडील मात्र माझ्याशी या विषयावर आजही काही बोलत नाहीत, पण मला विरोधही करत नाहीत.

पुण्यात आल्यावर काही काळानी मी नोकरी सोडली व सप्टेंबर २००२मध्ये 'समपथिक ट्रस्ट' ही समलिंगी, ट्रान्सजेंडर, तृतीयपंथी व इंटरसेक्स व्यक्तींसाठी संस्था सुरू केली. उद्दिष्ट होतं, की अशा लैंगिकता असलेल्या व्यक्तींसाठी एक 'ड्रॉप इन सेंटर' चालवावं, या विषयाची शास्त्रीय माहिती द्यावी. त्यांना आपली लैंगिकता स्वीकारण्यास मदत करावी. त्यांना अधिकारांची जाणीव करून द्यावी व आरोग्य आणि कायद्याच्या सुविधा पुरवाव्या.

हे काम करताना सातत्यानी जाणवत होतं, की या विषयांवर मराठी लिखाण फारच नगण्य आहे. म्हणून 'पार्टनर', 'इंद्रधनू- समलैंगिकतेचे विविध रंग', 'लैंगिक शिक्षण, एचआयव्ही/एड्स हेल्पलाइन मार्गदर्शिका', 'मानवी लैंगिकता- एक प्राथमिक ओळख', अशी पुस्तकं लिहिली. या वंचित समाजाबद्दल असलेला, अन्य समाजाच्या पूर्वग्रहदूषित दृष्टीत बदल यावा, या समाजाला त्यांचे अधिकार मिळून, त्यांना ताठ मानेनं समाजात वावरता यावं, या उद्देशानं ही पुस्तकं लिहिण्याचा खटाटोप केला.

FOR FREE DISTRIBUTION

११ डिसेंबर २०११ला पुण्यात पहिल्यांदा समलिंगी, ट्रान्सजेंडर, तृतीयपंथी, इंटरसेक्स यांचा 'अभिमान मोर्चा' काढला (प्राइड परेड). नंतर वाटू लागलं, की आता नुसतं पुणे, पीसीएमसी (पिंपरी-चिंचवड महानगरपालिका) एवढाच आवाका न ठेवता, महाराष्ट्रातील सर्व समलिंगी, ट्रान्सजेंडर, तृतीयपंथी, इन्टरसेक्स व्यक्तींसाठी काहीतरी करावं. तेव्हा विचार आला, की लोकं ज्या लैंगिक अल्पसंख्याक समाजाची थट्टा करतात, ज्यांचा द्वेष करतात, ज्यांना मुख्य प्रवाहातून बहिष्कृत करतात, त्यांची माणूस म्हणून ओळख समाजाला व्हावी या उद्देशानी चार पुस्तकांचं संकलन करायचा विचार केला.

- समलिंगी मुलामुलींच्या पालकांच्या आत्मकथा
- तृतीयपंथी व ट्रान्सजेंडर मुलामुलींच्या आत्मकथा

- समलिंगी व्यक्तींच्या आत्मकथा
- इन्टरसेक्स व्यक्तींच्या आत्मकथा

या शृंखलेतलं हे दुसरं पुस्तक.

**या पुस्तकाबद्दल –**

तृतीयपंथी या शब्दाची शास्त्रशुद्ध व्याख्या उपलब्ध नाही. तृतीयपंथी या शब्दाचा समाजाने लावलेला अर्थ म्हणजे– जो पुरुष पुर्णपणे पुरुषही नाही व पुर्णपणे स्त्रीही नाही. तृतीयपंथी हा शब्द समाज स्त्रीच्या वेशात राहणाऱ्या पुरुषांना वापरतो.

ढोबळ अर्थी 'M to F' ट्रान्सजेंडर व्यक्ती तृतीयपंथी या व्याख्येत मोडतात. समाजाच्या दृष्टीकोनातून 'F to M' ट्रान्सजेंडर व्यक्ती या व्याख्येत मोडत नाहीत. या पुस्तकात पहिली गोष्ट ही एका 'F to M' व्यक्तीची आत्मकथा आहे व बाकीच्या गोष्टी 'M to F' व्यक्तींच्या आत्मकथा आहेत.

ट्रान्सजेंडर या शब्दाला एक शास्त्रीय व्याख्या आहे म्हणून तृतीयपंथी ऐवजी ट्रान्सजेंडर शब्द वापरावा, पण या घडीला तरी बहुतांशी समाजाला ट्रान्सजेंडर हा शब्द माहीत नसल्यामुळे या दोन्ही शब्दांचा वापर पुस्तकाच्या शीर्षकात केला आहे.

समलिंगी, ट्रान्सजेंडर, इंटरसेक्स या सर्व लैंगिक अल्पसंख्याकांचा सप्तरंगाचा झेंडा (रेनबो फ्लॅग) आहे. हे रंग आमच्या आयुष्याचं वैविध्य दर्शवितात. म्हणून या पुस्तकाचं नाव 'सप्तरंग'.

**हे पुस्तक लिहिताना काही महत्त्वाच्या गोष्टी विचारात घेतल्या–**

- ज्यांना आपलं खरं नाव द्यायचं त्यांनी ते द्यावं व ज्यांना आपलं खरं नाव देणं शक्य नाही त्यांनी टोपण नावाने लिहावं असं ठरलं.
- लिहिणारी व्यक्ती निदान ५ वर्षं महाराष्ट्रात राहिलेली असावी, जेणेकरून महाराष्ट्रातील संस्कृतीची छाप तिच्या आत्मकथेत उतरली असेल.
- आत्मकथेत प्रामाणिकपणा अत्यंत महत्त्वाचा मानला गेला.

एप्रिल २०१३ **बिंदुमाधव खिरे**

FOR FREE DISTRIBUTION

# ऋणनिर्देश

या पुस्तकातील गोष्टी संकलित करण्यास अनेक जणांची मदत झाली. सर्वप्रथम ज्यांनी आपल्या आत्मकथा सांगितल्या/लिहून दिल्या त्यांचा मी मनापासून आभारी आहे.

डॉ. भूषण शुक्ल यांनी मला मुलाखत दिली. या कथांसाठी विविध तृतीयपंथी व ट्रान्सजेंडर मुलामुलींपर्यंत पोचायला मला 'पाथफाईंडर इंटरनॅशनल'चे डॉ. कांचन पवार, सुशील अहिरे, 'MSACS' चे केतन पवार, अवशरण मॅडम, 'AVERT'च्या अमिता अभिचंदानी, 'KHPT'चे डॉ. प्रशांत देशपांडे, 'निरामय आरोग्य धाम'च्या सीमा किणीकर, 'क्वीअर इंक'च्या शोभना कुमार यांनी मदत केली. अरविंद नारायण व डेव्हिड यांनी कायदेशीर बाबींवर मदत केली. पुस्तकाच्या इतर कामात मला विवेक तिगोटे, परीक्षित शेटे, रवींद्र निकाळजे (मनी), पायल यांनी मदत केली.

नीलम नागवेकर यांनी मुखपृष्ठ रेखीत केले. चंद्रशेखर बेगमपुरे यांनी पुस्तकाचा डीटीपी व ले-आऊट केला. माधुरी चव्हाण यांनी व्याकरण व शुद्धलेखन तपासले.

या उपक्रमात हमसफर ट्रस्टचे अशोक राव कवी व विवेक राज आनंद माझ्या पाठीशी उभे राहिले. मी या कामात व्यस्त असताना समपथिक ट्रस्ट (मी स्थापन केलेली संस्था) माझे प्रोजेक्ट डायरेक्टर टिनेश चोपडे यांनी समर्थपणे व मनापासून सांभाळली. या सर्वांचे आभार मानावे तेवढे थोडे आहेत.

FOR FREE DISTRIBUTION

*****

# भाग एक – माहिती

FOR FREE DISTRIBUTION

## भाग १- (१) प्राथमिक माहिती

तृतीयपंथी व ट्रान्सजेंडर या शब्दांचा अर्थ समजून घेण्यासाठी प्रथम लिंगभाव म्हणजे काय हे समजून घेणे गरजेचे आहे.

लिंगभावाची (जेंडर आयडेंटिटी) संकल्पना समजून घेण्यासाठी पहिल्यांदा 'स्त्री' व 'पुरुष' यांचे गुणधर्म व त्यांची विभागणी समजून घेऊ. हे लक्षात असू द्या, की लिंगभाव व लैंगिक कल (समलिंगी/भिन्नलिंगी/उभयलिंगी कल) हे दोन वेगळे पैलू आहेत. आपण लिंगभावाबद्दल बोलतो आहोत. समाजानं माणसांच्या अनेक महत्त्वाच्या गुणधर्मांची विभागणी 'पुरुषी' व 'बायकी' अशी केली आहे. ही विभागणी व त्याच्या मर्यादा समजून घेण्यासाठी काही मोजके गुणधर्म घेऊ- शृंगार, नाजूकपणा, भावनाप्रधान असणं, ताकद, आक्रमकता, लैंगिक आकर्षण, लैंगिक भूमिका. समाजानं या गुणधर्मांची विभागणी पुढीलप्रमाणे केली आहे.

FOR FREE DISTRIBUTION

| **पुरुषी** | **बायकी** |
|---|---|
| - | शृंगार |
| - | नाजूकपणा |
| - | भावनाप्रधान असणं |
| ताकद | - |
| आक्रमकपणा | - |
| स्त्रीबद्दल लैंगिक आकर्षण | पुरुषांबद्दल लैंगिक आकर्षण |
| 'इन्सर्टिव्ह' (पुरुषाची) लैंगिक भूमिका | 'रिसेप्टिव्ह'(स्वीकृत/स्त्रीची) लैंगिक भूमिका |

समाजाने केलेल्या या विभागणीत खूप मर्यादा आहेत. पहिली अशी, की या प्रत्येक गुणधर्मात वास्तवात अनेक छटा असतात. उदा.,

आक्रमकपणा. एखादी व्यक्ती आक्रमक आहे का? या प्रश्नाचं बरोबर उत्तर फक्त 'हो' किंवा 'नाही' एवढ्या दोनच पर्यायांत देणं अवघड होतं. जर- 'खूप आक्रमक', 'थोडा आक्रमकपणा', 'साधारण', 'थोडी शामळू', 'खूप शामळू' असे पर्याय दिले, तर या प्रश्नाचं उत्तर जास्त अचूक मिळू शकतं. फार थोड्या व्यक्ती पहिल्या (खूप आक्रमक) व शेवटच्या पर्यायात (खूप शामळू) बसतात. बहुतेक व्यक्ती या दोघांमधल्या छटांमध्ये बसतात. त्यामुळे अशा दोनच भागांत गुणधर्मांची केलेली विभागणी वास्तवाचं खरं प्रतिबिंब दाखवत नाही.

दुसरी मर्यादा येते ती म्हणजे पुरुषाशी जोडले गेलेले गुणधर्म स्त्रीमध्येही दिसू शकतात व स्त्रीला जोडलेले गुणधर्म पुरुषामध्येही दिसू शकतात. उदा.,१: 'भावनाप्रधान असणं' हा स्त्रीशी जोडलेला गुणधर्म असला तरी काही स्त्रिया फारशा भावनाप्रधान नसतात. तसंच पुरुष भावनाप्रधान नसतात हे म्हणणं चुकीचं होईल.

उदा.,२: 'ताकद'. पुरुष जास्त ताकदवान असतो व स्त्री कमी ताकदवान असते, या धारणेतून हा पुरुषी गुणधर्म मानला जातो, पण काही स्त्रिया नैसर्गिकदृष्ट्या खूप ताकदवान असतात. तसंच काही पुरुष नैसर्गिकदृष्ट्या नाजूक असतात.

या उदाहरणांतून दिसतं, की एक- प्रत्येक स्त्री व प्रत्येक पुरुषामध्ये विविध गुणधर्मांच्या विविध छटा असतात व दुसरं- काही 'पुरुषी' मानलेले गुण स्त्रियांमध्ये व 'बायकी' मानलेले गुण पुरुषांत निसर्गत: असू शकतात.

काही पुरुषांच्यात 'पुरुषी' मानल्या गेलेल्या सर्व गुणांचा खूप मोठ्या प्रमाणात समावेश दिसतो. उदा., खूप ताकदवान, खूप आक्रमक, इत्यादी. तसंच काही स्त्रियांमध्ये 'बायकी' मानल्या गेलेल्या सर्व गुणांचा खूप मोठ्या प्रमाणात समावेश दिसतो. उदा., खूप नाजूक, खूप हळव्या, इत्यादी. हे गुणधर्म पुरुषाचा व स्त्रीचा 'स्टीरिओटाइप' बनतात.

काही पुरुषांच्यात बायकी मानल्या गेलेल्या सर्व गुणांचा खूप मोठ्या प्रमाणात समावेश दिसतो. उदा., खूप नाजूक, खूप हळवा, पुरुषांबद्दल

FOR FREE DISTRIBUTION

लैंगिक आकर्षण, स्वीकृत लैंगिक भूमिका घेण्याची इच्छा इत्यादी. तसंच काही स्त्रियांमध्ये पुरुषी मानल्या गेलेल्या सर्व गुणांचा खूप मोठ्या प्रमाणात समावेश दिसतो. उदा., खूप ताकदवान, खूप आक्रमक, स्त्रियांबद्दल लैंगिक आकर्षण, इन्सर्टिव्ह लैंगिक भूमिका घेण्याची इच्छा, इत्यादी.


### लिंगभाव

अगदी ढोबळ अर्थी सांगायचं झालं तर आपण जग मुख्यत: स्त्री म्हणून अनुभवतो का पुरुष म्हणून अनुभवतो तो आपला लिंगभाव असतो. जसं प्रत्येकाचं एक शारीरिक लिंग असतं, तसंच प्रत्येकाचं एक मानसिक लिंग असतं ('सायकॉलॉजिकल सेक्स'). आपल्या मानसिक घडणीप्रमाणे प्रत्येक व्यक्ती स्वत:ला स्त्री किंवा पुरुष समजू लागते. प्रत्येक गुणधर्माच्या अनेक छटा असल्यामुळे अनेकांचा लिंगभाव पूर्णपणे पुरुषाचा किंवा पूर्णपणे स्त्रीचा नसतो. अगदी ढोबळपणे लिंगभावाचे गट पाडायचे झाले तर ते असे पडतील–

FOR FREE DISTRIBUTION

| शारीरिक लिंग | लिंगभाव |
|---|---|
| पुरुष | पुरुषी गुणधर्म |
| पुरुष | पुरुषी गुणधर्म जास्त, स्त्रीचे गुणधर्म कमी |
| पुरुष | पुरुषाचे व स्त्रीचे गुणधर्म समान |
| पुरुष | स्त्रीचे गुणधर्म जास्त, पुरुषाचे गुणधर्म कमी |
| पुरुष | स्त्रीचे गुणधर्म (M to F ट्रान्सजेंडर) |
| स्त्री | स्त्रीचे गुणधर्म |
| स्त्री | स्त्रीचे गुणधर्म जास्त, पुरुषाचे गुणधर्म कमी |
| स्त्री | स्त्रीचे व पुरुषाचे गुणधर्म समान |
| स्त्री | पुरुषाचे गुणधर्म जास्त, स्त्रीचे गुणधर्म कमी |
| स्त्री | पुरुषाचे गुणधर्म (F to M ट्रान्सजेंडर) |

**लिंगभावाच्या छटा**




## ट्रान्सव्हेस्टाइट्स

असं दिसतं, की ट्रान्सव्हेस्टाइट्स बहुतांशी वेळा भिन्नलिंगी लैंगिक कलाचे पुरुष असतात व त्यांचा लिंगभाव प्रामुख्याने पुरुषाचा असतो. अधूनमधून या पुरुषांना स्त्रीचे कपडे घालायला आवडतात. अधूनमधून स्त्रीसारखी वेशभूषा करण्याची आवड एवढी एकच स्त्री लिंगभावाची छटा यांच्यात दिसते.

FOR FREE DISTRIBUTION

## ट्रान्सजेंडर

ज्या व्यक्तीचं शारीरिक लिंग एक आहे पण त्याचा लिंगभाव विरुद्ध लिंगाचा आहे अशांना ट्रान्सजेंडर म्हणतात.

बहुतेक वेळा मुलगा मोठा होताना त्याला आपण मुलगा आहोत असं वाटतं आणि त्याच नजरेनं तो जगाकडे बघतो. काहींच्या बाबतीत मात्र असं नसतं. काही मुलांना लहानाचं मोठं होताना सातत्यानं वाटतं, की ते मुलगी आहेत. याचा अर्थ असा, की काही मुलांची नैसर्गिक घडण अशी होते, की त्यांचं शरीर मुलाचं असतं (लिंग, वृषण इत्यादी.) पण मानसिक घडण (लिंगभाव) मुलीची असते. म्हणजे ते मुलीच्या दृष्टीनं जग बघतात व अनुभवतात. यांना 'M to F' (पुरुष–›स्त्री) ट्रान्सजेंडर (टीजी) म्हणतात.

या गटातील पुरुष शरीरानं पुरुष असतो. म्हणजे त्याला लिंग व वृषण

असतात. वयात आल्यावर लैंगिक इच्छा झाली, की लिंगाला उत्तेजना येते. म्हणजे शारीरिकदृष्ट्या तो इतर पुरुषांसारखा असतो पण मानसिक दृष्ट्या त्याचं भावविश्व स्त्री सारखं असतं.

काहींना मुलींसारखा पेहराव आवडतो. काहींचं चालणं-बोलणं बायकी असतं. पण हे सर्वांच्याच बाबतीत खरं असतं असं नाही. याला अपवादही असतात. म्हणून हा 'स्टीरिओटाइप' म्हणून मानला जाऊ नये. साहजिकच हे अपवाद आपल्या सहजपणे नजरेस येत नाहीत. माझी एक मैत्रीण जन्मानं मुलगा होती. आता लिंग बदलाची शस्त्रक्रिया करून ती स्त्री बनली आहे. शस्त्रक्रिया करण्याअगोदर त्याच्या शारीरिक ठेवणीवरून, पेहराव, आवाज, वागणुकीवरून त्याचा लिंगभाव 'स्त्री'चा आहे असं कोणीच ओळखलं नसतं. शर्ट-पँटमध्ये असायचा. त्याच्या बोलण्यात, वागण्यात तो स्वत:ला 'स्त्री' मानतो हे कळायला कोणतीही बाह्य लक्षणं नव्हती. त्यानी जेव्हा त्याचा लिंगभाव माझ्यापाशी व्यक्त केला तेव्हा मला कळलं, नाहीतर मला कळायला काहीही मार्ग नव्हता.

FOR FREE DISTRIBUTION

असं वेगळेपण काही मुलींमध्येही दिसतं. एखादी मुलगी लहानाची मोठी होताना स्वत:ला मुलगा समजायला लागते. याचा अर्थ असा, की काही मुलींची नैसर्गिक घडण अशी होते, की शरीर मुलीचं असतं पण मानसिक घडण (लिंगभाव) मुलाची असते. म्हणजे ती मुलाच्या दृष्टीनं जग बघते व अनुभवते. यांना 'F to M' (स्त्री—>पुरुष) ट्रान्सजेंडर (टीजी) म्हणतात.

या स्त्रिया शरीरानं स्त्री असतात. म्हणजे त्यांना भगोष्ठ, शिस्निका, योनी, गर्भाशय, स्त्रीबीजांड, स्त्रीबीजवाहिन्या हे सर्व अवयव असतात. हे सर्व अवयव कार्यशील असतात. वयात आल्यावर या स्त्रियांना मासिक पाळी येते. म्हणजे शारीरिकदृष्ट्या त्या इतर स्त्रियांसारख्या असतात पण मानसिकदृष्ट्या मात्र त्यांचं भावविश्व पुरुषासारखं असतं.

काहींना मुलांसारखा पेहराव आवडतो, पुरुषी खेळ खेळायला आवडतात इत्यादी. याबाबतीतही दिसण्यावर काही नसतं. काही मुली

दिसायला अत्यंत नाजूक असतात आणि दिसण्यावरून त्या स्वत:ला पुरुष मानतात हे कळायला काहीही मार्ग नसतो.

प्रत्येकाचा लिंगभाव नैसर्गिक आहे. तो शिकून-शिकवून घडत नाही. मुलांना/मुलींना तुम्ही लहानपणी कसं वाढवता यावरून तो शिकला जात नाही. उदा., लहानपणी मुलाला मुलीचे कपडे घातले, की त्यामुळे त्याचा लिंगभाव मुलीचा होत नाही. तसंच कुणाचं अनुकरण करूनही तो बदलत नाही. उदा., एखादा मुलगा मुलींमध्ये वाढला तर त्या मुलाचं चालणं, बोलणं बायकी होऊ शकतं; पण म्हणून त्याचा लिंगभाव मुलीचा होत नाही. तो स्वत:ला मुलगी समजायला लागत नाही. म्हणजेच लिंगभाव हा शिकून येत नाही. तो पोहऱ्यात यायला आडात असावा लागतो. मारहाण करून किंवा कोणत्याही वैद्यकीय उपायांनी लिंगभाव बदलता येत नाही. जो लिंगभाव आहे तो स्वीकारणं हेच सर्वांच्या हिताचं असतं.

**सावधान-** बहुतेक लहान मुलं भातुकली खेळतात, साडी नेसतात, लिपस्टिक लावतात. याचा अर्थ त्यांचा लिंगभाव मुलीचा आहे असं अजिबात समजू नये. गंमत म्हणून, कुतूहलापोटी मुलं/मुली हे सगळे खेळ खेळतात म्हणून त्याच्यात जास्त काही शोधण्याचा प्रयास केला जाऊ नये. तसंच काही मुलींना मोठं होताना, समाजात स्त्रियांना कनिष्ठ स्थान असल्यामुळे, 'मी मुलगा का झाले नाही' असं वाटतं. तारुण्यात काहीजणी पुरुषी पेहराव करणं, केस कमी ठेवणं अशा गोष्टी करतात. अनेकांसाठी ही एक 'पासिंग फेज' असते, तर काहींमध्ये या पेहरावातून मुलांना असलेल्या संधी, स्वातंत्र्य उपभोगायची इच्छा व्यक्त होते. याचा अर्थ, त्यांच्या दिसण्यावरून त्यांचा लिंगभाव पुरुषाचा आहे हा तर्क काढणं चुकीचं होईल.

FOR FREE DISTRIBUTION

### समलिंगी व ट्रान्सजेंडर यांच्यातला फरक

समलिंगी पुरुष शरीराने पुरुष असतो व त्याला पुरुषांबद्दल भावनिक व लैंगिक आकर्षण वाटतं. त्याचा लिंगभाव पुरुषाचा असतो.

‘M to F’ ट्रान्सजेंडर शरीराने पुरुष (जर एसआरएस केली नसेल तर), पण त्या व्यक्तीचा लिंगभाव स्त्रीचा असतो.

समलिंगी स्त्री ही शरीराने स्त्री असते. तीला स्त्रीयांबद्दल भावनिक व लैंगिक आकर्षण वाटतं. तीचा लिंगभाव स्त्रीचा असतो.

‘F to M’ ट्रान्सजेंडर शरीराने स्त्री (जर एसआरएस केली नसेल तर), पण त्या व्यक्तीचा लिंगभाव पुरुषाचा असतो.

ट्रान्सजेंडर व्यक्तीला भावनिक व लैंगिक आकर्षण कोणाबद्दल असतं? ते व्यक्तीनुसार वेगळं असू शकतं– म्हणजे काहींना पुरुषांबद्दल, काहींना स्त्रीयांबद्दल व काहींना दोघांबद्दल.

**समाजाची दृष्टी**

जर मुलगा मुलीसारखं वागायला लागला तर घरच्यांचा रोष त्याच्यावर ओढवतो. हे वेगळेपण बघून घरच्यांना घाबरायला होतं. त्यांच्या मनात समाजाची भीती असते. या भीतीचं रूपांतर रागात होतं आणि मग मारहाण करणं, घरातून काढून टाकणं असे प्रकार सर्रास घडतात. काही पालक मुलाला मानसोपचारतज्ज्ञांकडे घेऊन जातात. ‘आमच्या पोराला ठीक करा’ म्हणतात. अनेक मानसोपचारतज्ज्ञांना या विषयाची फारशी माहिती नसल्यामुळे ते अशा मुलांना बदलायचा प्रयत्न करतात. अर्थातच कोणत्याही प्रयत्नांनी मुलाचा लिंगभाव बदलत नाही.

FOR FREE DISTRIBUTION

मुलाचं बायकी वागणं बघून शाळा–कॉलेजमध्ये चेष्टा होऊ लागते. अनेकांना रॅगिंगला तोंड द्यावं लागतं. अशा अनेक मुलांचं लैंगिक शोषण होतं. माझ्यासमोर अशी अनेक उदाहरणं आली आहेत. समाज चुकीचा अर्थ काढतो, की त्या मुलाचं लैंगिक शोषण झालं म्हणून तो ‘तसा’ झाला. समाज असा विचार करत नाही, की जर तो मुलगा बुजरा असेल, नाजूक असेल, बायकी असेल, तर त्याचं लैंगिक शोषण होण्याची शक्यता जास्त असते.

अशा वातावरणात वाढताना अनेकांना खूप नैराश्य येतं. विशेषत: ज्याच्या वेगळ्या लिंगभावाचे गुणधर्म समाजाच्या लगेच लक्षात येतात.

आपण असे आहोत म्हणून स्वत:बद्दल द्वेष वाटायला लागतो. या द्वेषातून काहींची वृत्ती विध्वंसक बनते. घराबाहेर पडलं, की समाजाची कुचकट नजर सारखी झोंबत राहते. यामुळे स्वत:बद्दल अजून घृणा वाढते.

वयात आल्यावर काहींच्या बाबतीत एक महत्त्वाची गोष्ट घडते. ती म्हणजे अनेक पुरुष अशा बायकी मुलांकडे आकर्षित होतात. इतर वेळी त्रास देणारे, कुचकटपणे बोलणारे परके पुरुष लैंगिक सुखासाठी ओळख काढू लागतात. खायला, प्यायला घालतात. नवीन कपडे भेट देतात. याच्यामुळे स्वत:कडे बघायची दृष्टी बदलते. आत्तापर्यंत आपल्यात एकही चांगला गुण नाही, अशा रसातळाला गेलेल्या स्वप्रतिमेला एक आशेचा किरण दिसतो व तो म्हणजे– आपण इतर पुरुषांसाठी लैंगिक उपभोग्य वस्तू बनून त्यांचा स्वीकार मिळवणं, आपलं 'बाईलपण' सिद्ध करणं. म्हणून मग इतर पुरुषांचं लक्ष जावं म्हणून सुंदर किंवा भडक दिसण्यावर, लोकांचं लक्ष जाईल असं वर्तन करण्यावर, अश्लील हावभाव करण्यावर भर दिला जातो व समाजाच्या संगनमतानं लैंगिक उपभोग्य वस्तू म्हणून प्रतिमा बनते.

FOR FREE DISTRIBUTION

**हिजडा समाज**

हिजडा समाज हा मुख्यत: 'M to F' ट्रान्सजेंडर व्यक्तींचा समाज आहे.

ट्रान्सजेंडर व्यक्तींबद्दलची वैद्यकीय माहिती भारतीय समाजाला खूप नवीन आहे. आपल्या समाजात पूर्वीपासून अशा पुरुषांसाठी एक वेगळी व्यवस्था विकसित झाली, ती म्हणजे हिजडा समाज. या समाजाचा एक वेगळा समूह म्हणून कशी स्थापना झाली, त्यांची घराणी, त्यांचे रितीरिवाज, त्यांची स्वतंत्र भाषा कशी बनली व बदलत गेली, हे कळणं अवघड आहे.

काही 'M to F' व्यक्ती हिजडा समाजाचा भाग बनतात तर काहीजण हिजडा समाजात जात नाहीत. ते स्त्री म्हणून सर्वसामान्य प्रवाहात

मिसळतात.

ज्यांना हिजडा समाजाचा भाग बनावंसं वाटतं त्यांना या समाजाचा सदस्य बनावं लागतं. याला 'रित' घेणं म्हणतात. हिजडा समाजाचा सदस्य असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या नावाने रित टाकता येते. रित टाकल्यावर ती व्यक्ती गुरू बनते व रित टाकलेला चेला बनतो.

हिजडा समाजात रित घेऊन दोन गोष्टी साध्य होतात. पुरुषांनी स्त्री सारखं राहणं समाजाला मान्य नसल्यामुळे हा एकच मार्ग समोर उरतो, ज्यातून तो पुरुष स्त्री म्हणून जगू शकतो. दुसरी गोष्ट, काही ट्रान्सजेंडर बायकी असतात, फारसे शिकलेले नसतात, आर्थिकदृष्ट्या खूप कमकुवत असतात. उदरनिर्वाहाचं साधन म्हणून हिजड्यांबरोबर नाचून, 'मंगती' करून (ढोबळअर्थी- लोकांकडून पैसे मागणं) पैसे मिळवता येतात. या मार्गाने स्त्री म्हणून राहायची आतून येणारी गरज पूर्ण होते व पैसेही मिळतात. हिजडा समाजात आपल्यासारखे इतरजण भेटल्यामुळे समाजानं वाळीत टाकलेल्या ट्रान्सजेंडर्सना इथे आधार मिळतो.

हिजडा समाज हा मुस्लिम धर्माकडे झुकणारा असतो. प्रत्येक नायक हजला जाऊन आलेला असतो. त्यांच्या कार्यालयात (दैयार) स्त्रीनं किंवा हिजड्यानं टिकली, कुंकू लावून गेलेलं चालत नाही. गुरू व चेल्यांच्या घरात मात्र विविध धर्मांच्या प्रथा पाळलेल्या दिसतात. काही हिजडे इतर देवदेवतांची आराधना करतात. उदा., मुर्गी माता (गुजरातमधील बेथरामची देवी).

**जीवनशैली**

काही हिजडे शर्ट-पँटवर राहतात (खड्यावर राहणं) व काही साडीवर राहतात (साटल्यावर राहणं). काहीजणांच्या घरी आपल्या मुलानी हिजड्यात रित घेतली आहे हे माहीत नसतं. समाजाच्या दबावापोटी काही हिजडे स्त्रीबरोबर लग्न करतात, काहींना मुलंबाळं असतात. काहीजणांनी संसार करून मूलबाळ झालं, की मग हिजड्यात रित घेतलेली असते.

FOR FREE DISTRIBUTION

हिजडा समाजात जवळपास सर्वजण ट्रान्सजेंडर असल्यामुळे यातील काहीजण लिंग व वृषण काढायची शस्त्रक्रिया करून घेतात. पूर्वी हे खच्चीकरण हिजडेच करायचे. हे करताना जिवाला धोका असायचा. आता बहुतेकजण डॉक्टरांकडे जाऊन ही शस्त्रक्रिया करतात. लिंग व वृषण काढून टाकलेल्या हिजड्यांना 'निर्वाण' हिजडे म्हणतात. निर्वाण हिजड्याला लिंगाच्या जागी लघवी करण्यासाठी एक छिद्र असतं. काहीजण लिंग व वृषण काढून योनी तयार करून घेतात. ज्या हिजड्यांनी आपलं वृषण व लिंग ठेवलं आहे अशांना 'आखवा' हिजडे म्हणतात. 'आखवा' हिजड्यांपेक्षा 'निर्वाण' हिजडे जास्त श्रेष्ठ समजले जातात.

उदरनिर्वाहाचं साधन म्हणून काही हिजडे फक्त 'मंगती' करतात. काहीजण फक्त 'ढोलक बधाई'ला जातात (मूल जन्माला आलं, की बारशाच्या वेळी कार्यक्रमात नाचणं, बाळाला आशीर्वाद देणं). काहीजण 'बिडे-बयाने' करतात (काही मुस्लिम लोक लग्न ठरलं, की हिजड्यांना नाचायला बोलवतात. हिजडे नाचतात, होणाऱ्या नवरदेवाला आशीर्वाद देतात). काहीजण चोऱ्यामाऱ्या करतात. काहीजण वेश्याव्यवसाय करतात. मुख्य सामाजिक प्रवाहापासून हा समाज पूर्णपणे वेगळा पडल्यामुळे त्यांना लैंगिक आरोग्याबद्दल फारशी माहिती नसते. असुरक्षित संभोगाचे धोके माहीत नसल्यामुळे काहीजण एचआयव्ही संसर्गित होतात.

FOR FREE DISTRIBUTION

हल्ली काही पुरुष ते हिजडे नसूनसुद्धा पैसे कमवण्यासाठी म्हणून साडी घालून आपण हिजडे आहोत असं ढोंग करून 'मंगती' करताना दिसतात. यांना 'बहुरूपी' म्हणतात. हे जर हिजड्यांच्या हाती लागले तर यांना बेदम मार खावा लागतो, कारण यांच्या मंगतीनं हिजड्यांच्या पोटावर पाय येतो.

**हिजडा बनण्यास जबरदस्ती होते का?**

''लहान बाळाच्या जननेंद्रियांमध्ये खूप वेगळेपण असलं, तो मुलगा

आहे, की मुलगी आहे हे समजण्यास अवघड असेल, तर हिजडे अशा मुलाला जबरदस्तीनं घेऊन जातात हे खरं आहे का?'' व ''मुलांना पळवून त्यांचं जबरदस्तीनं खच्चीकरण केलं जातं हे खरंय का?'' असे प्रश्न मला अनेक वेळा विचारले जातात. माझ्या अनेक वर्षांच्या पुण्यातल्या कामात मला असं एकही उदाहरण दिसलं नाही (क्वचित असं उदाहरण इतरत्र घडलं असेल). मला जे दिसलं ते असं- तारुण्यात काही ट्रान्सजेंडर मुलं, जी कमी शिकलेली आहेत, गरीब आहेत, बायकी आहेत ती आपणहून रित टाकतात. त्यात लैंगिकतेचा भाग असतो व अनेक वेळा आर्थिक गणितही असतं. नायकांची/गुरूंची सत्ता, त्यांचा पैसा, त्यांची भडक जीवनशैली भुरळ घालते. त्याचबरोबर आपलाही एक समाज आहे, या समाजाची एक संस्कृती आहे. यात आपण रित टाकली तर आपण यात सामावले जाऊ ही तळमळ असते. रित घेण्यासाठी धमकावणी, जबरदस्ती नसते. एखादी व्यक्ती ट्रान्सजेंडर आहे असं वाटलं तर मात्र त्या व्यक्तीने आपल्याच नावावर रित टाकावी म्हणून काही हिजडे त्या व्यक्तीवर दबाव आणतात.

यातले काहीजण कालांतरानं खच्चीकरण करण्यासाठी पैसे साठवू लागतात. जबरदस्तीनं खच्चीकरण होण्याचं एकही उदाहरण माझ्या कामात मी पुण्यात पाहिलेलं नाही (अपवादात्मक असं उदाहरण इतरत्र घडलं असेल). कोणीतरी आपणहून स्वखुशीनं हिजड्यात रित टाकतं, खच्चीकरण करतं, हे समजायला लोकांना खूप जड जातं.

FOR FREE DISTRIBUTION

**जोगते**

जोगता/जोगती म्हणजे देवीला वाहिलेला पुरुष/स्त्री. महाराष्ट्रात जोगत्यांची अनेक घराणी आहेत. जोगते हे हिंदू धर्माकडे झुकलेले असतात. हिजड्यांसारखे यांच्यातही नायक, गुरू व चेले असतात. जोगत्यांमध्ये एका व्यक्तीचे एकाच वेळी जास्तीत जास्त सात गुरू असू शकतात.

जोगत्यांमध्ये काहीजण भिन्नलिंगी पुरुष/स्त्रिया असतात. काहीजण

ट्रान्सजेंडर्स असतात. अनेकजण लग्न करून संसार करतात. काहीजणांच्या घरात देवाची परडी असते तर काहींना लहानपणीच मोती घालून जोगतेपणाचा वारसा चालवला जातो. जोगत्यांमध्ये निर्वाणी करणं निषिद्ध आहे.

जोगत्यांच्या गळ्यात पाच मोत्यांची माळ असते ज्याला 'दर्शन' म्हणतात. जोगत्यांची देवी म्हणजे सौंदत्तीची यल्लमा. जोगते देवीची परडी घेऊन पैसे मागतात किंवा 'देवऋषीपण' करतात. काही जोगते शर्ट-पँटवर राहतात तर काही साडी घालतात. काही जोगते वेश्याव्यवसाय करतात.

**आराधी**

आराधी म्हणजे देवीला वाहिलेला पुरुष. त्याला परडी व कवड्यांची माळ देतात. बाळ-आराधी कधीच लग्न करत नाहीत. काही आराधी लग्न करतात. काही आराधी 'M to F' ट्रान्सजेंडर असतात.

**उदरनिर्वाहाची पर्यायी साधने**

पूर्वी उदरनिर्वाहाची साधने नसल्यामुळे हिजड्यांना 'मंगती' करणे, बिडे-बयाने करणे, वेश्याव्यवसाय करणे हेच कमवायचे मार्ग होते. आता जसजशा सामाजिक संस्था या विषयात काम करू लागल्या आहेत, तसतशा 'M to F' ट्रान्सजेंडर्सनी मुख्य प्रवाहात येऊन कौशल्य शिकून काम करावे, यासाठी या संस्था प्रयत्नशील आहेत. निश्चितच हे बदल घडायला वेळ लागणार, पण या समाजाला मुख्य प्रवाहापासून वेगळे ठेवणे कोणाच्याच हिताचे नाही, म्हणून हे प्रयत्न चालू ठेवणे गरजेचे आहे.

*****

FOR FREE DISTRIBUTION

**डॉ. भूषण शुक्ल** (MD, DNB, FRCH Psychiatry)

• डॉ. भूषण शुक्ल हे एक नामवंत मानसोपचारतज्ज्ञ आहेत. लैंगिकतेच्या विषयावर त्यांनी गेली पंधरा वर्षं काम केलं आहे. चार वर्षं त्यांनी इंग्लंडमध्ये एन.एच.एस. (नॅशनल हेल्थ सर्व्हिस)मध्ये काम केलं. २००८ पासून ते पुण्यात प्रॅक्टिस करत आहेत.

• **लैंगिकतेची प्राथमिक जाण याबद्दल थोडं सांगा.**

सर्वांनी लक्षात ठेवायची गोष्ट म्हणजे तुमचा लैंगिकतेचा जो भाग आहे त्याच्याशी कोणाचा काही संबंध नाही. ती निर्माण करण्यात पालकांचा (किंवा इतर कोणाचा) हात नाही. हे खरं आहे, की तुमची लैंगिकता तुमच्यासाठी खूप अडचणीची असू शकते, गैरसोईची असू शकते, पण तरीसुद्धा त्याबद्दल तुम्ही काहीही करू शकत नाही.

FOR FREE DISTRIBUTION

प्रत्येकाची लैंगिकता ही चार भागांत विभागली जाऊ शकते. हे समजावं म्हणून मी खूप सोपं करून सांगतोय पण शास्त्रीयदृष्ट्या ते पूर्ण सत्य आहे, असं मी म्हणत नाही.

(१) मुलाचे/मुलीचे 'गोनॅड्स'- शरीरात वृषण आहेत की स्त्रीबीजांडं आहेत व ती कशी काम करतात, याला आपण 'गोनॅड पातळी' म्हणूयात.

(२) मुलाची/मुलीची बाह्य जननेंद्रियं. याला आपण शारीरिक पातळी म्हणूयात.

(३) त्या मुलाचा/मुलीचा लिंगभाव काय आहे? म्हणजे तरुणपणी ते स्वत:ला मुलगा की मुलगी समजतात. ही तिसरी पातळी म्हणूयात.

(४) वयात आल्यावर त्या मुलाला/मुलीला कोणत्या लिंगाच्या व्यक्तीबद्दल लैंगिक आकर्षण वाटतं. (स्त्री? पुरुष? का दोन्ही लिंगाच्या

व्यक्तींबद्दल लैंगिक आकर्षण वाटतं?) ही चौथी पातळी.

या चारही पातळ्यांचा एकमेकांशी काहीही संबंध नाही. ८०% लोकांमध्ये या सर्व पातळ्यांमध्ये एकसंधपणा (काँग्रुअन्स) असतो. म्हणजे त्या मुलाची/मुलीची गुणसूत्रं, जननेंद्रिय, लिंगभाव व लैंगिक कल यांच्यात एकसंधपणा असतो. या एकसंधपणाला पुरुष किंवा स्त्री हे सर्वसाधारणपणे नाव दिले गेले आहे. पण या सगळ्यांमध्ये इतक्या छटा आहेत, की हे सर्व बऱ्याचदा सामान्य माणसाच्या तर सोडाच अनेक डॉक्टरांच्या समजेच्या पलीकडचं आहे. थोडक्यात सांगायचं तर यातलं आपल्याला फार कळतं असा आव खरंच कोणी आणू नये.

- **अनेक ट्रान्सजेंडर मुलामुलींमध्ये अगदी लहानपणापासून वेगळेपण दिसायला लागते त्याबद्दल थोडं सांगा.**

इथे गोंधळ असा आहे, की नक्की या गोष्टी कोणत्या वयात दिसायला लागतात आणि पुढे जाऊन या गोष्टींचं काय होतं? कितव्या वर्षी होतं? याबद्दल आपल्याला काहीही माहीत नाही. म्हणजे ती व्यक्ती जोवर १८-२० वर्षांची होत नाही, तोवर त्या व्यक्तीला स्वत:ची ओळख होऊ लागत नाही. जे आता जाणवते आहे ते समोरच्या माणसाला व्यक्त करायची प्रगल्भता येत नाही. जोवर त्या व्यक्तींचा तेवढा 'कॉग्निटिव्ह' आणि 'इमोशनल इंटेलिजन्स' वाढत नाही तोवर हे पैलू काय आहेत हे समजणं अवघड असतं.

FOR FREE DISTRIBUTION

तेव्हा लगेच हात धुऊन त्यांच्यामागे लागणे आणि या सर्व हावभावांचे नामोनिशाण मिटवण्याचा प्रयत्न करणे, असे करू नये. कारण ते मूल खरंच टीजी असेल तर तुम्ही आता काय वाटेल ते करा, काहीही फरक पडणार नाही आणि मूलही पूर्णपणे घाबरून जाईल, ट्रॉमाटाइज होईल आणि हे मूल जर टीजी नसेल तरीही पूर्णपणे घाबरून जाईल. म्हणजे सेक्शुॲलिटी काहीही करून बदलता येते आणि लहानपणापासून आपण प्रयत्न केले तर ती बदलता येईल हा समज

चुकीचा आहे. या गैरसमजुतीतून अतिरेकी आणि काहीवेळा अत्यंत क्रूर वागणूक अशा मुलांना मिळते.

१८–२० वर्षांचा झाल्यावर टीजींनी या विषयावर काम करणाऱ्या चांगल्या संस्थांशी संपर्क साधावा व त्यांच्याकडून सर्व माहिती मिळवावी. आपल्यासारख्यांचे अनुभव ऐकावे. जर काही तपासण्या करून घ्यायच्या असतील तर त्या कराव्यात. टीजी ग्रुप असतील तर ग्रुप मीटिंग्जना जावे. आता इंटरनेट आहे, त्याचा आधार घ्यावा. या विषयावरची माहिती मिळवावी. डॉक्टरांच्याकडे जावे असा ढोबळ सल्ला मी देणार नाही, कारण खेदाची गोष्ट अशी, की अनेक डॉक्टर याबाबतीत खूप अज्ञानी आहेत.

- **औषधोपचार, समुपदेशन, धाक, शिक्षा या मार्गांनी लिंगभाव बदलता येते का ?**

FOR FREE DISTRIBUTION

मुलाचा/मुलीचा लिंगभाव बदलता येत नाही. असे बदल करायच्या प्रयत्नांनी काहीही साध्य होत नाही. काहीजणांमध्ये असा समज आहे, की कालांतराने लिंगभाव बदलू शकतो किंवा आपोआप बदलतो. एक लक्षात ठेवा, की जसजसं वय वाढतं तसतशा लैंगिक आवडी बदलतात, लैंगिक सुखाच्या संकल्पना बदलतात. लैंगिकता खूप बदलणारी (डायनॅमिक/फ्लुइड) गोष्ट आहे. दहा वर्षांपूर्वी तुमची जी लैंगिकता होती तीच आज आहे असा कोणताही माणूस नाही. तसं कोणी असेल तर तो अत्यंत दयनीय स्थितीत जगत आहे. ही इज लिव्हिंग अ व्हेरी पथेटिक लाइफ. इथे लक्षात घ्या, की 'फ्लुइड' आहे याचा अर्थ प्रत्येक गोष्ट बदलता येते असं नाही. 'फ्लुइड' म्हणजे ती नदीसारखी 'फ्लुइड' आहे म्हणजे त्यातील पाणी बदलते, त्यातील मासे बदलतात, पाणी कमीजास्त होते, वेग कमीजास्त होऊ शकतो पण याचा अर्थ तिचा इकडचा काठ तिकडे आणि तिकडचा काठ इकडे होत नाही आणि ती क्षणात इथून उठून ५ किमी. दूर जात नाही. नदीचा समुद्र होत नाही.

- **आमच्यामुळे असे मूल झाले का ?**

अनेक पालकांना असे वाटते, की आमच्यामुळे असे मूल झाले का? तर याचे उत्तर स्पष्टपणे 'नाही' असे आहे. आईवडिलांनी मुलामुलींना कसे वाढवले याचा त्यांच्या मुलामुलींच्या लैंगिकतेशी काहीही संबंध नाही.

मला अनेक पालक विचारतात, की आम्ही या मुलांची/मुलींची लैंगिकता बदलण्यासाठी काय करू शकतो? याचेही उत्तर 'काहीही नाही' असे आहे. म्हणजे आईवडिलांना वाटते, की त्यांच्या मुलामुलींच्या घडणीवर त्यांचा खूप मोठा प्रभाव असतो. असे त्यांना वाटत असले तरी हा प्रभाव लैंगिकतेच्या बाबतीत (वरील दिलेल्या पैलूंमध्ये) काहीही नसतो.

याच्यापुढे जाऊन मी असे म्हणेन, की अल्पसंख्याक म्हणून मानल्या गेलेल्या ज्या लैंगिकता आहेत त्या खूप 'बायोलॉजिकली ड्रिव्हन' आहेत आणि त्यांचा बाहेरच्या जगाशी फारसा काही संबंध नाही, हे वारंवार शास्त्रीयदृष्ट्या सिद्ध झालेले आहे. ही गोष्ट आईवडिलांनी लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यांना आपल्या मुलामुलींच्या लैंगिकतेचे वाईट वाटणे, त्याचे दु:ख होणे, हे मूल चारचौघांसारखे नाही, याचा त्रास होणे साहजिक आहे, स्वाभाविक आहे आणि त्याच्याबद्दल माझी पूर्ण सहानुभूती आहे. पण हे माझ्यामुळे झाले आणि काहीतरी करून याच्यात आपण बदल घडवून आणू शकतो ही गोष्ट खरी नाही.

FOR FREE DISTRIBUTION

- **या सनातनी समाजात पालकांच्या काय मर्यादा आहेत ?**

मानसोपचारतज्ज्ञ म्हणून प्रॅक्टिस करताना मला नेहमी जाणवतं, की अनेक पालक त्यांच्या प्रकारे (विशेषत: आई) मुलाला/मुलीला समजून घ्यायचा प्रयत्न करतात, सांभाळून घेण्याचा प्रयत्न करतात. अशा वेळी

असे दिसते, की काही मुलांची पालकांकडून अवास्तव अपेक्षा असते. आईवडिलांना ही सर्व गोष्ट समजणे खूप अवघड जाते, कारण ते या मुलांच्या/मुलींच्या तीन पिढ्या मागे आहेत. एक पिढी ७-१० वर्षांची मानली तर ही मुले तीन पिढ्या पुढे असतात. या मुलांपेक्षा तीन पिढ्या मागे असणाऱ्या पिढीला ही लैंगिकतेची संकल्पना पूर्णपणे समजावी ही अपेक्षा रास्त नाही. प्रगल्भता आली, की तुम्हाला हे लक्षात येईल, की कोणीही दुसऱ्याला पूर्णपणे समजू शकत नाही. आईवडिलांनी आपल्याला स्वीकारावं ही एक गोष्ट, पण आपल्याला पूर्णपणे समजून घ्यावं हा अट्टहास आततायी आहे.

दुसरी गोष्ट उपस्थित होते ती म्हणजे काही मुले म्हणतात, ''जर पालकांनी आम्हाला स्वीकारलं तर आता आम्ही जसं हवं तसं वागू व या सगळ्याला तुम्ही नुसता होकारच नाही दिला पाहिजे, तर तुम्ही त्याला 'सपोर्ट' केला पाहिजे.'' जर पालक ते करू शकले तर उत्तमच, पण हे अनेक पालकांना अवघड जाते. विशेषत: ज्या मुलाला/मुलीला विरुद्ध लिंगाच्या व्यक्तीचे कपडे घालणे, हावभाव करणे हा त्यांच्या लैंगिकतेचा महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे आईवडिलांनी हे सर्व स्वीकारले पाहिजे ही अपेक्षा खूप अवास्तव आहे. त्या आईवडिलांवर हा खरंतर अन्याय आहे. त्यांनी अत्यंत कष्टाने तुम्हाला समजून स्वीकारायचा प्रयत्न केला आहे, ही खूप मोठी बाब आहे. ते जर तुम्हाला समजून घ्यायचा प्रयत्न करताहेत तर तुम्हीही त्याची जाण ठेवली पाहिजे. जर आपल्याला वाटत असेल, की आपले पालक आपल्याला स्वीकारत नाहीत, तर आपण स्वतंत्र राहून आपली जीवनशैली जरूर जगावी. तुम्ही शिका, स्वत:च्या पायावर उभे राहा, स्वतंत्र राहा आणि तुमची जीवनशैली जगा.

FOR FREE DISTRIBUTION

मी शिक्षण व आर्थिक स्वातंत्र्यावर भर देतो कारण या दोन्हीच्या आधारावरच तुम्हाला तुमची दिशा ठरवता येणार आहे. तुम्ही कसेही

असाल, पण तुम्ही जर तुमची भाकरी कमवू शकत नसाल तर तुमच्या आयुष्याला अर्थ नाही. इंग्रजी शिका. शिका, संघटित व्हा आणि मग संघर्ष करा. याला कोणताही पर्याय नाही.

- **'M to F' टीजींनी त्यांचे लैंगिक आरोग्य कसे सांभाळावे ?**

तुम्ही ट्रान्सजेंडर आहात म्हणून तुमचं शारीरिक वास्तव (रिॲलिटी) काही बदलत नाही. इतर व्यक्ती एचआयव्ही व एसटीआय (लैंगिक संबंधांतून पसरणारे आजार) होऊ नयेत यासाठी लैंगिक संबंधांच्या बाबतीत जी काळजी घेतात ती यांनीही घेतली पाहिजे. हा समाज जास्त 'रिस्क'मध्ये आहे म्हणून यांनी तर जास्त काळजी घेतली पाहिजे.

लैंगिक संबंधाच्या वेळी निरोध वापरायलाच पाहिजे. एखादा पुरुष दिसायला चांगला आहे, त्याला कोणत्या आजाराची लक्षणे दिसत नाहीत म्हणजे त्याला एचआयव्ही किंवा एसटीआयची लागण नाही असा अर्थ लावू नका. लक्षणे दिसत नसली तरी हे आजार त्या व्यक्तीला असू शकतात. म्हणून त्याच्याबरोबर बिन निरोधाचा संबंध करू नका. तो निरोध वापरायला तयार नसेल तर त्याला 'बाय-बाय' करा.

FOR FREE DISTRIBUTION

या समाजातील काही जणांचे अनेक जोडीदार असतात. अशांनी बिन निरोधाचे संबंध केले तर अशांना एचआयव्ही, एसटीआयची लागण होण्याची शक्यता जास्त असते.

जर निरोध न वापरता लैंगिक संबंध झाले व एक-दोन महिन्यात गुप्तरोगाची लक्षणे दिसली (लिंगातून दुर्गंधीयुक्त स्राव जाणे, जननेंद्रियांवर फोड, जखमा होणे, जननेंद्रियांवर पाण्याने भरलेले, जळजळ करणारे पुरळ येणे, जांघेत गळू होणे, लिंगावर/गुदद्वारावर फ्लॉवरसारखे कोंब येणे, गुदातून रक्त जाणे इत्यादी) तर लगेच ॲलोपॅथिक डॉक्टरकडून उपचार करावेत.

जर तुम्ही एचआयव्ही संसर्गित असाल तर संभोगाच्या वेळी न

चुकता निरोधचा वापर करा म्हणजे तुमच्या जोडीदाराला एचआयव्ही विषाणूंची लागण होणार नाही व जर जोडीदाराला एचआयव्हीचा संसर्ग असेल व त्याला एआरटीची औषधे चालू असतील तर त्याच्या एआरटी रेझिस्टंट विषाणूची लागण तुम्हाला होणार नाही. खाणे, पिणे, व्यायाम, योग्य त्या चाचण्या योग्य वेळी करणे (उदा., सीडी–फोर काउंट), वेळच्या वेळी औषधे घेणे इत्यादी सर्व काळजी घेतली पाहिजे.

- **डॉक्टर, अनेक टीजी शरीराला विशिष्ट आकार यावा म्हणून औषधे, संप्रेरक (हॉर्मोन) थेरपीची इंटरनेटवर माहिती वाचून किंवा मित्रमैत्रिणींना विचारून, आपले आपण थेरपीला सुरुवात करतात, याबद्दल काय सांगाल?**

हे अत्यंत घातक आहे. अनेक संप्रेरकांमुळे यकृत (लिव्हर) व मूत्रपिंड (किडनी)वर वाईट परिणाम होतात. ही औषधे डॉक्टरांच्या सल्ल्यानेच घेतली पाहिजेत. डॉक्टरांना याच्या परिणामांबद्दल (काही अंशीतरी) माहिती असल्यामुळे ते वेळोवेळी विविध चाचण्या करून शरीराच्या बदलांवर बारीक लक्ष ठेवू शकतात. स्वत:च्या मनानी डोस घेणे, तो स्वत:च ॲडजस्ट करणे, ग्रे मार्केटमधून ही औषधे मिळवणे हे चूक आहे. ही औषधे कशी घ्यायची याच्या गाइडलाइन्स वारंवार बदलत असतात, तेव्हा ज्या डॉक्टरला या विषयाची खरंच माहिती आहे अशांकडूनच सल्ला घेऊन औषधे घेणे गरजेचे आहे.

FOR FREE DISTRIBUTION

- **काही 'M to F' टीजी शस्त्रक्रिया करून लिंग व वृषण काढून टाकतात, तर काही संपूर्ण एसआरएस करतात. याबद्दल तुम्ही काय सांगाल?**

पाश्चात्त्य देशांमध्येसुद्धा एसआरएस वारंवार होत नाहीत. ती करण्यासाठी एक प्रोटोकॉल आहे. हॉस्पिटलमध्ये गेलं आणि एसआरएस करून घरी आलं एवढं सोपं नाही. अगदी इंग्लंडमध्येसुद्धा जिथे एनएचएस (नॅशनल हेल्थ सर्व्हिस)ने सर्टिफाय केले, की एसआरएस

फुकट होते तिथेसुद्धा हे असं सहज होत नाही. ही फार काळजीपूर्वक व विचार करून करायची शस्त्रक्रिया आहे. पंचविशीच्या आत तर टीजींनी याचा विचारही करू नये. खरंतर भारतात हा निर्णय घ्यायची प्रगल्भता, आर्थिक आणि भावनिक स्वातंत्र्य बघता इथे त्यांनी ३० वर्षांच्या आत हा विचार करू नये. विशेषत: ज्या शस्त्रक्रिया कायमच्या (पर्मनंट) आहेत, उदा., लिंग, वृषण इत्यादी शरीराचा भाग काढून टाकणे, जी बदलता न येणारी (irreversible) शस्त्रक्रिया आहे. अनेक हिजडे खच्चीकरण (castration) करतात. त्यातील काहींनी ती एक आर्थिकदृष्ट्या केलेली तरतूद आहे असं मला वाटतं कारण त्याच्यावर त्यांची मिळकत अवलंबून असते, तर काहींमध्ये बाई बनण्यापेक्षा पुरुषत्वाच्या खुणा पुसून टाकणे हा मुख्य हेतू दिसतो.

- **काहीजण तज्ज्ञ ॲलोपॅथिक डॉक्टर (जे अशा शस्त्रक्रिया करतात)कडे न जाता, तज्ज्ञ नसलेल्या डॉक्टर/वैदूकडून शस्त्रक्रिया करून घेतात.**

FOR FREE DISTRIBUTION

हा गाढवपणा आहे. अगदी कुशल सर्जनने केलेल्या या शस्त्रक्रियांमध्येही गुंतागुंत निर्माण होऊ शकते, तिथे अर्ध्या हळकुंडाने पिवळ्या झालेल्यांकडून ती करून घेणे वेडेपणा आहे. मी एसआरएसपासून परावृत्त व्हा असं म्हणत नाही, मी एवढंच म्हणतोय, की तो अत्यंत महत्त्वाचा व मोठा निर्णय आहे व त्यावर बराच काळ नीट विचार करणे आवश्यक आहे. निदान ४–५ वर्षं. जोवर तुम्ही तुमच्या मतावर ठाम नाही आहात, माहिती गोळा केलेली नाही, पुरेशी आर्थिक तरतूद नाही, सपोर्ट सिस्टिम नाही, मानसिक तयारी नाही तोवर या फंदात पडू नये. एसआरएस शस्त्रक्रियेच्या मर्यादाही नीट समजून घ्याव्यात –

(१) तुम्हाला मुले होणार नाहीत.

(२) ‘M to F’ एसआरएस :

(i) कृत्रिम योनी ची संवेदनशीलता ही खऱ्या योनीपेक्षा खूप कमी असते.

(ii) पुरुषाची स्त्री बनल्यावर त्या व्यक्तीला लैंगिक सुखाचा उच्चतम बिंदू (ऑरगॅझम) मिळणे जवळजवळ अशक्य होते.

(iii) पुरुषाची स्त्री बनल्यावर लैंगिक इच्छा खूप कमी होतात.

आपण जर लैंगिकतेच्या अंगाने बघत असू तर हे सर्व महत्त्वाचे मुद्दे आहेत. याबद्दल एसआरएस करण्याआधी कितीजण नीट माहिती मिळवतात? या सर्वांचा नीट विचार न करता एसआरएस केली तर मेंटल हेल्थ इश्यूज येतात. कारण शस्त्रक्रिया करायच्या अगोदर जी तयारी करणे गरजेचे असते, विशेषतः मानसिक तयारी, ती झालेली नसते. बौद्धिक पातळीवर या मर्यादा समजून घेणे ही एक गोष्ट, पण त्या प्रत्यक्षात अनुभवणे ही दुसरी गोष्ट आहे. म्हणून एसआरएस केलेल्यांना तुम्ही भेटा. ५-६ जणांना तरी भेटा. त्यांचे अनुभव ऐका. ‘ॲनॉरगॅस्मिया’ (लैंगिक सुखाचा उच्चतम बिंदू न मिळणे) मला चालेल असं आता सेक्शुअली ॲक्टिव्ह असताना म्हणणे आणि त्याचा वास्तवात अनुभव घेणे या दोन टोकाच्या गोष्टी आहेत.

औषधे असोत, शस्त्रक्रिया असो, त्याचे आताचे व दूरगामी परिणाम काय असतात हे नीट समजून घ्या आणि मगच आपला निर्णय घ्या.

FOR FREE DISTRIBUTION

*****

# भाग १– (३) लिंगबदल शस्त्रक्रिया (एसआरएस)

समाजाच्या दबावामुळे बहुतेक ट्रान्सजेंडर व्यक्ती आपला लिंगभाव लपून ठेवायचा प्रयत्न करतात. काहींना आपला लिंगभाव लपवून ठेवणं अशक्य असतं. लिंगभाव दाबून ठेवण्याचा प्रयत्न केला, तर त्याचा त्यांच्या स्वप्रतिमेवर विपरीत परिणाम होतो. जगणं अशक्य होतं. त्यांना तीव्र इच्छा असते, की आपल्याला जी मानसिक घडण निसर्गानं दिली आहे तीच जगली पाहिजे, मग त्याचा समाजाकडून कितीही त्रास होवो. आपल्या लिंगभावाशी समरस शरीर असावं ही इच्छा तीव्र असते. म्हणून काहीजणं तसं शरीर घडवायचा मार्ग शोधायची खडतर तपश्चर्या करतात.

## लिंग बदलायचे टप्पे

**माहिती मिळवणं**

ज्या काउन्सेलरला या विषयातलं ज्ञान आहे व जो पूर्वग्रहदूषित विचार करणारा नाही, अशा काउन्सेलरला भेटावं लागतं. संवेदनशील काउन्सेलर मिळणं अवघड असतं. काउन्सेलरकडे जाऊन या विषयाची पूर्ण माहिती मिळवावी लागते. काउन्सेलर विविध गोष्टी पडताळून बघतो. व्यक्ती ट्रान्सजेंडर आहे का? का काही विशिष्ट 'मूड्स' असतानाच स्त्री बनायची इच्छा प्रकट होते? काही गैरसमजुतींतून, कुणाच्या दबावातून तर हा निर्णय घेतला जात नाही ना? ही व्यक्ती समलिंगी आहे, पण गैरसमजानं ही व्यक्ती स्वत:ला ट्रान्सजेंडर तर समजत नाही ना?

काही वेळा चर्चेत दिसून येतं, की क्लायंटला हा विषय नीट कळलेलाच नसतो. एक ताई म्हणाल्या, ''माझा मुलगा समलिंगी आहे. या समाजात त्याने दुसऱ्या मुलाबरोबर संसार करणं शक्य नाही; तर त्याची शस्त्रक्रिया करून बाई बनवता येईल का?'' इथे त्यांना मी बरंच

FOR FREE DISTRIBUTION

समजवण्याचा प्रयत्न केला, की लैंगिक कल व लिंगभाव यात फरक आहे. हा फरक त्यांना समजायला खूप जड जात होता.

**पूर्वतयारी**

सामाजिक बाबींवर चर्चा करावी लागते. या प्रवासात क्लायंटला आधार देणाऱ्यांची यादी बनवावी लागते. (उदा., मित्र, मैत्रिणी, नातेवाईक). त्यांना बोलावून सर्व गोष्टी समजावून सांगाव्या लागतात. त्यांच्या ज्या काही शंका असतील त्यांचं निरसन करावं लागतं.

काहीजण माझ्याकडे येतात आणि म्हणतात, ''मला लिंग बदलायची शस्त्रक्रिया करायची आहे.'' त्यांनी त्यांच्या घरच्यांना सांगितलेलं नसतं. सहकाऱ्यांना, मित्रांना माहिती नसतं. ''घरच्यांना कल्पना आहे का?'', ''या प्रक्रियेत त्यांचा आधार घेणार का?'' असं मी विचारलं तर म्हणतात, ''शस्त्रक्रिया झाल्यावर आम्ही घरच्यांना सांगणार. आत्ताच हे बोलणार नाही कारण त्यांचा खूप विरोध होईल.''

FOR FREE DISTRIBUTION

जर तुम्ही प्रौढ असाल, घरच्यांपासून वेगळे राहत असाल, आर्थिकदृष्ट्या सक्षम असाल, तर हे पाऊल तुम्ही उचलू शकता. पण जर तुम्ही घरच्यांपासून वेगळे राहत नसाल, विविध कारणांसाठी घरच्यांवर अवलंबून असाल, तर अशा वेळी एवढी मोठी गोष्ट त्यांच्यापासून लपवून ठेवणं कितपत योग्य आहे, याचा विचार होणं गरजेचं आहे. लिंग बदलायची प्रक्रिया सुरू झाली व मध्येच घरच्यांना कळलं, तर लिंगबदल प्रक्रियेचा ताण, त्यामुळे होणारे शारीरिक व मानसिक बदल व त्यात घरच्यांची भांडणं या सगळ्या त्रासांना एकदम सामोरं जावं लागतं. हे सगळेच त्रास एकाच वेळी आपल्याला झेपणार आहेत का? याचा नीट विचार करावा लागतो. हा विचार अनेक वेळा झालेला दिसत नाही. काही वेळा आपल्या जोडीदाराचं लग्न ठरत असतं आणि ते ठरायच्या आत लिंगबदल करून त्याच्याशी/तिच्याशी गुपचूप लग्न लावायचं असतं. सर्व पैलूंचा नीट विचार न करता असं पाऊल

उचलण्याचा उतावीळपणा करू नये.

जर पुरुष शस्त्रक्रियेनंतर स्त्रीच्या वेशात राहणार असेल तर शस्त्रक्रियेआधी किमान एक वर्ष तरी त्यानं स्त्रीची जीवनशैली जगावी असं सुचवलं जातं. (जर तो अगोदरपासून स्त्री-वेशातच वावरत असेल तर हा मुद्दा उपस्थित होत नाही.) पुरुषाला समाजात जेवढं स्वातंत्र्य आहे तेवढं स्त्रियांना नाही. जर स्त्री म्हणून समाजात वावरायचं ठरवलं तर या मर्यादांची मानसिक तयारी व्हावी लागते. बदल झाल्यावर हे स्वातंत्र्य गृहीत धरता येणार नाही याची जाण हवी. एक एसआरएस केलेली 'M to F' ट्रान्स म्हणाली, ''आता मी संध्याकाळी कोणत्याही पुरुषाशी रस्त्यात बोलताना दिसले तरी वस्तीतील लोक माझ्याकडे संशयी नजरेनं बघतात. ही बाई कशी काय परपुरुषांशी बोलते?''

जर नवीन परिस्थितीला सामोरं जायची मनाची तयारी झाली नसेल, तर शस्त्रक्रिया झाल्यावर नंतर, आपण ही शस्त्रक्रिया करायला नको होती, असं जरी वाटलं तरी परत ही शस्त्रक्रिया उलटी करता येत नाही. अशा काही केसेस आहेत, की ज्यांनी नीट माहिती न मिळवता, नीट विचार न करता लिंग/वृषण काढून टाकली आहेत व आता ''माझा निर्णय चुकला, आता मला परत लिंग व वृषण बसवा. जमेल का?'' असं विचारायला माझ्याकडे आले आहेत. त्यामुळे या गोष्टी नीट विचारात घेणं, त्या व्यक्तीची मानसिक तयारी तपासणं खूप महत्त्वाचं असतं.

FOR FREE DISTRIBUTION

### मानसोपचारतज्ज्ञ

दोन संवेदनशील, पूर्वग्रहदूषित नसलेल्या मानसोपचारतज्ज्ञांना भेटून त्या व्यक्तीने आपण ट्रान्सजेंडर आहोत असे दाखले मिळवावे लागतात. असे संवेदनशील मानसोपचारतज्ज्ञ मिळणं अवघड असतं. बहुतेकजण अत्यंत पूर्वग्रहदूषित असतात. मला एक ट्रान्सजेंडर म्हणाली, ''मी मागची दोन वर्षं तिच्याकडे (मानसोपचारतज्ज्ञाकडे) जात होते. तिने

दोन वर्षं माझा निर्णय कसा चुकीचा आहे हे समजून सांगण्यात घालवला.'' अशा डॉक्टरांचा काही उपयोग होत नाही.

**शस्त्रक्रिया**

एका कुशल सर्जनबरोबर व एन्डोक्रिनॉलॉजिस्टबरोबर लिंगबदल शस्त्रक्रियेच्या वैद्यकीय पैलूंवर चर्चा केली जाते. लिंगबदलाचे टप्पे कोणकोणते असतात, कोणते पर्याय उपलब्ध आहेत? शस्त्रक्रिया व संप्रेरक थेरपीच्या मर्यादा, दुष्परिणाम काय आहेत हे त्या व्यक्तीला समजावलं जातं. खर्चाचं अंदाजपत्रक बनवलं जातं.

**पुरुषाचं स्त्रीत रूपांतर** (**'M to F'**)

**पर्याय १ :** काहीजण नुसती कृत्रिम स्तनं बसवतात (ब्रेस्ट इंप्लान्ट). आपल्याला पाहिजे त्या आकाराची सिलिकॉन पिशव्यांची स्तनं बसवली जातात. अशा व्यक्ती शरीरानं कंबरेवरती स्त्री व कंबरेखाली पुरुष राहतात (शी-मेल).

**पर्याय २ :** काहीजण वृषण आणि लिंग काढून टाकायची शस्त्रक्रिया करतात. एक लघवी बाहेर यायचं छिद्र उरतं. मात्र योनी तयार करत नाहीत. वीर्यकोष काढून टाकत नाहीत. वीर्यकोष तसेच ठेवल्याने वीर्यनिर्मिती चालू राहते. वीर्यकोष भरले, की त्यातून वीर्य वाहून या छिद्रातून गळतं.

**पर्याय ३ :** काहीजण वरील (पर्याय २) शस्त्रक्रियेबरोबर वीर्यकोष काढून टाकतात. जर वीर्यकोष काढले तर वीर्यनिर्मिती बंद होते.

**पर्याय ४ :** काहीजण वृषण, वीर्यकोष, लिंग काढून टाकतात. योनी तयार करून घेतात (व्हजायनोप्लास्टी). लिंगाच्या आतील मांसल भाग काढून टाकला जातो. वृषण काढले जातात व वृषणकोषाच्या व लिंगाच्या कातड्याचा वापर

FOR FREE DISTRIBUTION

करून त्याची योनी बनवली जाते. वृषण काढल्यामुळे पुरुषबीज निर्मिती बंद होते. वीर्यकोष काढल्यामुळे वीर्यनिर्मिती बंद होते. ही शस्त्रक्रिया किती चांगल्या प्रकारे होते यावरून तयार केलेल्या योनीत किती संवेदनशीलता मिळते हे ठरतं.

योनीचं कातडं चिकटून योनी बंद होऊ नये यासाठी शस्त्रक्रियेनंतर योनी उघडी ठेवण्यासाठी एक उपकरण (व्हजायनल डायलेटर) वापरावं लागतं. योनीच्या आतील भागातील मेलेल्या पेशी काढण्यासाठी वेळोवेळी 'इअर बड्स' वापरून योनी साफ करावी लागते.

बनवलेल्या योनीत पुरुष जोडीदार लिंग घालून संभोग करू शकतो. पुरुषाची स्त्री बनलेल्या व्यक्तीला गर्भाशय, स्त्रीबीजवाहिनी, स्त्रीबीजांड नसतात. म्हणून या स्त्रीला पाळी येत नाही व पुरुषापासून गर्भधारणा होऊ शकत नाही.

FOR FREE DISTRIBUTION

वृषण काढल्यानंतर बहुतांशी अँड्रोजेन संप्रेरक निर्मिती बंद होते. अंगावरचे केस हळूहळू कमी होतात. नंतर इलेक्ट्रोलिसिस करून गालावरचे उरलेले केस काढता येतात. (वृषण काढायच्या आत इलेक्ट्रोलिसिस केलं तर अँड्रोजेन संप्रेरक वृषणात निर्माण होत असल्यामुळे गालावर केस येत राहतात व इलेक्ट्रोलिसिसला खूप खर्च येतो.)

**स्त्रीचं पुरुषात रूपांतर ('F to M')**

पुरुषाला स्त्री बनण्यापेक्षा, स्त्रीचं पुरुषात रूपांतर करणं जास्त अवघड असतं. या प्रक्रियेत अनेक पर्याय आहेत.

**पर्याय १ :** काही व्यक्ती फक्त स्तन लहान करायची शस्त्रक्रिया करतात. बाकी कोणताही बदल त्यांना नको असतो.

**पर्याय २ :** काही व्यक्ती स्त्रीबीजांड, स्त्रीबीजवाहिन्या व गर्भाशय

काढून टाकतात पण योनी, शिस्निका तशीच ठेवतात. स्त्रीबीजांड काढली, की लगेच रजोनिवृत्ती येते.

**पर्याय ३ :** काही व्यक्ती स्त्रीबीजांड, स्त्रीबीजवाहिन्या व गर्भाशय काढून टाकतात. मोठं व छोटं भगोष्ठ, योनीचा भाग वापरून, कंबर किंवा मांडीचं कातडं वापरून कृत्रिम लिंग आणि वृषणकोष घडवले जातात. वृषणकोषात कृत्रिम वृषण बसवले जातात.

स्त्रीपासून पुरुष झालेल्या व्यक्तीच्या शरीरात वीर्य व पुरुषबीज निर्मिती होत नाही. बसवलेल्या लिंगातून लघवी येते पण लिंगाला उत्तेजना येऊ शकत नाही. म्हणजेच तो पुरुष दुसऱ्या स्त्रीच्या योनीत लिंग प्रवेश करून संभोग करू शकत नाही. स्त्रीपासून पुरुष बनलेल्या व्यक्तीपासून स्त्रीला गर्भधारणा होऊ शकत नाही.

FOR FREE DISTRIBUTION

**सावधान**

• एसआरएसचे काहीजणांना गंभीर दुष्परिणाम सोसावे लागतात. त्यामुळे या शस्त्रक्रिया करण्याआधी याची नीट माहिती मिळवणं आवश्यक आहे.

• काही सर्जन, प्रयोगाची संधी मिळते म्हणून पुरेसं कौशल्य न मिळवता या शस्त्रक्रिया करतात. जर शस्त्रक्रिया व्यवस्थित झाली नाही तर पुढे अनेक अडचणी उद्‌भवू शकतात.

• शस्त्रक्रिया करणारे डॉक्टर स्वस्तात शस्त्रक्रिया करायला तयार आहेत एवढा एकच आर्थिक निकष लावू नये. डॉक्टरांना या विषयाचा किती अनुभव आहे हे जाणून घेणंही महत्त्वाचं आहे.

**संप्रेरक**

'M to F' : स्त्रीत रूपांतर झालेल्या व्यक्तीला काही विशिष्ट

संप्रेरकांची इंजेक्शन/गोळ्या घेऊन शरीराला गोलाई येते, स्तनं वाढतात.

'F to M' : विशिष्ट संप्रेरकाची इंजेक्शन घेतल्यानं आवाज बसतो. अंगावरचे केस वाढतात.

शरीराला पुरवलेले संप्रेरक शरीर हळूहळू वापरत असतं म्हणून हे संप्रेरक ठरावीक काळाने परत परत इंजेक्शन/गोळ्यांमार्फत पुरवावे लागतात.

या औषधांचे काही दुष्परिणाम आहेत म्हणून, जर संप्रेरक घेणार असाल तर ही औषधं डॉक्टरांच्या (एन्डोक्रिनॉलॉजिस्ट) निदर्शनाखालीच घ्यावी.

**शस्त्रक्रियेनंतर...**

FOR FREE DISTRIBUTION

इतक्या वर्षांची तळमळीची इच्छा पुरी झाल्यावर खूप मानसिक थकवा येतो. आपल्या पूर्वीच्या आयुष्याला पूर्णविराम दिल्यामुळे काही काळ खूप नैराश्य येतं. हा पुनर्जन्म सोयीस्कर व्हावा म्हणून संवेदनशील काउन्सेलर, घरची मंडळी, मित्र, सहकारी मंडळी या व्यक्तींना आधार देण्याची मोठी भूमिका बजावू शकतात. काहीजण आपल्या नव्या जीवनशैलीत सहज मिसळून जातात, तर काहीजणांना नव्या जीवनशैलीत रुळायला वेळ लागतो. शस्त्रक्रियेनंतर काहीजण आवाज बदलण्याचा सराव 'व्हॉइस थेरपिस्ट'कडून करून घेतात. काहींना नव्या पद्धतीनं चालणं, बोलण्याचा प्रयत्न करावा लागतो. काहींना या बदलाला सरावण्यासाठी अनेक महिने लागू शकतात. यानंतर हळूहळू आत्मविश्वास वाढू लागतो, मन आनंदी होतं, शांत होतं, नवीन जीवनशैलीत ती व्यक्ती पूर्णपणे एकरूप होते आणि मग ती व्यक्ती जगाचे इतर रंग अनुभवण्यास स्वतंत्र होते.

हे सगळं वाचून साहजिकच मनात प्रश्न येतो, की हे सगळं करायचा एवढा त्रास कशाला घ्यायचा? तर याचं उत्तर असं, की अशा व्यक्तींनी

कसं जगायचं, आयुष्य अनुभवायचं हे त्या व्यक्तीवर सोडावं. त्यांची दृष्टी इतरांना नाही, त्यांना काय त्रास होतो हे इतरांनी भोगलेलं नाही. त्यांना हा बदल तळमळीनं हवा असतो म्हणून एवढा त्रास सोसायची तयारी दाखवतात. इतरांनी या भावना अनुभवल्या नाहीत म्हणून त्या भावना, इच्छा चुकीच्या आहेत, निरर्थक आहेत असं म्हणणं चुकीचं आहे. त्यांना त्यांच्या इच्छेप्रमाणे आयुष्य जगायचा अधिकार आहे. त्यांना जेवढा आधार देता येईल तेवढा दिला जावा, जेणेकरून त्यांचा प्रवास कमी खडतर होईल.

*****

FOR FREE DISTRIBUTION

## तृतीयपंथी, ट्रान्सजेंडर यांच्या लैंगिकतेच्या संदर्भातील काही कायदे

**भा.दं.सं.३७७**

पूर्वी ख्रिस्ती धर्माची ब्रिटिश कायद्यावर मोठी छाप होती. या धर्मात समलिंगी संभोग पाप असल्यामुळे ब्रिटिश कायद्यात हा गुन्हा बनला. भारतात ब्रिटिशांचे राज्य आल्यावर भारतीय दंडविधान संहितेत समलिंगी संबंध गुन्हा ठरला (भा.दं.सं.३७७). या कायद्यानुसार दोन प्रौढ पुरुषांनी राजीखुशीनं व खासगीत केलेला संभोग गुन्हा ठरला. या कायद्यामध्ये जोडीदारांचे वय काय आहे, तो संभोग दोघांच्या संमतीने होतोय का? याचा कसलाच विचार झाला नाही. सरसकट सगळ्यांनाच गुन्हेगार ठरवले.

FOR FREE DISTRIBUTION

समलिंगी संभोग करणाऱ्या लोकांबद्दलची समाजाची वक्रदृष्टी, या लोकांचे आर्थिक शोषण करण्यास ३७७ कलमाचा होणारा वापर, या पुरुषांमध्ये एचआयव्हीचा वाढता प्रसार या सर्वांमुळे 'नाझ फाउंडेशन इंडिया' व 'लॉयर्स कलेक्टिव्ह' या संस्थांनी ३७७ कलमात बदल व्हावा, प्रौढ व संमतीने संभोग करणाऱ्यांना हे कलम लागू होऊ नये म्हणून २००१मध्ये दिल्ली हायकोर्टात एक जनहित याचिका दाखल केली.

ही केस ८ वर्षं चालली. २ जुलै २००९ला चीफ जस्टिस अ. प्र. शहा व जस्टिस एस. मुरलीधर यांनी ऐतिहासिक निकाल दिला, की ३७७ कलम हे या लोकांच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करणारे आहे. (प्रौढ नसलेल्या व्यक्तीबरोबर संभोग करणं मग त्या व्यक्तीची संमती असली तरी या कायद्यांतर्गत गुन्हाच आहे.) प्रौढांनी संमतीने केलेल्या समलिंगी संभोगाला गुन्हा मानला जाऊ नये या दिल्ली हायकोर्टाच्या

निकालाविरुद्ध काही गट सुप्रीम कोर्टात गेले आहेत. तिथे ही केस चालू आहे.

**भा.दं.सं.३१९, ३२०**

एखाद्या व्यक्तीला जाणूनबुजून इजा करणं भा.दं.सं.३१९, ३२० या कलमांनुसार गुन्हा आहे. इजेचे विविध प्रकार दिले आहेत. यात पहिला प्रकार खच्चीकरणाचा (इमॅस्क्यूलेशन) आहे. खच्चीकरण म्हणजे एखाद्या पुरुषाचे वृषण काढून टाकणं. हा कायदा खूप पूर्वी केला होता जेव्हा ट्रान्सजेंडर व्यक्तींबद्दल काहीही शास्त्रीय माहिती नव्हती. आज ज्या पुरुषांना शस्त्रक्रिया करून स्त्री बनायचंय अशांना ही कलमं लागू होतात का? याचं उत्तर स्पष्ट नव्हतं.

**बिधान बारुआची केस**

बिधान आसामचा. लहान असल्यापासून तो स्वत:ला मुलगी समजायचा. मुलीसारखं राहायचा. घरच्यांचा त्याच्या असं राहण्याला विरोध होता. घरचे त्याला मारहाण करायचे. नावं ठेवायचे. घरच्यांनी त्याला बदलायचे खूप प्रयत्न केले. त्याचा काही उपयोग झाला नाही. मोठा झाल्यावर बिधानने पैसे साठवले. मानसोपचारतज्ज्ञाकडून तपासणी करून घेतली. त्यात सिद्ध झाले, की त्याचा लिंगभाव स्त्रीचा आहे. २१व्या वर्षी तो मुंबईत लिंगबदल शस्त्रक्रिया करून स्त्री बनण्यासाठी आला. त्याच्या वडिलांना हे कळलं व ते मुंबईत आले, त्यांनी शस्त्रक्रियेला विरोध केला. ते म्हणाले, ‘‘माझ्या मुलाने मुलगी बनणे चुकीचे आहे, लाजिरवाणे आहे.’’ बिधानच्या वडिलांचा विरोध असल्यामुळे हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी सांगितले, की जोवर बिधान कोर्टाची परवानगी घेत नाही तोवर ते ही शस्त्रक्रिया करू शकणार नाहीत. बिधानने २०११मध्ये मुंबई हायकोर्टात दाद मागितली. हायकोर्टाने सांगितले, की लिंगबदलण्याविरुद्ध कोणताही कायदा नाही, तेव्हा बिधानला जर लिंगबदल शस्त्रक्रिया करायची असेल तर तो करू शकतो.

FOR FREE DISTRIBUTION

**ॲफिडेव्हिट**

ही कायद्याची अडचण नको म्हणून ही शस्त्रक्रिया करण्याआधी डॉक्टर्स त्या व्यक्तीला ॲफिडेव्हिट करायला सांगतात. या ॲफिडेव्हिटमध्ये ती व्यक्ती प्रौढ आहे व ही शस्त्रक्रिया ती व्यक्ती स्वत:च्या मर्जीने करू इच्छिते हे नमूद केलं जातं.

**अनुत्तरित प्रश्न**

खच्चीकरण/एसआरएस या दोन्ही विषयांबद्दल अनेक प्रश्न कायद्याच्या दृष्टीनं आज तरी अनुत्तरित आहेत. यातील काही मुद्दे–

- एसआरएस/खच्चीकरण झालेल्या पुरुषाला कोणत्या लिंगाचं मानायचं? पुरुष का स्त्री? का एक तिसरं सेक्स (ट्रान्सजेंडर) म्हणून कायद्याने मान्यता द्यायची? जर तिसरं सेक्स म्हणून कायद्याने मानलं तर त्यांचे अधिकार कोणते?
- आधार कार्डवर ट्रान्सजेंडर व्यक्तींसाठी पुरुष, स्त्री या पर्यायांबरोबर 'T' हा पर्यायसुद्धा दिला आहे. पण कायद्याच्या इतर पैलूंमध्ये लिंगाचा प्रकार 'T' म्हणून चालणार का?
- एसआरएस करून पुरुषापासून स्त्री बनली किंवा स्त्रीपासून पुरुष बनला तर यांना लग्न, घटस्फोट, वारसा हक्क, दत्तक घेणं यासाठी कोणते कायदे लावणार? 'पर्सनल लॉ'मध्ये फक्त पुरुष व स्त्री ही दोनच लिंग मानली जातात. अशावेळी या व्यक्तींच्या अधिकारांचं काय होणार? त्यांना त्यांचे अधिकार पुरुष का स्त्री म्हणून मिळणार? (का मिळणारच नाहीत? जर मिळणार नसतील तर कायद्याच्या ओळखपत्रांवर तृतीयपंथी 'T' लावतील का?) हे कायदे त्यांच्या बदललेल्या लिंगावर आधारित असणार, की त्यांच्या जन्माच्या वेळेच्या लिंगावर आधारित असणार? उदा., वडिलांनी मृत्युपत्रात त्यांची स्वत:ची इस्टेट सगळी मुलांसाठीच ठेवली व त्यांची एक मुलगी एसआरएस करून पुरुष बनली तर त्याला मुलगा मानून वाटा मिळणार का?

*****

FOR FREE DISTRIBUTION

# आत्मकथा

FOR FREE DISTRIBUTION

## सिद्धांत (मुंबई)

मी, बाबा, आई आणि २।। वर्षांनी मोठा भाऊ, असं आमचं मिडल क्लास कुटुंब. बाबा फार शिकलेले नाहीत. एका कंपनीत त्यांनी टर्नर म्हणून काम केलं. त्यांना रिटायर होऊन २० वर्षं झाली.

माझी वडिलांशी जास्त जवळीक नव्हती. वडिलांनी कधीही आमच्या संगोपनामध्ये लक्ष घातलं नाही. त्यांनी कधी आम्हाला जवळ घेतलं नाही. त्यांच्याबद्दल मला काही वाटत नाही. म्हणजे इट्स लाइक लिव्हिंग विथ अ स्ट्रेंजर. घरी असले तर टीव्ही बघणार. कशात इन्व्हॉल्व्ह होणार नाहीत. माया अजिबात नाही. ते बहुतेक वेळेला बाहेरच असायचे. मित्रांबरोबर पिकनिकला जायचे. नाहीतर कोणाबरोबर पार्टी करायचे, पण त्यांनी ड्रिंक, धूम्रपान असं कोणतंच व्यसन केलं नाही. ते चहासुद्धा घेत नाहीत. घरात का लक्ष नव्हतं हे माहीत नाही.

FOR FREE DISTRIBUTION

आम्ही लहान होतो तेव्हा आईच सगळं बघायची. आई सर्व करायची. ती १०वीपर्यंत शिकली. त्यावेळी एवढं शिक्षण स्त्रियांसाठी खूप मोठं मानलं जायचं. ती हाऊसवाइफ होती. खूप ब्रॉड माईंडेड होती. खूप वाचन करायची. वडील फक्त ७वीपर्यंत शिकले असल्यामुळे आमचं शिक्षण वगैरे सर्व आईनेच केलं.

वडील जेवढा पैसा घरी आणायचे तेवढा पुरायचा. म्हणजे आम्ही गरिबीत दिवस नाही काढले. आमचे भरपूर लाड असे काही झाले नाहीत, की मला पाहिजे असं म्हटलं की मिळालं, पण काही कमी पडू दिलं नाही. आमच्या घरचं कोणीच फार धार्मिक नव्हतं, म्हणून आमच्यावर धार्मिक दडपणं नव्हती.

माझा स्वभाव लहानपणापासूनच मनमोकळा होता. मी सतत

बाहेर जाऊन खेळायची. क्रिकेटसारखे सगळे जे आउटडोअर गेम आहेत ते मला खूप आवडत. मी टॉमबॉय होते. सुट्टी असली, की बाहेर जायचे, उशिरा घरी यायचे.

भाऊ मात्र माझ्याविरुद्ध. तो कधी बाहेर जायचा नाही. तो घरातच खेळत असायचा. तो खूप रिझर्व्ह्ड आहे. तो जास्ती कुणाशी बोलत नाही. माझा स्वभाव मात्र खूप मनमिळावू. भरपूर मित्र. मुलांबरोबर माझं जास्त पटायचं. मुलींबरोबर मला कम्फर्टेबल नाही वाटायचं. म्हणून त्यांच्याशी जास्त पटायचं नाही. मुलींचं गॉसिप करणं मला आवडायचं नाही. मी मुलांबरोबर का खेळते म्हणून घरच्यांनीही कधी विरोध केला नाही.

मला आठवतंय पाचवी-सहावीपासून मी माझ्या शरीराबद्दल कम्फर्टेबल नव्हते. मला फ्रॉक घालायला आवडायचा नाही, पण तो नाइलाजाने घालावा लागायचा. मधून मधून आई मला भावाचा शर्ट, टी-शर्ट घालायला द्यायची, ते खूप आवडायचं.

मी इंग्लिश मीडिअममधून शिकले. मी ९वी-१०वीत असताना मला माझ्या भावाच्या मित्राबद्दल थोडंसं आकर्षण होतं. तो मुलगा माझ्यापेक्षा २-३ वर्षांनी मोठा होता. हे आकर्षण इतकं थोड्या काळासाठी होतं, की ते नेमकं काय होतं हे सांगणं अवघड आहे. इट वॉज ए फेज. त्याच्या आधी आणि त्याच्या नंतर मला कोणत्याही मुलाबद्दल आकर्षण जाणवलं नाही.

मी जेव्हा वयात आले तेव्हा, वयात येताना होणारे बदल मला कोणी समजून सांगितले नव्हते. पहिली एम.सी. (मासिक पाळी) सुरू झाली तेव्हा आय वॉज शॉक्ड, इट वॉज अ ट्रॉमा. मी दिवाळीला नातेवाइकाकडे गेले होते. तेव्हा मला एम.सी. सुरू झाली आणि मला याबद्दल अजिबात माहिती नव्हती. घरी आल्यावर आईनी सांगितलं, की हे असं असतं. पण ही माहितीही खूप वरवरची होती. पहिल्यापासून

FOR FREE DISTRIBUTION

आजपर्यंत मला एम.सी. ही इरिटेटिंग वाटत आली आहे. मला ती अजिबात आवडत नाही. वयात आल्यावर माझे स्तन वाढू लागले. मला ते आवडायचे नाहीत. आजही ते मला अगदी नकोसे वाटतात.

मला लहानपणापासूनच मुलींचं आकर्षण होतं, पण ते काय आहे हे कळत नव्हतं. माझी शाळेत एक बेस्ट फ्रेंड होती. मला ती खूप आवडायची. हे अंदाजे सातवी-आठवीला असताना. मी सारखा तिचा विचार करायची. मला वाटायचं, की मी सारखा तिचा विचार का करते? ती तर फक्त माझी एक फ्रेंड आहे.

मला मुली आवडत, पण याला काय म्हणतात हे माहीत नव्हतं. नववी-दहावीपासून माझं वेगळेपण मला कळू लागलं. पण मला माझ्या फिलिंग्ज कुणापाशी सांगता येत नव्हत्या, म्हणून त्रास व्हायचा. मित्र होते, पण त्यांना कसं सांगणार?

माझ्या वर्गातील एक मुलगी मला खूप आवडू लागली. सारखं वाटायचं, की तिच्याशी बोलायला मिळालं तर बरं होईल. तिच्याबरोबर टाइम स्पेंड करायला आवडेल. त्याच्यात सेक्शुअल असं काही नव्हतं. सगळ्यांना माहीत होतं, की मला ती मुलगी आवडायची, पण कोणी मला त्याबद्दल काही विचारलं नाही, की 'व्हाय यू आर सो क्रेझी आबाउट हर?'

कॉलेजमध्ये मी फक्त पॅन्ट, टी-शर्ट घातले. माझा स्तनाचा आकार दिसू नये म्हणून मी 'स्पोर्ट्स ब्रा' घालायचे, सैल कपडे घालायचे, जरा वाकून चालायचे. कॉलेजमध्ये मला वाटू लागलं, की मी लेस्बियन आहे. लेस्बियन हा शब्द कुठून कळला हे नाही आठवत.

अकरावीत मला नवीन मित्रमैत्रिणी मिळाल्या व त्यातील एक मुलगी आवडू लागली. आम्ही खूप जवळ होतो. पण परत त्यातही काही सेक्शुअल नव्हतं. ती मला मैत्रिणीपेक्षा जास्त जवळची अशी वागणूक द्यायची, पण तिने मला हे कधी बोलून दाखवलं नाही. बारावीत जाताना

FOR FREE DISTRIBUTION

मला तिच्याबद्दल लैंगिक आकर्षण वाटू लागलं आणि मला याचा त्रास होऊ लागला, की मला हे असं का होतं? म्हणून मी मानसशास्त्राच्या एक प्राध्यापिका होत्या, त्यांच्याकडे काउन्सिलिंगसाठी गेले. त्यांना विचारलं मी काय करू? विनंती केली, की तिला माझ्याबद्दल काही सांगू नका. पण मी गेल्यानंतर त्या मॅडमनी तिला बोलावून, तिला सर्व सांगितलं.

त्यानंतर तिनं माझ्याशी बोलणं बंद केलं व सगळ्यांना सांगितलं, की मी तिच्या घरी तिच्याशी गैरवर्तन केलं. हे खरं नव्हतं. आमचा ग्रुप माझ्याशी बोलायचा बंद झाला. या ग्रुपमधल्या काही मुलींनी मी घरी नसताना माझ्या घरी जाऊन, ही कॉलेजमध्ये कसं वागते, याबद्दल तक्रार केली. नक्की त्यांनी घरच्यांना काय सांगितलं, हे मला माहीत नाही, कारण आई माझ्याशी त्याबद्दल काहीच बोलली नाही, मला ओरडली नाही. पण आई खूप डिस्टर्ब्ड होती.

मला माझ्या मैत्रिणीच्या खोटं बोलण्याचा खूप त्रास झाला. मित्रमैत्रिणी तुटले. या दुःखात मी 'डोमॅक्स' पिण्याचा प्रयत्न केला, पण त्याच्यामुळे तोंडात जळजळ झाली व ते बाहेर उलटून पडलं. मग कॉलेजमध्ये मी ब्लेड घेऊन नस कापून घेतली. सुदैवाने ती फार खोलवर कापली गेली नाही. माझे मित्र मला डॉक्टरकडे घेऊन गेले. मी घरी आल्यावर आईनी मला आधार दिला, पण काहीही विचारलं नाही.

माझी मैत्रीण माझ्यापासून दूर जाण्यापेक्षा, तिने माझ्यावर खोटा आरोप लावला, याचं मला जास्त दुःख होतं. त्यात हे सर्व कॉलेजभर झालं होतं म्हणून अजूनच त्रास झाला. तेव्हापासून मी जास्त काळ एकटी एकटी राहू लागले. सोशल लाइफ जवळजवळ बंदच झालं. मनात या गोष्टी सारख्या येत राहिल्या. कॉलेज लाइफ खूप वाईट गेलं.

कालांतराने त्याच कॉलेजमध्ये मला नवीन ग्रुप मिळाला. नवीन मित्र झाले. पण माझं अभ्यासातील लक्ष कमी होत गेलं. अजून माझे जुने

FOR FREE DISTRIBUTION

मित्र मला दिसायचे, मला पाहिले, की तोंड फिरवून निघून जायचे. त्यातल्या कोणी मला त्रास दिला नाही, पण या सगळ्याचा मला त्रास व्हायचा. या काळात मला माझ्या लैंगिकतेच्या मित्रमैत्रिणी नव्हत्या. त्यामुळे खूप एकटेपणा वाटायचा.

टी.वाय.च्या वर्षाला आम्ही नवीन घरी राहायला गेलो. तेही मुंबईतच होतं. त्याच वर्षी आई पडली आणि तिच्या गुडघ्याची वाटी फुटली. शस्त्रक्रिया झाली, पण चालताना तिचा पाय दुखायचा. ती घरातल्या घरात हळूहळू चालायची. जसजशी वर्षं लोटत गेली तसतसं तिचं दुखणं वाढतच गेलं. बाथरूमला जातानासुद्धा ती माझा हात धरून जायची. मग तिला वेरिकोज व्हेन्सचा त्रास सुरू झाला. वयही वाढत होतं. काही वर्षांनी तिनं पूर्णपणे अंथरूण धरलं.

पुढच्या काळात माझ्यावर खूप बंधनं आली. मी ओव्हरनाइट कुठे जाऊ शकायची नाही, कारण आईला एकटीला भीती वाटायची. विशेषत: संध्याकाळी. रात्र झाल्यावर, ती पूर्णपणे माझ्यावर भावनिकदृष्ट्या व दैनंदिन व्यवहारांसाठी अवलंबून असायची. तिला फक्त मीच पाहिजे असायची. मी सारखी घरीच असले पाहिजे असं तिला वाटायचं. मला माझं सामाजिक आयुष्य जवळजवळ नव्हतंच.

FOR FREE DISTRIBUTION

ग्रॅज्युएट झाल्यावर एक वर्ष मी घरी होते. मग एका मित्राच्या मदतीने, जानेवारी २००१मध्ये मी एका रिअल इस्टेट एजन्सीमध्ये को-ऑर्डिनेटर म्हणून लागले. २ वर्षांनी मी नोकरी बदलली. एका औषधाच्या कंपनीत कामाला लागले.

इथे कामाला असताना मला एक मुलगी भेटली. लोकलच्या प्रवासात आमची ओळख झाली. ती उभयलिंगी होती. तिच्याबरोबर माझे लैंगिक संबंध झाले. लैंगिक अनुभवाची ही पहिली वेळ. काही वर्षं आमचं नातं होतं, पण हे नातं दीर्घकाळ टिकू शकलं नाही. मला लक्षात यायला लागलं, की ती एकनिष्ठ नाहीये. आमची याच्यावरून खूप भांडणं

होऊ लागली. पुढे तिनं एका पुरुषाशी लग्न केलं. तेव्हा मी तिला सांगितलं, की आता मी तुला स्पर्श करणार नाही. पण ती खूप जिद्दी होती व मलाही तिला सोडवत नव्हतं. आमचं नातं असं डळमळीत अवस्थेत चालू होतं. पण एक दिवस, माझ्या वाढदिवसाच्या दिवशी तिने मला सांगितलं, की तिच्या आयुष्यात मी, तिचा नवरा व तिचा अजून एक बॉयफ्रेंड आहे. तो बॉयफ्रेंडही विवाहित होता, हे कळल्यावर मात्र माझ्या सहनशीलतेचा अंत झाला. कडाक्याचं भांडण झालं. मी म्हणाले, ''तुझं लग्न झालं तरी मी तुझ्याबरोबर आहे, अ‍ॅडजस्ट करायचा प्रयत्न करत आहे, पण तुझं हे काय चाललंय?''

मला हे सर्व असह्य झालं व मी गोळ्या घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. मी ७-१० दिवस हॉस्पिटलमध्ये होते. यावेळीही माझी आई माझा आधार होती. आता तिला खूप चिंता पडली, की माझं कसं होणार? ती मला ओरडली नाही, पण तिला व माझ्या मावश्यांना हे सगळं माहीत असणार, कारण तिथल्या डॉक्टरांनी गोडीगुलाबीने माझ्याकडून ही हकीकत काढून घेतली होती. मला वाटतं, ती त्यांनी आईला सांगितली असणार. त्यामुळे मी लेस्बियन आहे असं त्या सगळ्यांना वाटलं असणार. वडील कधीच इन्व्हॉल्व्हड् नसल्यामुळे त्यांनी कधीही विचारलं नाही, की 'असं का केलंस?' यानंतर आई खूप काळजी करायला लागली, की तिच्यानंतर माझं काय होणार?

माझी गर्लफ्रेंड मला भेटायला आली. रडली, म्हणाली, ''मला माहीत आहे तू हे सगळं माझ्यासाठी केलंस, मी आता बॉयफ्रेंड नाही ठेवणार.'' पण तिच्या वागण्यात काहीही फरक पडला नाही. माझं मन सांगत होतं, की तिची एवढी लायकी नाही, की तिच्यासाठी आपण आपलं आयुष्य वाया घालवावं. आपल्यामुळे आपल्या जवळच्यांना खूप त्रास झालाय हेही कळत होतं. पण दुसरीकडे माझी तिच्यात खूप भावनिक गुंतवणूक असल्यामुळे, मला तिला या परिस्थितीतही सोडवत

FOR FREE DISTRIBUTION

नव्हतं. हा ठाम निर्णय घ्यायला अजून दीड ते दोन वर्षं लागली व शेवटी मी तिला सांगितलं, ''इट्स ओव्हर''. तिला त्याचा खूप राग आला, पण ते नातं कायमचं संपलं.

या दरम्यान मला इंटरनेटवर एक साइट मिळाली. त्याच्यावरून मी एका लेस्बियनशी मैत्री केली व तिच्या कॉन्टॅक्टमधून अजून इतर जणांच्या ओळखी झाल्या. या लेस्बियन मैत्रिणी सगळ्या मुंबईच्या होत्या. ही अंदाजे २००५ची गोष्ट. एक दिवस या ग्रुपने एक पिकनिक आयोजित केली व मला बोलवलं. या पिकनिकमध्ये या सगळ्या मला पहिल्यांदा भेटल्या.

लेस्बियन मैत्रिणींशी संवाद सुरू झाला. विविध विषयांबद्दल बोलणं झालं व लक्षात यायला लागलं, की यांच्यात आणि माझ्यात फरक आहे. मी एकीला म्हणाले, ''मला स्तन आवडत नाहीत, मन करता है की इनको निकाल दू।'' तर ती म्हणाली, ''का? त्यात काय वाईट आहे? तुला असं कसं काय वाटतं? आय ॲम व्हेरी कम्फर्टेबल विथ माय ब्रेस्ट्स.'' इतरांशीही असे वाद व्हायचे. शेवटी मी म्हणायचे, ''जाऊ दे, मला नाही सांगता येत, की मला नक्की काय वाटतं आणि तुम्हालाही नाही कळणार.'' पुढे पुढे मला लेस्बियन्सबरोबर कम्फर्टेबल वाटेचना. काहीतरी वेगळं वाटायचं.

असं होता होता, इंटरनेटवर 'ऑर्कूट'च्या मदतीने माझ्या आयुष्यात माझा पहिला ट्रान्स 'F to M' मित्र भेटला. तोही महाराष्ट्रीयन आहे, मुंबईतला आहे. त्याच्याकडून मला कळलं, की असं ट्रान्स म्हणून काहीतरी असतं. तो मला सांगायचा, की मी असा आहे. तेव्हा त्याने एसआरएस केली नव्हती. त्याच्याशी बोलून मला लक्षात यायला लागलं, की मला जे वाटतंय, ते हे, की मी लेस्बियन नसून ट्रान्स 'F to M' आहे. हे समजल्यावर एक प्रकारची मनाला शांती आली, की मी कोण आहे, या प्रश्नाचं उत्तर मिळालं. पण त्याचबरोबर एक



FOR FREE DISTRIBUTION

अस्वस्थताही निर्माण झाली, की मी पुरुष आहे पण आता पुढे काय? कारण १०-१५ वर्षं आईची काळजी घेता घेता, मला माझ्या आयुष्याकडे लक्ष द्यायला वेळ झाला नव्हता. आता अचानकपणे मला माझ्या लैंगिकतेची खरी ओळख झाली होती.

पुढे माझ्या भावाचं लव्ह-मॅरेज झालं म्हणून, माझ्या वडिलांनी त्याला घराबाहेर काढलं. तेव्हापासून त्याच्याशी आमचा फार संबंध राहिला नाही.

माझा ट्रान्स मित्र एसआरएस करून घेणार होता. मलाही वाटत होतं, की आपणही एसआरएस करावी. पण आईला मी पुरुष आहे हे कसं सांगायचं? ती बिछाना धरून आहे. अशा स्थितीत तिला हे सांगणं मला योग्य वाटलं नाही. त्यात तिच्या टॉयलेटकडे मला बघायला लागायचं. माझी ओळख तिला मी पुरुष म्हणून करून दिली तर तिला खूप संकोच वाटेल, ही मनात काळजी होती. म्हणून ती आहे तोवर तिला काही सांगायचं नाही व आहे तसं राहायचं हा निर्णय मी घेतला.

FOR FREE DISTRIBUTION

गेल्या वर्षी आई गेली. तिचं खाणंपिणं हळूहळू कमी झालं होतं. मी घरी येईन तेव्हाच ती खायची. मी घरात नसताना ती जेवायची नाही, पाणीही प्यायची नाही. कारण मी नसताना तिला टॉयलेटला लागली तर? या भीतीने ती उपाशी राहायला लागली. वडिलांनी तर स्पष्ट सांगितलं, की ''मी तिची 'टॉयलेट' काढणार नाही. तसं केलं तर मला जेवण जाणार नाही.'' त्यामुळे वडिलांचा तिला सांभाळण्यासाठी काही उपयोग नव्हता. सहा महिने मी हाफ डे ऑफिसला जायचे. घरी स्वयंपाक करायचे, आईचं बघायचे. खूप ताण पडायचा.

पुढे आईची तब्येत खूपच खालावली. तिला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केलं. तिला रेस्पिरेटरवर ठेवलं. भावाने आर्थिक मदत केली, पण त्याने स्वत:ला याच्यात गुंतवून घेतलं नाही. काही दिवसांनी ती घरी आली. माझी होणारी ओढाताण बघून म्हणाली, ''आपण बाई

ठेऊयात.''

घरी आल्यावर तिची जगण्याची इच्छा संपली होती. अनेक वेळा म्हणायची, ''मी आयुष्य जगले आहे. सगळं पाहिलं आहे, आता कधी सुटेन असं झालंय.'' माझी आई अत्यंत स्वावलंबी होती. कोणत्याही गोष्टीसाठी तिला कोणावर अवलंबून राहायची सवय नव्हती. अशा व्यक्तीला टॉयलेटपासून आपलं सर्व दुसऱ्याला करावं लागतंय, हे कसं आवडणार? त्यात माझे वडील प्रसंगावधान न बाळगता काहीतरी चेष्टा, थट्टा करायचे. याचाही तिला त्रास व्हायचा. शेवटी शेवटी तिचे हाल मला बघवत नव्हते. मी देवाला प्रार्थना करायचे, की आता तिला जाऊदे. काही दिवसांनी आई गेली. मला दु:ख झालं, पण त्याचबरोबर तिची सुटका झाली याचं बरंही वाटलं.

आई गेल्यानंतर माझं सोशल लाइफ परत सुरू झालं. मी 'हमसफर ट्रस्ट', (मुंबई) मध्ये जाऊ लागले. त्यांच्या 'उमंग' ग्रुपच्या कार्यक्रमांना जाऊ लागले. लोकांना भेटू लागले. एक-दोन नाती प्रस्थापित झाली, पण ती काही टिकली नाहीत. मला वाटतं मला माणसांची पारख अजिबात नाही.

FOR FREE DISTRIBUTION

पुढे मला अजून एक ट्रान्स 'F to M' भेटला. तो ३९ वर्षांचा होता आणि एसआरएस करणार होता. मी आणि तो या विषयावर अभ्यास करायला लागलो. एसआरएस करायची या ठाम निर्णयावर पोचायला अजून ६ महिने लागले. मी ठरवलं, की आता मला माझं आयुष्य जगायचंय.

मी २०१२मध्ये भावाला ईमेलवरून सांगितलं, की मी पुरुष आहे आणि मी एसआरएस करणार आहे. दोन-तीन दिवसांनी त्याला भेटले. त्याला अर्थातच धक्का बसला. तो म्हणाला, ''तू ठरवलं आहेस, तर मी विरोध करून तरी काय होणार?'' त्याचा स्वभाव असा आहे, की 'तू तुझं बघ, मी माझं बघतो.' त्यानी मला विचारलं,

''ऑपरेशननंतर तू लग्न करणार आहेस का? तुला मुलं होतील का?'' पुढे अप्रत्यक्षपणे सुचवलं, की या ऑपरेशनसाठी माझ्याकडून पैशाची अपेक्षा धरू नकोस.

नुकतीच मी एसआरएस प्रक्रियेला सुरुवात केली. माझ्या मित्रांनी मला चांगले डॉक्टर सुचवले. त्या डॉक्टरांनी माझ्या विविध चाचण्या केल्या. त्यानंतर मला टेस्टोस्टेरोनचा ट्रायल डोस दिला. तो ऑइल बेस्ड असल्यामुळे पृष्ठभाग आणि पाय ७–८ दिवस खूप दुखत होते, म्हणून बसायला आणि चालायला त्रास झाला. त्यानंतर मला टेस्टोस्टेरोनचा स्ट्राँग डोस दिला.

हळूहळू चेहऱ्यावर थोडे केस येतील. चांगली दाढी यायला २ वर्षं लागतील. आवाज बसेल. चेहरा जो मुलायम आहे, त्याची 'जॉलाइन' स्ट्राँग होईल. खांदे तर आताच रुंदावू लागले आहेत. ही अशी इंजेक्शन्स मला दर महिन्याला आयुष्यभर घ्यावी लागणार आहेत.

या इंजेक्शन्समुळे मी जास्त आक्रमक झालो आहे. मूड स्विंग्स होताहेत. छोट्या छोट्या गोष्टींवरून राग येतो. काहींना मुरुम पण येतात, चेहरा ऑयली होतो, पण मला तसं झालेलं नाही. मला सारखं 'हॉर्नी' (लैंगिकदृष्ट्या उत्तेजित) वाटू लागलंय. माझ्या शिश्निकेला अनेकवेळा उत्तेजना येते. हे अचानक आणि दिवसातून अनेक वेळा होतं, त्यामुळे मला संकोच वाटतो. इंजेक्शन्समुळे लठ्ठ होऊ नये म्हणून डॉक्टरांनी मला दररोज व्यायाम करायला सांगितला आहे. तीन महिन्यांनी माझ्या परत चाचण्या होतील. ही सगळी प्रक्रिया एक 'रोलर कॉस्टर राइड' आहे. मला ती खूप आवडतेय. माझ्यात नवा जोम आलाय. माझा आत्मविश्वास वाढलाय. तो अगदी माझ्या चालण्यातसुद्धा जाणवतो.

मी एक वर्षानी स्तन काढून टाकायची शस्त्रक्रिया करणार आहे. अंदाजे ५०,०००/–रु. खर्च येईल. अनेक ट्रान्स 'F to M' व्यक्तींना लिंग बसवणं अत्यंत महत्त्वाचं असतं. मलाही त्याचं महत्त्व आहे, पण

FOR FREE DISTRIBUTION

त्या अगोदर मला माझे स्तन काढून टाकायचेत. पुढे पैसे साठवून लिंग, वृषण बसवायची शस्त्रक्रिया करता येईल. त्याला खर्चही खूप आहे. मी त्याच्यासाठी पैसे साठवू लागलो आहे.

प्रश्न आहे कायद्याचा. माझ्यात बदल होऊ लागले आहेत. जसे माझ्यात बदल वाढतील आणि मी पुरुषी दिसायला लागेन, तसं मला स्त्री म्हणून बाहेर वावरणं अजूनच अवघड बनत जाणार आहे. मी हल्ली मॉलमध्ये जाणं सोडून दिलं आहे कारण मला तिथे खूप प्रॉब्लेम येतो. म्हणून लवकरात लवकर मला माझ्या ओळखपत्रकात पुरुष म्हणून बदल करून हवाय. असं मला कळलंय, की काहीजण पूर्ण एसआरएस न करताच ओळखपत्रात हा बदल बेकायदेशीरपणे करतात. कारण त्यांना या मधल्या स्थितीत (म्हणजे एसआरएस चालू आहे, पण पूर्ण झालेली नाही) समाजात राहताना, वावरताना अडचणी येतात. कदाचित मला हे असं बेकायदेशीरपणे करावं लागेल, माहीत नाही.

FOR FREE DISTRIBUTION

एसआरएस झाल्यावर मी लग्न करायचा विचार करीन. अडचण अशी आहे, की लेस्बियनबरोबर नातं ठेवायचं झालं, तर ती तुम्हाला बिछान्यात मुलीसारखं बघते आणि स्ट्रेट मुलीबरोबर जायचं, तर ती मला पुरुष म्हणून स्वीकारणार का? पण हे सगळे पुढचे प्रश्न आहेत. आत्ता तरी फोकस एसआरएस करण्यावर आहे.

मनात एक इच्छा आहे– एसआरएस करून मी जरा सेटल झालो, की मला ट्रान्स लोकांसाठी काम करायला आवडेल. कारण मी आज जिथे आहे त्या प्रवासात माझ्या कम्युनिटीचा मला खूप आधार लाभला आहे. आज मला काही अडचण आली तर, मी हमसफर ट्रस्टकडे मदत मागू शकतो. मला माहीत आहे, की माझी कम्युनिटी मला मदत करेल. उद्या वडिलांनी मला घराबाहेर काढलं तर माझी कम्युनिटी माझी राहायची सोय करेल.

नुकतंच मी माझ्या मॅनेजरला 'आउट' झालो. तिला हा कन्सेप्ट

समजायला खूप जड गेलं, पण हळूहळू ती समजून घ्यायचा प्रयत्न करत आहे. आता मी माझ्या दुसऱ्या मॅनेजरलाही आउट होणार आहे. माझ्या मॅनेजरनी त्याला तशी कल्पना दिली आहे, पण तो ख्रिश्चन आहे. त्याला हे पटायला कदाचित वेळ लागेल, पण मी त्याला समजावून सांगणार आहे, की एवढा मानसिक, शारीरिक आणि आर्थिक त्रास सोसून, मी हे का करतो आहे. कारण मला आता खोटं आयुष्य जगायचं नाही. मी आज ३३ वर्षांचा आहे. आतापर्यंतचं सर्व आयुष्य मुलगी म्हणून जगलो. आता पुढचं संपूर्ण आयुष्य मला पुरुष म्हणूनच जगायचंय.

*****

**टीप :** या आत्मकथेत एसआरएस प्रक्रिया सुरू केल्यापासून पुरुषलिंगी शब्दप्रयोग केला आहे. उदा., ‘मी आलो’.

FOR FREE DISTRIBUTION

# भाग ३– 'M to F' आत्मकथा

**श्रेया** (यवतमाळ)

''काय श्रेया मॅडम, परत पुण्याला यायचा विचार आहे की नाही?'' बिंदु सरांनी खोडकरपणे फोनवरून विचारलं आणि मी उत्तर दिलं, ''येते हो सर, बस थोडा वेळ अजून लागेल.'' ''हरकत नाही वेळ लागला तरी चालेल, पण जे काही करशील ते विचारपूर्वक कर. आम्ही तुझ्यासोबत आहोत.''

फोन ठेवल्यानंतर मला लहानपणीचे दिवस आठवले. मी पाच-सहा वर्षांचा असेन. तो होळीचा दिवस होता. माझ्या घराजवळ असलेल्या हनुमान मंदिरासमोर दरवर्षीप्रमाणे याही वर्षी होळी मांडण्यात आली होती. गल्लीतील सर्वांत मोठी होळी म्हणून मंदिरावर मोठ्या आवाजात लाउडस्पीकर लावण्यात आला होता आणि माझ्यासारखी पाच-सहा वर्षांची मुलं मंदिराच्या ओट्यावर खेळत होती. मोठी मुलं आणि काही मोठी माणसं होळीची सजवासजव करत होती. मीसुद्धा मंदिराच्या ओट्यावर खेळायला गेलो. माझा मोठा भाऊ मोठ्या मुलांसोबत होळीची सजवासजव करत होता.

अचानक लाउडस्पीकरवर गाणं लागलं– ''मेरे हाथों मे नौ-नौ चुडियाँ है, जरा ठेहरो सजन मजबुरीयाँ है''....

त्या गाण्याचे बोल ऐकताच मला काय झाले कोण जाणे, मी अगदी भान हरपून खेळणं सोडून त्या गाण्यावर अगदी श्रीदेवीसारखं नाचू लागलो. गीताचे बोल तर त्या वयात कळत नव्हते, पण बांगड्या घालून नाचणारी श्रीदेवी मात्र कळत होती. एका चित्रपटाच्या गाण्यावर मला बेभान होऊन अगदी मुलीसारखं नृत्य करताना पाहून गल्लीतील सर्व लोक हसायला लागले, पण त्यांची तमा न बाळगता माझं नाचणं सुरूच होतं. सगळे लोक मला पाहून हसत असल्याचं बघून माझ्या मोठ्या भावाला

FOR FREE DISTRIBUTION

अपमानकारक वाटलं. त्यानी रागाच्या भरात माझ्या कानाखाली एक ठेवून दिली आणि कानाला धरून घरी ओढत घेऊन गेला. आईनं मला जवळ घेतलं. मी रडत होतो. मला शांत केलं आणि तिथे जाऊ नको असं सांगितलं.

मला कळतं आणि चांगल्या प्रकारे आठवतं, की मी असा मुलींसारखं वागल्याची ही सगळ्यात पहिली घटना. मला हेसुद्धा आठवतं, की मी लहानपणी खेळत असताना मुलांपेक्षा मुलींमध्येच जास्त रमायचो. मुलांच्या खेळापेक्षा मला बाहुली, खेळभांडे, लगोरी यासारखे मुलींचे खेळच आवडत होते. एकदा तर मी मुलींसोबत फुगडी खेळत होतो म्हणून माझ्या वडिलांनी मला अंगणातून मारत घरात आणलं.

या घटनांनंतर मला चांगलं कळलं होतं, की माझ्या अशा वागण्यामुळे मी मार खात आहे. त्यामुळे मी माझं हे वागणं घरच्यांसमोर येऊ देत नव्हतो आणि इथूनच सुरुवात झाली, माझ्या दुहेरी आयुष्याची.

काही दिवस गेले. सात-आठ वर्षांचा असताना मी काही लहान लहान मुलामुलींबरोबर शेजारच्या घराच्या अंगणात खेळत होतो. तितक्यात त्या घरात राहणाऱ्या काकांनी मला आवाज दिला. तो पंचवीस-सव्वीस वर्षांचा सुशिक्षित तरुण होता. त्याने मला चॉकलेटचं आमिष दाखवून आतल्या खोलीत नेलं आणि मला पलंगावर झोपवून माझी चड्डी खाली ओढली. मी जोराने रडून आरडाओरडा करायला सुरुवात केली. सुदैवाने त्याने घाबरून मला बाहेर सोडून दिलं.

पण या प्रसंगानं अगदी लहान वयात मला नको त्या गोष्टींची ओळख करून दिली. मी माझ्या भावाला हा प्रसंग सांगण्याचा प्रयत्न केला, पण त्यानं मलाच रागवून घरात बसवलं.

कालांतराने मी बारा-तेरा वर्षांचा झालो. शरीर वाढलं, अक्कल वाढली, पण स्वभाव काही बदलेना. मी अजूनही मुलींसारखाच वागायचो. मला मुलींसारखे कपडे घालायला खूप आवडायचं.

FOR FREE DISTRIBUTION

मुलींसारखे दागिने घालायलासुद्धा खूप खूप आवडत होतं.

मी स्वत:ला मुलगा कधीच समजत नव्हतो. माझ्या काल्पनिक जगात मी नेहमी एक मुलगी म्हणूनच राहायचो; पण याच बरोबर माझं हे काल्पनिक जग जर वास्तविक जगासमोर आलं तर मी अडचणीत येईन याची मला जाणीव होती. म्हणून घरात कुणी नसताना मी आईच्या बांगड्या घालून पाहायचो. ताईची ओढणी, तिच्या उंच टाचेच्या सॅन्डल्स घालून पाहायचो. का कोण जाणे, पण हे सगळं करण्यामध्ये मला स्वर्गीय आनंद मिळत होता.

पंधरा-सोळा वर्षांचा झाल्यानंतर एवढं नक्की कळायचं, की आपलं हे वागणं सर्वसाधारण मुलांपेक्षा फार वेगळं आहे. माझ्यातलं हे वेगळेपण माझ्यासमोर बरेच प्रश्न उपस्थित करत होतं. आपण असं मुलींसारखं का वागतो? आपणच का सर्वसाधारण मुलांपेक्षा वेगळे? आपल्यासारखे इतरही काही जण असतील का? जे आपल्याला जाणवतं ते चांगलं की वाईट? आपल्या अशा वागण्यामुळे आपलं भविष्यात चांगलं होईल की वाईट? हे आणि यासारखे अनेक प्रश्न मनाला घोर लावून जायचे. मी तासन्‌तास याबद्दल एकटाच विचार करत बसायचो.

माझ्या सगळ्यात मोठ्या ताईचं लग्न मी पाचवी-सहावीत असतानाच झालं होतं. माझ्या भावात आणि माझ्या वयात तब्बल दहा ते अकरा वर्षांचा फरक आहे. कदाचित त्यामुळेच आमच्यामध्ये मैत्रीचं नातं कधीच निर्माण झालं नाही आणि म्हणूनच मी मला वाटणाऱ्या या प्रश्नांविषयी त्यांच्याजवळ तेव्हा बोलू शकत नव्हतो.

शाळा, अभ्यास, क्लासेस आणि सोबतच माझ्यातलं हे वेगळेपण या सर्वांची सांगड घालता घालता माझी अगदी तारांबळ उडत होती. मला जाणवणाऱ्या वेगळेपणाविषयी, माझ्या लैंगिकतेविषयी माहिती देणारी मासिके, वर्तमानपत्रे, पुस्तके जमा करण्याचा आणि वाचण्याचा मी प्रयत्न करू लागलो.

एकदा सकाळची शाळा आणि क्लासेस वगैरे आटपून मी

FOR FREE DISTRIBUTION

दुपारच्या वेळी टीव्ही पाहात बसलो होतो. मी टीव्ही लावल्या लावल्या त्यावर एक मराठी कार्यक्रम सुरू झाला. समोर काही डॉक्टर्स व इतर मंडळी बसलेली होती. चर्चेचा विषय मानवी लैंगिकतेशी काहीतरी संबंधित होता.

मला हा कार्यक्रम पाहात असताना त्यातील सर्वकाही समजत होतं असं मुळीच नव्हतं. पण का कोण जाणे आपल्याला पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरं त्यातून मिळू शकतील असं जाणवत होतं. मी मन लावून तो कार्यक्रम पाहात होतो. याच कार्यक्रमात माझी बिंदुमाधव खिरे या व्यक्तीशी टीव्हीवरून ओळख झाली. तो संपूर्ण कार्यक्रम मी मन लावून पाहिला. माझ्या बऱ्याच प्रश्नांची उत्तरं मला या कार्यक्रमातून मिळाली पण, अजून अनेक प्रश्न होते.

पुढे मी सतरा-अठरा वर्षांचा झालो. कॉलेजात बारावीला गेलो. गणिताची आवड म्हणून कॉमर्स घेतलं. कॉलेजात येणारी चिकनी मुलं बघितली, की मला त्यांचं आकर्षण वाटायचं. माझ्या वयाच्या मुलांना जशा मुली आवडायच्या तशीच नेमकी मला मुलं आवडायची. मी एक मुलगा असून मला दुसऱ्या एखाद्या मुलाबद्दल वाटणारं आकर्षण पाहून मला स्वत:चंच नवल वाटायचं; पण मनावर कुणाचा ताबा नसतो, हेसुद्धा लवकरच कळून चुकलं.

FOR FREE DISTRIBUTION

मुलांनी आपली टिंगल करणे, आपल्याला उद्देशून कमेन्ट्स पास करणे, विचित्र नजरेनं आपल्याकडे बघणे, कधी कधी तर प्राध्यापकांनीसुद्धा आपल्याबद्दल थट्टा करणे, या सर्व गोष्टींचा मला खूप त्रास झाला, पण धीर सोडला नाही.

बारावीला असताना निरज आणि कौशिक ही बड्या घरची नॉन-मराठी मुलं माझ्या वर्गात होती. त्यापैकी निरज हा मला खूप आवडायचा. दिसायला खूपच हॅन्डसम होता. बड्या घरचा आणि दिसायला इतका हॅन्डसम मुलगा माझ्यासारख्या सर्वसाधारण दिसणाऱ्या आणि मध्यमवर्गीय मुलाशी काय बोलणार म्हणून मग विषयच संपला.

शिवाय निरज आणि कौशिक नेहमी एकत्र राहायचे कारण निरजला फारसं मराठी येत नव्हतं.

एकदा कौशिक आठ-पंधरा दिवसांसाठी सुट्टीवर गेला आणि मग निरजची पंचाईत झाली. मराठी समजायला कठीण जात असल्याने त्याला कदाचित इतर मुलांमध्ये मिसळायला थोडा वेळ लागत होता.

तेवढ्यात एकदा मला कॉलेजात यायला उशीर झाल्यामुळे मी बाहेरच्या आंब्याच्या झाडाखाली बसून होतो. तितक्यात निरज आला. तोसुद्धा उशिरा आला होता. त्यानं मला विचारलं, ''तू बाहर क्यूं बैठा है?'' मी म्हटलं, ''मै लेट हो गया था, इसलिए।'' तो म्हणाला, ''चल ग्राउंड पे घुमके आते है।'' मी चटकन हो म्हटलं. अशा प्रकारे आमची ओळख झाली आणि कौशिक येईपर्यंत घट्ट मैत्री.

निरज अभ्यासात खूपच हुशार होता आणि स्वभावानी तितकाच शांत, समजदार, दुसऱ्यांच्या भावनांचा आदर करणारा आणि बड्या घरचा असूनही मुळीच गर्व नसलेला, अगदी माझ्या स्वप्नातील राजकुमारासारखा. मला बसता, उठता, खाता-पिता अगदी झोपतानासुद्धा त्याचाच विचार मनात असायचा. त्याचं स्वप्न पडून नाइटपँट वीर्याने रात्री ओली होणं, ही तर नेहमीचीच बाब होऊन बसली होती.

तो मला खूप खूप आवडतो ही गोष्ट मी त्याला कधीच जाणवू दिली नाही कारण मला भीती होती, की जर का ही गोष्ट त्याला कळाली आणि ती त्याला आवडली नाही तर तो माझ्याशी बोलणं सोडून देईल आणि मी एका चांगल्या मित्राला गमावून बसेन. मी त्याच्यासोबत जमेल तेवढं मुलासारखं वागण्याचा प्रयत्न करत होतो, जेणेकरून त्याला माझ्याबद्दल काहीही कळू नये.

पुढे बारावीच्या परीक्षा तोंडावर आल्या. निरज तर मेरिटचा स्टुडंट आणि आपल्याला कमी मार्क्स पडले तर त्याला काय वाटेल या विचाराने मीसुद्धा जोमाने अभ्यासाला लागलो. बारावीचा निकाल

FOR FREE DISTRIBUTION

लागला. निरज कॉन्व्हेंटमधून आलेला विद्यार्थी होता त्यामुळे त्याला मराठीतला अभ्यासक्रम कठीण जायचा. त्यामुळे अगदी थोडक्यात त्याचं मेरिट हुकलं. त्याचं मेरिट हुकलं म्हणून मी नाराज झालो. मला सत्तर टक्के गुण मिळाले त्यामुळे माझ्या घरचे मात्र जाम खूश होते.

बारावीनंतर काय करावं हे मला काही सुचेना. कॉलेजात टीसी, (ट्रान्स्फर सर्टिफिकेट) काढायला गेलो असताना तिथं निरज आणि कौशिक भेटले. ते दोघे सी.ए.चं शिक्षण घेण्यासाठी पुण्याला जाणार असं कौशिकनी मला सांगितलं. निरज शांतच होता. तो काहीच बोलला नाही.

मी टीसी घेऊन घरी आलो. मी खूप दु:खी होतो. निरजनी आपल्याला तो पुण्याला जाणार असल्याचं का सांगितलं नाही याचं मला दु:ख वाटत होतं. मला सांगितलं असतं तर मीसुद्धा त्यांच्याबरोबर गेलो असतो. मी स्वत:लाच समजावत होतो आणि आता पुढे काय करायचं याचा विचार करत होतो.

FOR FREE DISTRIBUTION

माझं गाव तालुका स्तरावरचं गाव आहे आणि कॉमर्ससारख्या क्षेत्रात शिक्षण घ्यायचं म्हटलं तर विदर्भातील एका तालुक्यात राहून ते शक्य नव्हतं. आजपर्यंत घर न सोडलेला मी घर सोडून बाहेरगावी म्हणजे मोठ्या शहरात जाऊन कसा राहू हे मला कळत नव्हतं.

शिवाय मी हा असा. मुलांमध्ये मिसळायला मला खूप कठीण जायचं. कुणी आपल्याला रॅगिंग केलं तर? कुणी आपल्याला त्रास दिला तर? कुणी आपला गैरफायदा घेतला तर? असे प्रश्न मनाला भेडसावू लागले. माझ्या अशा लैंगिकतेमुळे मला घर सोडून इतरांमध्ये असुरक्षित वाटायचं.

माझ्या घरच्यांनी मला बारावीनंतर बाहेरगावी राहून शिक्षण घेण्यासाठी बराच दबाव आणला. बाबा मला पुण्याला घेऊन गेले. मॉडर्न कॉलेजला माझी ॲडमिशनसुद्धा करून दिली; पण तिथलं एकंदरीत वातावरण पाहून मला खूपच असुरक्षित आणि एकटं वाटायला

लागलं. मी बाबांना हट्ट करून ॲडमिशन कॅन्सल करायला लावली. माझ्याच गावात त्याच कॉलेजमध्ये बी.कॉम.च्या प्रथम वर्षाला प्रवेश घेण्यास भाग पाडले.

मी एकोणीस वर्षांचा झालो आणि माझ्याच गावातील कॉलेजात बी.कॉम.चा अभ्यासक्रम पूर्ण करू लागलो. गाव तेच, कॉलेज तेच आणि इतर मित्रही तेच, पण सोबत नव्हता तो निरज.

ग्रॅज्युएशनला असताना आमचा सात मित्रांचा छान ग्रुप होता. त्यात चार मुली आणि मी धरून तीन मुलं होती. या ग्रुपमधल्याच दोन मुली शामल आणि स्नेहा माझ्या खूप चांगल्या मैत्रिणी बनल्या. आम्ही तिघं मिळून धमाल करायचो. सोबत अभ्यास, एकमेकांची प्रॅक्टिकल्स पूर्ण करणे, गॅदरिंगमध्ये डान्स करणे हे सर्व काही मनापासून करायचो.

बी.कॉम.च्या शेवटच्या वर्षाला असताना तर आम्ही कहरच केला. सर्व विद्यार्थ्यांमधून एका विद्यार्थ्याला 'स्टुडंट ऑफ दि इयर' हा पुरस्कार देण्यात येत होता. तो मिळवण्यासाठी आमच्या सर्वांमध्ये चढाओढ लागली. मी 'फॅशन शो' या कार्यक्रमाचं संपूर्ण व्यवस्थापन आणि नियोजन केलं. संपूर्ण गॅदरिंगमध्ये माझा फॅशन शो लोकप्रिय ठरला आणि शेवटी त्या वर्षीचं 'स्टुडंट ऑफ दि इयर'चं बक्षीस मला मिळालं. त्यामुळे माझा आत्मविश्वास कमालीचा वाढला आणि माझी बुद्धिमत्ता, माझी इच्छाशक्ती आणि माझी मानसिक ताकद ही माझ्या लैंगिकतेवर अवलंबून नाही, याचा मला पुरावा मिळाला आणि अशा प्रकारे मी बी.कॉम. चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालो.

मी एकवीस वर्षांचा झालो. ग्रॅज्युएट झालो, पण आता पुढे काय? बारावीनंतर जे प्रश्न माझ्या पुढे उद्‌भवले होते, ते प्रश्न आता पुन्हा डोकं वर काढू लागले. आता गावात राहून पुढे काही करणं शक्य नव्हतं. त्यामुळे गाव सोडावं लागेल हे तर निश्चित होतं. पण यावेळी माझ्या सोबतीला होता माझा आत्मविश्वास.

मी चित्रकलेच्या दोन्ही परीक्षा पाचवी-सहावीत असतानाच

FOR FREE DISTRIBUTION

'ए' ग्रेडमध्ये उत्तीर्ण झालो होतो. शिवाय माझं रंगांबाबतचं ज्ञानसुद्धा उत्तम होतं. माझ्यातील कलेच्या जोरावर मी 'ॲनिमेशन' हे क्षेत्र निवडून त्यात करिअर करायचं ठरवलं, पण विदर्भातील एका तालुक्याच्या ठिकाणी आयुष्य काढलेल्या माझ्या वडिलांना 'ॲनिमेशन'सारख्या क्षेत्राबाबत तिळमात्र विश्वासार्हता नव्हती, शिवाय त्यासाठी लागणारा पैसा पुरवण्याचीदेखील त्यांची इच्छा नव्हती. तरीसुद्धा मी पुण्याला जाऊन या क्षेत्राच्या एका इन्स्टिट्यूटला भेट दिली व सर्व माहिती मिळवून माझ्या वडिलांसमोर मांडली, पण वडील तयार झाले नाहीत. शेवटी मला त्या क्षेत्राचा नाद सोडून द्यावा लागला.

कोणत्याही क्षेत्राबाबत विचार करत असताना माझी लैंगिकता समस्या बनून माझ्या समोर उभी राहायची. आपण निवडलेल्या क्षेत्रात आपण आपल्या मनाप्रमाणे कपडे घालून मनाप्रमाणे आपल्याला आयुष्य जगता येईल का? आपण निवडलेल्या क्षेत्रात आपल्याला आपल्यासारखी वेगळी लैंगिकता असणारे लोक भेटतील का? आपल्याला आपल्या आयुष्याचा जोडीदार मिळेल का? हे आणि यासारख्या अनेक प्रश्नांनी आता माझी झोप उडवली होती. मी रात्र-रात्र एकटाच जागून पुढे आपलं काय होणार याचा विचार करायचो.

FOR FREE DISTRIBUTION

एक दिवस सहज टीव्ही लावून पाहात बसलो होतो. कुठल्यातरी मराठी वाहिनीवर एक कार्यक्रम सुरू होता. त्या कार्यक्रमाचं नाव आता आठवत नाही, पण त्या कार्यक्रमाच्या संचालिका रेणुका शहाणे होत्या हे आठवतं. मी आवाज वाढवून तो कार्यक्रम बघू लागलो. त्या कार्यक्रमामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून बिंदुमाधव खिरे यांना बोलावण्यात आलं होतं. रेणुका शहाणे त्यांच्याशी 'मानवी लैंगिकता' या विषयावर चर्चा करत होत्या. काही 'स्टुडिओ ऑडिअन्स'सुद्धा होता. मी तो कार्यक्रम मन लावून पाहिला.

कार्यक्रम पूर्ण पाहून झाल्यावर मी या विषयी विचार करू लागलो, की आधी मला माझ्या लैंगिकतेविषयी पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरं

शोधावी लागतील आणि त्यानुसार पुढची पावलं उचलावी लागतील.

मी बिंदुमाधव खिरे हे नाव 'गुगल'वर टाकून सर्च केलं. 'गुगल'वर शोधता शोधता मला बिंदुसरांनी पुण्यात माझ्यासारख्या लोकांसाठी 'समपथिक' नावाची संस्था स्थापन केली असल्याचं लक्षात आलं. मी संस्थेचा संपूर्ण पत्ता, वेबसाइट, ई-मेल ॲड्रेस आणि फोन नंबर लिहून घेतला.

काही दिवस गेले. मी संस्थेच्या हेल्पलाइनवर फोन लावला. बोलणारे बिंदुसर होते. मी त्यांना माझी समस्या सांगितली. सरांना माझी अडचण लक्षात आली. मी पुण्याला येऊन संस्थेला भेट देण्याची इच्छा दर्शवली.

काही दिवस निघून गेले. मला चैन पडेना. मी पुण्याला जाण्याचं ठरवलं. मी पुण्याला जाण्याचं ठरवल्यानंतर घरी काय सांगायचं हा प्रश्न माझ्यापुढे उभा राहिला.

घरच्यांना खोटं बोलून फसवण्याची माझी इच्छा मुळीच नव्हती. मात्र खरं सांगितलं असतं, तर कधीच जाऊ शकलो नसतो. शिवाय मला जाणवणाऱ्या या वेगळेपणाविषयी मला स्वत:लाच अजून पुरेशी माहिती झालेली नव्हती.

घरच्यांना मी 'एमपीएससी' परीक्षा देण्यासाठी पुण्याला जाऊन क्लासेस करण्याची इच्छा दर्शवली आणि या क्लासेसची माहिती काढण्यासाठी मला पुण्याला जायचं आहे असं सांगून पुण्याला जाण्याची परवानगी काढली. पुण्यात आल्यावर क्लासेसची संपूर्ण माहिती काढली.

दुसऱ्या दिवशी सकाळी दगडूशेठचं दर्शन घेतलं. मग दिलेल्या पत्त्यावर ऑफिस शोधण्याचा खूप प्रयत्न केला. ऑफिस शोधण्यात खूप वेळ गेला. शेवटी एकदाचं सापडलं. थोडा भीतभीतच मी तिसऱ्या माळ्यावर गेलो. काही लोक चकचकीत पांढरे शुभ्र कपडे घालून काहीतरी खात होते. ते कुठलातरी कार्यक्रम नुकताच आटोपून आल्याचं

FOR FREE DISTRIBUTION

मला जाणवलं. विचारपूस केल्यानंतर कळलं, की संस्थेचं दुसरं ऑफिस पिंपरी-चिंचवड येथे उघडलं होतं आणि हे लोक त्याच्या उद्‌घाटन समारंभातून नुकतेच आले होते. त्यांनी माझी विचारपूस केली. मी सरांना भेटण्याची इच्छा दर्शवली, पण तेव्हा ते पुण्याच्या ऑफिसला नव्हते.

दुसऱ्या दिवशी, परत लवकर आटपून संस्थेच्या ऑफिसवर गेलो. सरांना भेटलो. माझं शिक्षण, माझं पूर्वायुष्य, भविष्याबाबतचे विचार आणि या क्षेत्रातील माहिती इ. मुद्द्यांवर सरांनी आणि मी चर्चा केली. सरांनी मला संस्थेचं कार्य आणि या क्षेत्राबाबत माहिती सांगितली. मी सरांना माझ्या 'एमपीएससी' क्लासेसबाबत सांगितलं आणि पुण्यात राहण्यासाठी जागा शोधत असल्याचं सांगितलं. सरांनी चर्चेत टिनेशला (प्रोजेक्ट मॅनेजर) सहभागी करून घेतलं आणि माझ्यासाठी राहण्याची जागा शोधायला मला मदत करण्यास सांगितलं. टिनेशही मदत करायला तयार झाले.

गावी जाऊन दहा-पंधरा दिवसांनी परत पुण्याला आलो. टिनेश आणि मिलिंद यांच्या मदतीने एका प्रायव्हेट होस्टेलवर रूम बुक केली. मला काळजी लागली होती ती पुण्यात राहायची. मुलांच्या होस्टेलमध्ये कसं ॲडजस्ट करायचं? रूम पार्टनर चांगला नसला तर? आपलं रॅगिंग झालं तर? मुलांनी आपल्याला होस्टेलमध्ये राहू दिलं नाही तर? अशा प्रश्नांनी मनात गर्दी केली होती. शेवटी विचार केला, पुढे जायचं असेल तर अशा गोष्टींना न भिता धैर्याने तोंड दिलंच पाहिजे.

FOR FREE DISTRIBUTION

पुण्यात होस्टेलचा पहिला दिवस. नेहमीप्रमाणे मी सकाळी सहा वाजता उठून अंघोळ करून तयार झालो. पण नंतर कळलं, की होस्टेलमध्ये सकाळ जरा उशिराच होते. माझ्या या गफलतीमुळे मला एक गोष्ट लक्षात आली, की इतर मुलांचा संपर्क टाळायचा असेल तर लवकर उठून तयार व्हायचं. कुणाचा संबंध नको आणि कुणाशी मैत्रीही नको.

दुपारी बारा ते पाच वाजेपर्यंतचा क्लास संपवून होस्टेलवर परत

आलो. एक तिशीतील पुरुष माझ्या रूममध्ये अर्ध्या चड्डीत लॅपटॉप उघडून बसला होता. विचारपूस केल्यावर कळलं, की तो माझा रूम पार्टनर होता. त्याने नाव, गाव विचारलं आणि म्हणाला, ''माझा एक फ्लॅट आहे, पण अजून काम पूर्ण झालेलं नाही त्यामुळे इथे राहतो. पण मी ज्या शाळेत नोकरी करतो ती फ्लॅटपासून जवळ आहे. त्यामुळे मी तिथेच झोपेन, अधूनमधून सुट्टीच्या दिवशी होस्टेलवर येत जाईन.'' पुढे मला म्हणाला, ''माझ्या या वस्तूंपैकी तुला हव्या त्या तू वापर, पण त्या परत नीट ठेवत जा आणि रूम स्वच्छ ठेवत जा.'' मी 'हो' म्हणून, मनातल्या मनात रूम एकट्याला वापरायला मिळेल म्हणून आनंदी झालो. शिवाय त्याच्यासमोर कपडे बदलायलासुद्धा नको. मला इतर मुलांसमोर कपडे बदलायला खूप लाज वाटते. होस्टेलच्या बाबतीत मला नशिबानं साथ दिली. सगळं कसं मनासारखं झालं. होस्टेलचं व माझं गणित मस्त जुळलं.

आता मी पुन्हा ऑफिसला भेट देण्याचं ठरवलं. मंगळवारी माझा क्लास सकाळी सात ते बारा असायचा. मी मंगळवारी क्लास करून ऑफिसवर गेलो.

ऑफिसवर गेल्यावर सरांनी मला त्यांचं पहिलं पुस्तक 'पार्टनर' याची एक प्रत वाचायला दिली. मी सरांनी दिलेलं पुस्तक वाचलं. पुढच्या काही दिवसांत संस्थेच्या लायब्ररीतली इतरही काही पुस्तकं वाचली. मला या विषयाची माहिती होऊ लागली. मी क्लास संपवून वारंवार ऑफिसला जायचो. ऑफिसमधल्या सगळ्यांची चांगली ओळख झाली. सगळ्यांनी मला खूप मदत केली. आपापसातील चर्चेतून मला असणारे माझ्या लैंगिकतेबाबतचे पूर्वग्रह दूर झाले. शिवाय आपल्यासारखेच कठीण आयुष्य जगणारे इतरजण पाहून मनात धैर्य निर्माण झालं. आत्मविश्वास वाढला.

काही दिवस गेल्यानंतर मी सरांना संस्थेत काम करण्याची इच्छा दर्शवली. सरांनी होकार दिला, पण क्लासेसही नीट सुरू ठेवण्याची

FOR FREE DISTRIBUTION

ताकीद दिली, कारण घरच्च्यांना मी अशा संस्थेत काम करत असल्याचे सांगणार नव्हतो. घरच्यांच्या लेखी मी पुण्यात फक्त क्लासेसच करत होतो.

सरांनी मला 'पीअर एज्युकेटर'च्या पोस्टवर ऑफिसमध्ये कामावर घेतलं. दिवसभर क्लास आणि सायंकाळी सात ते रात्री नऊ नोकरी असं मस्त गणित जुळलं होतं.

एक दिवस क्लासमध्ये एका विषयाला नवीन शिक्षक आले. आपला पहिला दिवस म्हणून त्यांनी सर्वांना नाव, गाव इ. प्रश्न विचारले. माझं राहणीमान, बोलण्याची पद्धत, वागण्याची ढब इत्यादी बाबींवरून त्या सरांना माझ्या वेगळेपणाची जाणीव झाली. त्यांनी मला क्लास संपल्यानंतर ऑफिसमध्ये भेटण्यास सांगितलं. का कोण जाणे मी यावेळी घाबरलो नाही. क्लास सुटल्यानंतर त्यांना भेटायला गेलो. सरांनी मला बसवलं आणि माझी खोलवर विचारपूस केली. मी त्यांना सडेतोड उत्तरं दिली. शेवटी त्यांनी विचारलं, ''तुझं राहणीमान असं का आहे?''
''सर, मी शरीराने एक मुलगा असून, मी स्वत:ला मुलगी मानतो. लैंगिक दृष्टीने मला मुलंच आवडतात. शिवाय मी अशी लैंगिकता असणाऱ्या लोकांशी संबंधित असलेल्या एका संस्थेत काम करतो. आणि मला यात काहीही गैर वाटत नाही.'' त्या सरांनी 'ठीक आहे' असं उत्तर देऊन मला जायला सांगितलं.

FOR FREE DISTRIBUTION

त्या दिवशी क्लास आटपून ऑफिसला गेल्यानंतर मी हा सगळा प्रकार टिनेशला व सरांना सांगितला. सरांना आनंद झाला. मी पहिल्यांदा कुणालातरी एवढ्या धिटाईने आपली लैंगिकता सांगितल्याचे पाहून सरांनी मला माझ्यातल्या वाढलेल्या आत्मविश्वासाची जाणीव करून दिली.

ऑफिसमध्ये सगळ्यांनी माझं नाव प्रेमानं 'श्रेया' ठेवलं. मलाही त्यांनी हे ठेवलेलं नाव खूप आवडलं. आपल्यासारख्या लोकांमध्ये राहून, खाणंपिणं, थट्टा-मस्करी यात दिवस कसे अगदी आनंदात जात

होते.

काही महिने गेले. माझा 'एमपीएससी' क्लासेसचा कोर्स सहा महिन्यांचाच होता. क्लासचा शेवटचा एक महिनाच शिल्लक होता. आता माझ्यापुढे प्रश्न होता, की घरच्यांना हे सगळं सांगू कसं? पण याच्या पुढे जे घडलं ते पाहून वाटतं, की जे होतं ते नेहमी चांगल्यासाठीच होत असतं.

संध्याकाळची वेळ होती. ऑफिस बंद करून आम्ही सर्व पीअर लोक बिटवर जाण्यासाठी सोबतच बाहेर पडलो. नेहमीप्रमाणे माझ्या सोबत मिलिंद, पायल, विजय आणि मी असे आम्ही चौघेजण होतो. पायल सलवार घातलेला एक हिजडा होता. मी पायलशी बोलण्यात दंग होतो. तेवढ्यात एक मुलगा गाडी घेऊन आमच्या समोर येऊन थांबला. तो मुलगा माझ्या गावाकडचा होता. शिवाय ग्रॅज्युएशनला असताना तो माझ्या वर्गातच होता. त्यामुळे त्याला माझ्या बायकी स्वभावाची चांगलीच ओळख होती. त्याने जाणूनबुजून मला थांबवून माझी विचारपूस केली. तू पुण्यात कसा? आणि कुठे राहतोस? अशा प्रश्नांची यादीच त्याने सुरू केली. "माझ्याकडे वेळ नाही आपण नंतर भेटू" असं म्हणून मी तिथून पळ काढला. ती वेळ तर मी कशीबशी मारून नेली, पण नंतर मात्र मला पुढचा विचार करून घामच फुटला. आता पुढे काय? या विचाराने मला रात्रभर झोपच येईना. मी विचार केला, याने गावी जाऊन मला हिजड्याबरोबर बुधवार पेठेत पाहिल्याचं सांगितलं तर गावाकडले ऐकणारे तर चुकीचाच अर्थ काढतील. कारण पुण्यातील बुधवार पेठ हा रेडलाइट एरिया म्हणून आमच्या गावाकडे ओळखला जातो. मी अधिकच काळजीत पडलो. कारण मला भीती होती, की हा गावाकडे जाऊन आधी आमच्या मित्रांना सांगणार आणि ते मित्र मग माझ्या घरच्यांना सांगणार. असला काही अनर्थ होण्याच्या आत यावर काहीतरी उपाय केला पाहिजे.

दुसऱ्या दिवशी सकाळीच मी माझ्या मोठ्या भावाला गावी फोन

FOR FREE DISTRIBUTION

लावला आणि पुण्याला मला भेटायला बोलावलं. मी भावाला सगळं काही सांगायचं ठरवलं. फोनवरचं माझं बोलणं ऐकून भावाच्या लक्षात आलं, की काहीतरी गडबड आहे. त्यानी लगेच पुण्याला येण्यास होकार दिला.

दोन दिवसांनी माझा भाऊ पुण्यात आला. सकाळी अंघोळ वगैरे आटपून मी त्याला शनिवार वाडा दाखवायला घेऊन गेलो. शनिवार वाड्यात बसून, मी त्याला माझ्याबरोबर घडत असलेला सगळा प्रकार सांगितला. माझ्या पूर्वायुष्यात घडलेल्या घटनादेखील मी त्याला सांगितल्या, पण या सर्वांवर त्याचा विश्वास बसेना. त्याने ''तू तसा नाहीच आणि असला तरी तू स्वत:ला बदलू शकतोस.'' असं मला बजावून सांगितलं. मी त्याला माझं म्हणणं पटवून देण्याचा आटोकाट प्रयत्न केला. शेवटी मी त्याला मी काय करावं असं विचारलं. तो मला म्हणाला, ''तू आधी संस्था सोड. या लोकांमध्ये राहून राहून तू सुद्धा तसाच असल्याचा भास तुला होतोय.'' मी म्हणालो, ''मी तर संस्थेच्या संपर्कात गेल्या सहा महिन्यांपासून आलोय आणि त्याच्या आधीसुद्धा मी असाच होतो, जसा आज आहे. शिवाय या संस्थेचा शोध मी लावलाय. मी जाऊन त्यांच्यात मिसळलो. ते नव्हते आले माझ्याकडे.'' पण तो काही केल्या ऐकेना, म्हणाला, ''तू क्लास सोड आणि आधी आपल्या गावी चल. मी तुला हवी ती मदत करतो. आपण मिळून हा प्रश्न सोडवू.'' माझ्याकडे त्यावेळी त्याचं ऐकण्याखेरीज इलाज नव्हता, कारण एका दिवसात त्याने मला स्वीकारणं शक्य नव्हतं.

माझा भाऊ मला एका मानसोपचारतज्ज्ञाकडे घेऊन गेला. तेथे मानसोपचारतज्ज्ञांनी माझ्या काही टेस्ट घेतल्या आणि दहा दिवसांनी रिपोर्ट्स घेऊन जायला सांगितलं. माझ्या भावाचा स्वत:चा व्यवसाय आहे. त्यामुळे त्याला पुण्याला इतके दिवस राहणं शक्य नव्हतं. त्यानी मला चार दिवसांनी जाऊन रिपोर्ट घेण्यास सांगितलं. मी त्याला संस्थेचं ऑफिस पहायला चल म्हणून म्हणालो. तो रविवारचा दिवस होता.

FOR FREE DISTRIBUTION

त्यामुळे ऑफिस बंद होतं, पण मी सरांना फोन लावून ऑफिसला बोलावून घेतलं.

सरांनी माझ्या भावाला खूप समजावून सांगितलं, की माझे जबरदस्तीने लग्न लावून किंवा कोणत्याही प्रकारचा दबाव टाकून हा प्रश्न सुटणार नाही. माझ्या भावानी तेवढ्यापुरता होकार दिला आणि ऑफिस पाहून संध्याकाळी माझा भाऊ गावाला परत गेला.

याच दरम्यान आमच्या संस्थेकडे नवीन प्रोजेक्ट आला. सरांनी मला त्या प्रोजेक्टच्या अकाउंटन्टची पोस्ट ऑफर केली. ''मी विचार करतो मला थोडा वेळ द्या'' असं मी त्यांना म्हटलं.

दोन-तीन दिवसांनी माझ्या भावाने मला फोन केला आणि मला माझा उरलेला एका महिन्याचा क्लास आणि समपथिकची नोकरी दोन्ही सोडून गावाकडे निघून येण्यास सांगितलं. परत गावी माझी जाण्याची इच्छा नसतानाही त्याने माझ्यावर दबाव टाकला.

नवीन आलेल्या प्रोजेक्टमधील अकाउंटन्टच्या पोस्टवर सध्या कामाला लागणे मला शक्य नाही, असं सरांना सांगून, मी समपथिकचा निरोप घेतला. ऑफिस सोडताना परत येता येणार की नाही, या विचारानी माझं मन भरून आलं. मी सरांच्या जवळ त्या दिवशी खूप रडलो. सरांनी मला खूप समजावलं आणि मला कुठल्याही परिस्थितीत कोणतीही मदत करण्याचा विश्वास दिला. दिवाळीच्या आदल्या दिवशी मी पुणं सोडून परत गावी आलो.

आता मला काळजी होती, की घरच्यांना हे सर्व सांगू कसं? कारण माझी आई फारच हळव्या स्वभावाची आहे. मला अगदी ताप जरी आला तरीसुद्धा ती रडायला लागते आणि माझे वडील तर फारच तापट स्वभावाचे आहेत. ते माझं ऐकून तरी घेतात, की नाही याबाबत मला शंकाच होती.

घरी आल्यानंतर मी दिवाळसणातच माझा विषय काढला तर दिवाळीच्या रंगाचा बेरंग होईल, म्हणून मी थोडे दिवस शांत बसलो.

FOR FREE DISTRIBUTION

घरच्यांसमोर हा विषय काढला नाही. माझ्या भावानेदेखील आईवडिलांना याबाबत काहीही सांगितलेलं नव्हतं.

दिवाळी झाल्यावर मी माझा विषय काढण्यासाठी योग्य ती वेळ शोधू लागलो. पण तेवढ्यात आईची तब्येत फारच सिरिअस झाली आणि अशा परिस्थितीत माझा विषय काढावा म्हणजे अनर्थाला आमंत्रण होतं, म्हणून परत काही दिवस जाऊ दिले.

'आउट' होण्याच्या या प्रक्रियेमध्ये कोणताही अनर्थ होऊ नये म्हणून योग्य वेळ, योग्य परिस्थिती आणि योग्य व्यक्ती या तिन्ही बाबींचा फारच बारकाईने विचार करावा लागतो. प्रत्येकाच्या घरचं वातावरण, मोठ्या माणसांची समजून घेण्याची तयारी, इत्यादी सर्व बाबी योग्य पद्धतीने तपासून पाहून मगच निर्णय घ्यावा लागतो. प्रत्येकाच्या कुटुंबाची मानसिकता, आर्थिक परिस्थिती, समाजातील स्थान या सर्व व्यक्तीनुसार बदलणाऱ्या बाबी आहेत. या सर्वांचा विचार करून हळूहळू एक एक पायरी पूर्ण करून मगच डोंगराचा माथा गाठता येतो. एका दिवसात संपूर्ण जगाने आपल्याला स्वीकारावं, अशी आपली अपेक्षा असते. परंतु या उलट 'आउट' होण्याच्या या प्रक्रियेमध्ये प्रत्येक गोष्ट योग्य पद्धतीने होण्यासाठी, त्या गोष्टीला योग्य वेळ देणं फार महत्त्वाचं असतं आणि मला माझं घर, माझी माणसं तोडायची नव्हती. त्यामुळे मी प्रत्येक बाबतीत संयमाने आणि धीराने काम घेत होतो.

आईचं आजारपण आटोपल्यानंतर लगेच माझ्या मावसबहिणीचं लग्न ठरलं. ती माझी लहानपणापासून बहीण कमी आणि मैत्रीण जास्त. शिवाय तिला वडील नाहीत म्हणून ती लहानपणापासून शिक्षणाकरता आमच्याच घरी राहिलेली. तिचं लग्न माझे आईवडीलच पुढाकार घेऊन लावून देणार होते. काही दिवसांनी माझ्या मावसबहिणीचं लग्न झालं. आता माझ्याकडे माझा विषय मांडायला योग्य वेळ होती.

मी माझ्या सख्ख्या मोठ्या बहिणीला आधी ही गोष्ट सांगितली. भावाप्रमाणेच तिच्यासमोरसुद्धा मी माझं संपूर्ण आयुष्य मांडलं. तिनं

FOR FREE DISTRIBUTION

तेवढ्यापुरतं ते ऐकून घेतलं, पण भावाप्रमाणे तीसुद्धा माझी ही गोष्ट मानायला तयार नव्हती. तिच्या लेखी मी ग्रॅज्युएशनपर्यंत चांगला होतो. नंतर पुण्याला जाऊनच मी बदललो. तिने तर मला साफ सांगितले, की मी माझी आईवडिलांची जबाबदारी झटकू पाहतोय आणि आपल्या आईवडिलांप्रति असलेल्या कर्तव्याला न जुमानता मी भलतंच काहीतरी करतोय. ती म्हणाली, ''तुला पुण्याला एमपीएससी क्लासेस करायला पाठवलं होतं, पण तू दुसरंच काहीतरी शिकून आलास.'' मला आईवडिलांना धोका देणारा धोकेबाज ठरवून ती साफ मोकळी झाली.

मी तिला समजावून थकलो, की मी आईवडिलांची जबाबदारी झटकत नाही आहे. मी तर फक्त माझ्या आयुष्यातले काही प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करतोय; पण ती काही ऐकेना. सरतेशेवटी मी तिला म्हणालो, ''तुला पटो, अगर न पटो, मी आईवडिलांना ही गोष्ट सांगणार आहे.''

नंतर परत दोन-तीन दिवस जाऊ दिले आणि मी आई, वडील, मोठी बहीण, मोठा भाऊ आणि माझे भावजी यांना बसवून सर्वांपुढे माझ्या आयुष्याचा पाढा वाचला. आईला फार दुःख झालं. ती फक्त रडत होती. वडील रडले नाहीत, पण रागावलेसुद्धा नाहीत.

त्या सर्वांनी मिळून मला एकच गोष्ट सांगितली, ''ठीक आहे. तू आहेस तसा आम्हाला प्रिय आहेस, पण मुलाच्या वेशात आपल्या घरीच राहा.'' मला जाणीव होती, की अगदी पहिल्याच वेळी काही ही मंडळी मला संपूर्णपणे स्वीकारणार नाहीत. पण माझा जो सर्वांत मोठा उद्देश होता, की कुठल्याही प्रकारची टोकाची भूमिका न घेता माझ्या घरच्या लोकांनी माझं म्हणणं ऐकून घ्यावं आणि माझ्या आईवडिलांना हा धक्का सहन व्हावा, तो मात्र पूर्णपणे साध्य झाला.

आता माझ्या आईवडिलांना माझ्या लैंगिकतेविषयी पूर्णपणे जाणीव झालेली होती. पण माझ्या अशा वेगळ्या लैंगिकतेबद्दल बोलणं ते फारसं पसंत करत नव्हते.

FOR FREE DISTRIBUTION

मी पुण्याला जाऊन कुठलेही वाईट काम करत नव्हते, हे सिद्ध करण्यासाठी आणि मी काम करत असलेल्या संस्थेतील लोकांशी भेट घालून देण्यासाठी मी माझ्या आईवडिलांना पुण्याला न्यायचा हट्ट केला.

मी बिंदुसरांशी आईवडिलांना पुण्यात आणण्याविषयी फोनवर प्रस्ताव मांडला. बिंदुसरांनी या प्रस्तावाचे स्वागत केले. पुण्याला जाण्यासाठी मी आईवडिलांना तयार केले. वडिलांची अजिबातच इच्छा नव्हती, परंतु माझ्या आईच्या हट्टापायी त्यांनी पुण्याला येण्याचे मान्य केले.

आम्ही पुण्यात आल्यावर समपथिकच्या ऑफिसमध्ये गेलो. ऑफिसमध्ये सर्वजण माझ्या येण्याची आतुरतेने वाट पाहत होते. तेथे गेल्यानंतर मी सर्व स्टाफची आईवडिलांशी ओळख करून दिली. टिनेश, मिलिंद, पायल, परीक्षित यांनी माझ्या आईवडिलांना संस्थेच्या कार्याबाबत माहिती दिली.

थोड्याच वेळात बिंदुसर आले. त्यांनी माझ्या आईवडिलांना आपली ओळख करून दिली. माझ्याविषयी चर्चा करण्यासाठी आईवडिलांना बिंदुसरांनी ऑफिसमध्ये नेलं. बंद दरवाजामागे आईबाबा आणि बिंदुसरांनी चर्चा केली.

नंतर बिंदुसरांनी मलासुद्धा बोलावून घेतलं. बिंदुसरांनी आईबाबांना बरंच समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. आई नेहमीप्रमाणे रडत होती आणि मी 'असा' असण्याबद्दल तिला तिळमात्रही कल्पना नसल्याचे सांगत होती.

निरोपाची वेळ आली. आई पायलच्या गळ्यात पडून रडत होती. सर्वांना नमस्कार करून आम्ही समपथिकचा निरोप घेतला. आईबाबांना दु:ख देण्याचा माझा मुळीच हेतू नव्हता, पण माझ्या वेगळ्या जगाची ओळख करून देणं तितकंच गरजेचं होतं.

काही दिवसांनी मी माझ्या गावी एमएसएम लोकांवर काम

FOR FREE DISTRIBUTION

करणाऱ्या एका संस्थेमध्ये अकाउंटन्ट या पदावर नोकरीला लागले. घरचे अजून माझ्यावर नाराजच आहेत. वहिनी माझ्याशी बोलत नाही, आई मात्र बोलते. बघू पुढे काय होतं ते!

*****

**टीप :** श्रेयानी ती ट्रान्सजेंडर आहे हे घरच्यांना सांगितल्यापासून स्त्रीलिंगी शब्दप्रयोग केला आहे. उदा., 'मी आले'.

FOR FREE DISTRIBUTION

## **अबिना** (मुंबई)

मी मुंबईत एका मध्यमवर्गीय कुटुंबात जन्माला आलो. माझ्या आईचे आईवडील औरंगाबादचे, आणि माझ्या वडिलांचे आईवडील लांजा (रत्नागिरीचे). माझे वडील मी ५ वर्षांचा असताना वारले. त्यांचा एक काळा-पांढरा फोटो मी वीस वर्षांचा असताना पहिल्यांदा बघितला.

मी दहा वर्षांचा होईतोवर आईनी मला एकहाती वाढवलं. त्यानंतर तिनं परत लग्न केलं. लग्नाच्या वेळी तिला माहीत नव्हतं, की माझे सावत्र वडील विवाहित होते आणि त्यांना दोन मुलं होती.

माझे सावत्र वडील पुढची वीस वर्षं आमच्याबरोबर राहिले आणि मग विभक्त झाले. माझी आई काम करायची. मला वाढवण्याचं बहुतांशी श्रेय शेजारच्यांना आणि आमची मोलकरीण 'जयाताई'ला जातं.

माझे जन्मदाते वडील 'ढोलकी' हे अस्सल महाराष्ट्रीयन वाद्य वाजवत आणि माझी आई एक यशस्वी नर्तिका होती. त्यामुळे नाच आणि ताल हे माझ्या रक्तातच होतं म्हणाना. पण माझ्या आईनी मला कधीही नाच शिकवला नाही. कारण पुरुषांनी नाच करणं हे कमीपणाचं समजलं जातं.

मी मात्र एकलव्यासारखा तिचा रंगमंचावरचा प्रत्येक प्रोग्रॅम बघायचो. बारीक निरीक्षण करायचो आणि तिच्या अदांचा एकांतात रियाज करायचो. कधी कधी मी आईचे कपडे घालून आजूबाजूच्या मुलींसाठी 'शो' करायचो. लहानपणापासून मी खूप बायकी होतो आणि माझा बहुतेक वेळ घरातच खेळण्यात जायचा. मला मेक-अप आणि दागदागिन्यांची खूप हौस़ होती.

माझे वडील दिवसभर कामावर जात आणि खूप उशिरा घरी

FOR FREE DISTRIBUTION

येत. त्यामुळे बहुतांशी वेळ ते घरी नसायचे. लहानाचं मोठं होताना मला वडिलांचा सहवास फार कमी मिळाला. माझ्यासाठी आईच माझी हिरोइन होती आणि मला तिच्यासारखं बनायची इच्छा होती.

एके दिवशी आईला बरं वाटत नव्हतं, म्हणून ती अचानक लवकर घरी आली. तिला दिसलं, की मी साडी घालून शेजारच्या एका मुलासमोर नाचत आहे. तिला भयंकर राग आला आणि तिने मला खरपूस चोप दिला. त्या रात्री तिने मला हजारदा तरी देवासमोर या कृत्याबद्दल माफी मागायला लावली.

मला अपराधी वाटत होतं, पण त्याचवेळी मनात विचार येत होता, की मी काय चुकीचं केलं? त्या दिवसापासून माझ्या पालकांनी माझ्यावर पाळत ठेवली. मला सांगण्यात आलं, ''इतर मुलांबरोबर बाहेरचे खेळ खेळत जा.'' माझा आवाज आणि हातांच्या अदांवर माझ्या आईनी आणि सावत्र वडिलांनी नियंत्रण ठेवण्यास सुरुवात केली.

तरीसुद्धा आजूबाजूची मुलं मला 'बायल्या' म्हणून चिडवायची. माझी सावत्र बहीण आणि माझा एक आवडता खेळ होता. मी साडी घालायचो आणि पळायचो. ती माझ्या मागे धावायची आणि माझी साडी हाती लागली, की ती ओढायचा प्रयत्न करायची. लहानपणापासून मी असा होतो!

वयात आल्यावर शाळेतील मित्र मुलींबद्दल बोलू लागले. मला मुलांमध्ये अर्धी चड्डी आणि अर्ध्या बाह्यांचा शर्ट घालायला खूप लाज वाटत होती. मुलींचा जो गणवेश होता– पांढरा शर्ट, निळा स्कर्ट आणि लांब वेण्या मला खूप मोहून टाकायच्या. अर्थात हे मी कोणाला सांगू शकत नव्हतो.

मी १२ वर्षांचा असताना तारुण्यात आलो आणि लक्षात आलं,

FOR FREE DISTRIBUTION

की मी माझ्या जिगरी दोस्ताच्या प्रेमात पडलो आहे. मला तो भावनिकदृष्ट्या आणि लैंगिकदृष्ट्या खूप आवडायचा. पण तो एका मुलीच्या मागे असल्याने मला खूप मत्सर वाटायचा. मला कळायचं नाही, की याला मुलींबद्दल का आकर्षण आहे? माझ्याबद्दल आकर्षण का नाही?

हळूहळू मी माझ्या आजूबाजूच्या मुलांबरोबर लैंगिक प्रयोग (नॉन-पेनिट्रेटिव्ह सेक्स) करू लागलो. एका मुलानी माझ्या वर्तनाबद्दल माझ्या पालकांना सांगितलं. परत एकदा मला चोप मिळाला. मला परत एकदा देवाला, 'मला माफ कर' म्हणून प्रार्थना करायला लावली. यानंतर घरचे माझ्यावर अत्यंत बारीक नजर ठेवू लागले.

१३व्या वर्षापासून मी मित्रांबरोबर ब्ल्यू फिल्म्स बघू लागलो. मला ब्ल्यू फिल्म्समधील पुरुषांना बघायला आवडायचं पण गे किंवा लेस्बियन ब्ल्यू फिल्म्स बघायला मला नाही आवडायचं. भिन्नलिंगी कलाकारांची ब्ल्यू फिल्म बघताना, मी त्या स्त्रीच्या जागी आहे अशी कल्पना करायचो.

FOR FREE DISTRIBUTION

या वयात मला लैंगिकता, संभोग, पुरुषांची आणि स्त्रीची शरीररचना, हस्तमैथुन अशा अनेक विषयांबद्दल असंख्य प्रश्न होते, पण शाळेत मला याच्याबद्दल काहीच शिक्षण मिळालं नाही. याबाबतची माहिती मी 'प्रौढांसाठी' असलेल्या मासिकांमधून मिळवायचा प्रयत्न करायचो. ही माहिती गोळा करताना जाणवत होतं, की मी इतरांपेक्षा वेगळा आहे.

शाळा संपल्यावर मी बांद्र्याला एका 'पॉश' कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. मराठी मीडिअममधून एकदम इंग्रजी मीडिअममध्ये आल्यामुळे पहिले सहा महिने खूप अवघड गेले. मित्रांच्या मदतीने मी इंग्लिश

शिकायची धडपड चालू ठेवली आणि फर्स्ट क्लासमध्ये १२वी पास झालो.

या दरम्यान मला कोणीही माझ्यासारखा मित्र नव्हता. मला माझ्यासारखी मंडळी कुठे जमतात, कुठे भेटतील हे काहीही माहीत नव्हतं. या एकटेपणामुळे मला नैराश्य येऊ लागलं. कॉलनीतील एक-दोन मुलांबरोबर लैंगिक संबंध व्हायचे आणि त्याचा खूप अपराधीपणा वाटायचा. कालांतराने त्यांना त्यांच्या गर्लफ्रेंड्स मिळाल्या. त्यांचे माझ्याबरोबरचे लैंगिक संबंध कमी होत गेले. दिवसेंदिवस मी एकटा पडत गेलो. आपल्या लैंगिक वर्तनाची शरम आणि एकटेपणापासून आलेलं नैराश्य यातून मनात आत्महत्येचे विचार येऊ लागले. दोनदा मी आत्महत्येचा प्रयत्नही केला.

मी एकलकोंडा झालो. आईवडिलांशी संवाद बंद झाला. सारखा विचार करून माझं सतत डोकं दुखायचं. माझी लैंगिकता आणि लिंगभाव यांचा विचार करून करून माझं डोकं फुटायची वेळ आली. माझ्या पालकांनी मला भाभा हॉस्पिटलमध्ये नेऊन चेक-अप केलं, पण काहीच निदान झालं नाही. कारण माझ्या मनातलं द्वंद्व मी कोणासमोरही मांडलं नव्हतं. शेवटी तिथल्या समुपदेशकानं सुचवलं, की मला जेव्हा असा डोकेदुखीचा त्रास होईल तेव्हा मी अंधाऱ्या खोलीत थोडा वेळ पडून राहावं!

अशा परिस्थितीत मी पार्ट-टाइम काम करून मी माझं पदवीधर शिक्षण पूर्ण केलं. मी पार्ट-टाइम नोकरी आणि शिक्षण यांच्यात व्यस्त आहे हे बघून आईला चांगलं वाटायचं.

ग्रॅज्युएशननंतर घरच्यांचा आग्रह होता, की मी सरकारी नोकरी शोधावी. मला मात्र कला, नाच, मेक-अप आणि गाणं यात आवड

FOR FREE DISTRIBUTION

होती. मी सॉफ्टवेअर मॅनेजमेंटमध्ये डिप्लोमा पूर्ण केला आणि एका कम्प्युटर मॅनेजमेंट संस्थेत काम करू लागलो. हे सगळं होताना माझ्या मनातलं काहूर सुरूच होतं. मी 'नॉर्मल' आहे असा एकही संदेश माझ्यापर्यंत पोचलेला नव्हता.

कम्प्युटर इन्स्टिटय़ूटमध्ये काम करणारी प्रिती माझ्या प्रेमात पडली. मी तिला माझ्या मनातील संघर्ष सांगू शकत नव्हतो. ती स्वभावानी खूप चांगली होती त्यामुळे तिला एकदम दूरही करता येत नव्हतं. आम्ही एकमेकांना भेटत राहिलो आणि मी हे नातं मोडण्यासाठी साजेसं कारण शोधत राहिलो.

हे नातं फार काळ टिकलं नाही. तिची अपेक्षा होती, की मी तिच्या दोन छोट्या भावांना आणि बहिणींना सांभाळावं. हे मला शक्य नव्हतं. तिच्या घरचेही तिच्यासाठी चांगली स्थळं शोधत होते. मी तिला फारसा प्रतिसाद देत नव्हतो. एके दिवशी ती आली आणि म्हणाली, की एक इंजिनिअर तिला बघायला येतोय, तर तिने त्याला होकार द्यावा का? मी दु:खी झाल्याचं नाटक केलं आणि तिला बाय बाय केलं.

FOR FREE DISTRIBUTION

काही दिवसांनी जीवनाला कलाटणी देणारा दिवस उगवला. मी फॅशन स्ट्रीटपासून खारला जात असताना एका 'शेडी बुकस्टॉल'वर मला 'बॉम्बे दोस्त' मासिक हाती लागलं. सर्वांसमोर ते मासिक उघडायचं धाडस मला झालं नाही. ते मासिक घरी घेऊन गेलो. अश्लील वाङ्मय ठेवण्यासाठी घरात मी एक गुप्त जागा केली होती, तिथे ते मासिक लपवलं. ते मासिक मी सारखं वाचू लागलो. कधी एकदा आई बाहेर जाते आणि मी ते मासिक उघडतो असं व्हायचं. मला आजही आठवतंय, की अनेक वेळा मी रात्री बाथरूमला जायच्या बहाण्यानी ते मासिक टॉयलेटमध्ये घेऊन जायचो आणि तिथे वाचायचो. वन रूम

किचनमध्ये राहताना, स्वतंत्र अशी जागा मला दुसरीकडे कुठून मिळणार?

'बॉम्बे दोस्त'नी माझं जीवनच बदललं. आयुष्यात पहिल्यांदा वाटू लागलं, की या जगात मी काही एकटा नाही. मला फारसं इंग्रजी येत नव्हतं. त्यामुळे त्यातील 'मसालेदार' गोष्टी मला फार कळत नसत, पण त्यातील 'खूश खत' सत्र मला खूप आवडायचं. मासिकातील जाहिरातीतून जोडीदाराचा शोध घेता यायचा. मी जोडीदार शोधायला 'बॉम्बे दोस्त'मध्ये जाहिरात द्यायची ठरवली, पण पोस्ट बॉक्स नंबरचं काय करायचं? त्या काळात माझ्याकडे सेल फोन नव्हता. (हे लिहिताना मी वयस्कर झाल्यासारखं वाटतंय!) फक्त लँडलाइन होती. एखादा पुरुष शोधण्यासाठी आपला लँडलाइन नंबर देणं धोक्याचं होतं, पण माझ्याकडे पोस्ट बॉक्स नंबर नसल्यामुळे मी माझ्या घरचा नंबर दिला.

माझ्या जाहिरातीला फार प्रतिसाद मिळाला नाही. सुदैवाने एक दिवस मी घरी नसताना एक फोन आला. तो आईने घेतला. मी घरी आल्यावर ती म्हणाली, की एक तुषार नावाच्या ठाण्यातील व्यक्तीने कॉल केला होता. त्याचा नंबर त्यानी दिलाय. आईने मला खोदून खोदून तुषारबद्दल प्रश्न केले. मी काहीतरी खोटं बोलून वेळ मारून नेली. मी तुषारला फोन केला आणि भेटायचं ठरवलं. आम्ही भेटलो. तो माझ्या 'टाइप'चा नव्हता, पण मी मात्र त्याच्या टाइपचा होतो. त्यानी मला प्रपोज केलं, पण मी नाही म्हटलं. त्याच्याशी बोलताना एका 'क्रूझिंग साइट'चं नाव कळलं. ती एक बाग होती. काही दिवसांनी मी त्या बागेत गेलो. तिथे मला मोठा धक्काच बसला. अनेक पुरुष माझ्याकडे आकर्षित झालेले दिसले. त्या बागेत मी वारंवार जाऊ लागलो आणि तिथे माझी एकाशी गाठ पडली. त्याने मला 'हमसफर ट्रस्ट' (मुंबई)चा

FOR FREE DISTRIBUTION

पत्ता दिला.

मी हमसफर ट्रस्टला भेट दिली. काही दिवसांनतर हमसफर ट्रस्टनी भारतातील लैंगिक अल्पसंख्याकांची पहिली कॉन्फरन्स भरवली. या कॉन्फरन्समध्ये मी स्वयंसेवक म्हणून काम केलं. यातून माझं खूप सक्षमीकरण झालं आणि आयुष्यात पहिल्यांदा जाणवलं, की मला माझ्या समाजासाठी काम करायचंय. माझ्या मित्राच्या मदतीने मी अशोक राव कवींची (द हमसफर ट्रस्टचे चेअरपर्सन आणि फाउंडर) अपॉइंटमेंट घेतली. त्यावेळी हमसफर ट्रस्ट खूप छोटी संस्था होती. प्रकल्प कमी होते. सुदैवाने अशोकनी माझी 'असिस्टंट ॲडमिनिस्ट्रेटर' म्हणून नेमणूक केली. मला खूप आनंद झाला. मी पैशासाठी काम करत नव्हतो, तर माझ्या समाजासाठी काम करत होतो. विशेषत: मी आम्मासाठी काम करत होतो (मी आणि इतर जणं अशोकला प्रेमाने आम्मा म्हणतो.) अशोकमुळे माझा आत्मविश्वास वाढला. त्याचं माझ्या वैयक्तिक आणि व्यावसायिक विकासात मोठं योगदान आहे. एनजीओ क्षेत्रात कसं काम करायचं याचं मार्गदर्शन मिळालं. मी ८ वर्षं या संस्थेत काम केलं. 'ॲडमिनिस्ट्रेटर' आणि मग 'आउटरिच' मॅनेजर बनलो.

हे काम करत असताना मला सतत स्त्रीसारखं आयुष्य जगायची इच्छा होती, पण मनात भीती होती, की लोक काय म्हणतील? मी साडी घातली तर मी उदरनिर्वाह कसा करायचा? कसं जगायचं? अनेक ट्रान्सजेंडर आणि हिजडे मंगती करून किंवा वेश्याव्यवसाय करून पैसे मिळवतात. मला तसं करायचं नव्हतं. भीक मागून पैसे मिळवणं मला कमीपणाचं वाटतं. मग काय करावं ? वाटायचं, की त्यापेक्षा तसंच राहू आणि आपल्या कारकिर्दीकडे लक्ष देऊ.

जेव्हा मी शुक्रवारच्या 'कम्युनिटी मोबिलायझेशन'च्या

FOR FREE DISTRIBUTION

कार्यक्रमात साडी घालायचो तेव्हा मला माझ्या आजूबाजूचे काहीजण खूप नावं ठेवायचे, कारण मी पुरुष म्हणून काहींना खूप आकर्षक वाटायचो. मी स्त्रीचा वेश धारण करणं त्यांना आवडत नसे. मी द्विधा मन:स्थितीत असायचो. एकीकडे माझं मन एक सांगायचं आणि आजूबाजूचा समाज वेगळी अपेक्षा करायचा. जेव्हा मी स्त्रीच्या वेशात आरशात बघायचो तेव्हा मला माझं अस्सल रूप दिसायचं.

मी हमसफर ट्रस्टमध्ये काम करत होतो तेव्हा 'बिन बायकांचा तमाशा' हा नृत्याचा कार्यक्रम अनिल वासुदेवन यांनी आयोजित केला. या कार्यक्रमात पुरुष स्त्रीच्या वेशात लावण्या करत होते. माझ्या मनात विचार आला, की लैंगिकतेचा विषय अशा प्रकारच्या कार्यक्रमांच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोचवावा.

अशा तऱ्हेचा कार्यक्रम टीजींना करायचा असेल तर टीजींनी आपली लैंगिकता स्वीकारून लोकांसमोर आपली लैंगिकता सांगायचं धाडस करणं गरजेचं होतं. मी या बाबत हमसफर ट्रस्टशी चर्चा सुरू केली आणि टीजींच्या लावण्यांचा कार्यक्रम आयोजित केला. त्याला माध्यमांतून खूप प्रसिद्धी मिळाली. या कार्यक्रमात मीही भाग घेतला आणि पहिल्यांदा समाजासमोर स्त्री म्हणून आले. हिजड्यांच्या समस्या लोकांपर्यंत पोचवण्यासाठी, त्यांच्या अधिकारांसाठी मी अशा कार्यक्रमाची संधी शोधू लागले. त्यानंतर मी 'नटले तुमच्यासाठी' हा लावण्यांचा कार्यक्रम करू लागले. या कार्यक्रमाचे शो करताना काहीवेळा प्रेक्षकांनी त्रासही दिला.

मी हे कार्यक्रम करण्यात दंग होऊन गेले. माझा फोकस कामावरून कमी झाला आणि लावण्यांच्या कार्यक्रमाकडे वाढला. कामाकडे दुर्लक्ष होऊ लागलं. मला हा बदल जाणवू लागला. माझ्या

FOR FREE DISTRIBUTION

सहकाऱ्यांनाही हा बदल जाणवू लागला. ते नाखूश होते. पण हे शो करणं मला खूप महत्त्वाचं होतं. या काळात मी खूप गोंधळलेले होते, घाबरलेली होते कारण माझा स्त्रीचा लिंगभाव खूप प्रकर्षाने प्रकट होत होता. हमसफर ट्रस्टपासून दूर गेले तर, माझा माझ्यावर जास्त ताबा येईल असं वाटू लागलं. शेवटी मी हमसफर ट्रस्ट सोडून देऊन दुसऱ्या संस्थेत आपली 'प्रोफेशनल ग्रोथ' करायची ठरवली.

पुढे मी 'फॅमिली हेल्थ इंटरनॅशनल'मध्ये ३ वर्षं आणि त्यानंतर 'जॉन हॉपकिन्स सेंटर फॉर कम्युनिकेशन'मध्ये ३ महिने काम केलं. या काळात मला विविध समाजांबरोबर काम करायची संधी मिळाली– बारबाला, स्त्री वेश्या, इंजेक्शनद्वारे नशा घेणारे लोक, स्थलांतर करणारे वर्ग इत्यादी... या काळात माझी स्वत:शी टीजी म्हणून ओळख पक्की झाली. हेही लक्षात आलं, की जोवर आपण स्वत:ला स्वीकारत नाही तोवर इतर वर्गाचे प्रश्न आपण समजून घेऊ शकत नाही.

FOR FREE DISTRIBUTION

स्वत:ची ओळख झाली तरी आईला मात्र सुरुवातीला मी समलिंगी आहे असं सांगितलं. मी टीजी आहे, हे सांगितलं नाही कारण मला वाटलं, की तिला मी समलिंगी आहे, हे स्वीकारणं त्यातल्या त्यात सोपं जाईल. मी टीजी आहे असं सांगितलं तर तिला ते झेपणार नाही.

या काळात माझ्या आईला माझ्या कपड्यांमधील होणारा बदल दिसत होता. तिने संयम दाखवला, तिला माझ्या विरोधात जायचं नव्हतं. मागची बारा वर्षं या विषयावर तिच्यात आणि माझ्यात अनेक वाद झाले आणि दोघांमधील वातावरण खूप तंग झालं होतं. तिला माझ्या भविष्याबद्दल काळजी वाटणं स्वाभाविक होतं. दोघांच्या विचारात मतभेद असले, तरी तिनं मला कधी झिडकारलं नाही. मला तिचा खूप आधार होता. ती म्हणायची,''मला तुझ्या लैंगिकतेबद्दल,

लिंगभावाबद्दल काही कळत नाही. मला एवढंच कळतं, की तू माझा मुलगा आहेस, माझा एक हिस्सा आहेस. हे नातं कायमचं राहील.''

स्वत:ची ओळख झाली. आईचा आधार हळूहळू मिळू लागला. आता मनात प्रखर इच्छा होत होती, की आपण स्त्री बनावं; पण पुरुषापासून स्त्री बनणं सोपं नाही. ते एक मोठं अव्हानच होतं. हे रूपांतर करायचा निर्णय घेतला तेव्हा मला वाटलं, की हिजडा समाजातील एखाद्या गुरूचा आधार घ्यावा, जो मला या प्रवासात आधार देईल, मदत करेल, कारण हे नक्की होतं, की मी काही केलं तरी 'मंगती' करणार नाही आणि घरही सोडणार नाही (मी आईला सांभाळणार). मी दोन मोठ्या हिजडा गुरूंना भेटले. 'शेहनाझ गुरू' आणि 'चांदनी हाझी'. शेनाझ गुरूंच्या नावानी मी रित टाकली. त्यांच्या आधारामुळे माझा प्रवास जास्त सुखकर झाला. या प्रवासात मला जॉन हॉपकिन्स युनिव्हर्सिटीचे माझे बॉस डॉ. संजनथी वेळू आणि माझे सहकारी यांचाही खूप आधार मिळाला.

FOR FREE DISTRIBUTION

इथून माझा स्त्री बनण्याचा प्रवास सुरू झाला. सर्वांत प्रथम मी दाढी करणं सोडून दिलं आणि 'चिमटा' घेऊ लागले. (हिजड्यांचा विशिष्ट धातूचा एक चिमटा असतो ज्यानी चेहऱ्यावरचा एकेक केस पकडून मुळापासून उपटून काढायचा असतो.) पुरुषी कपडे घालणं हळूहळू कमी केलं आणि 'युनिसेक्स' कपडे घालू लागले. काही काळानंतर स्त्रीचे कपडे घालू लागले.

मग मी स्त्रियांच्या संप्रेरकांची इंजेक्शन्स घेऊ लागले. त्यांनी माझ्या शरीराला गोलाई आली. स्तन वाढू लागले. मला जे पूर्वीपासून ओळखत होते ते मला म्हणू लागले, की मी स्त्री म्हणून खूप सुंदर दिसते. हा सर्व प्रवास करण्यास अनेक वर्षं लागली आणि हळूहळू एका छोट्या

अळीपासून माझं फुलपाखरात रूपांतर झालं. फरक एवढाच होता, की या फुलपाखराचे इंद्रधनुष्यासारखे रंग होते आणि हे फुलपाखरू नरापासून मादी झालं होतं!

मला लिंगबदल शस्त्रक्रिया करायची आहे, पण बऱ्याच समस्या आहेत. ही शस्त्रक्रिया करण्यास 'इंडियन प्रोटोकॉल'ची स्थापना झालेली नाही. काहीवेळा या शस्त्रक्रिया बेकायदेशीरपणेही केल्या जातात. लिंगबदल शस्त्रक्रियेचे सर्व टप्पे पूर्ण होण्यास ३-४ वर्षंही लागू शकतात. काहीवेळा ऑपरेशन झाल्यावर कॉम्प्लिकेशन्स निर्माण होऊ शकतात. या सर्व गोष्टी विचारात घेऊन मला लिंगबदल कोणत्या पद्धतीने करायचा, कधी करायचा, कोणाकडून करायचा हे ठरवावं लागणार आहे. फक्त लिंग आणि वृषण काढायचे का संपूर्ण पुरुषाची जननेंद्रियं काढून योनी आणि शिश्निका बसवायची शस्त्रक्रिया करायची? कोणता मार्ग जास्त फायदेशीर आहे? का शस्त्रक्रिया न करता फक्त स्त्रीचे संप्रेरक घ्यावे? मी ऐकलंय, की काही हिजड्यांनी खच्चीकरण/लिंगबदल शस्त्रक्रिया केल्यावर ते या निर्णयाला पस्तावले.

FOR FREE DISTRIBUTION

नुकतीच मी स्तन बसवायची शस्त्रक्रिया केली (ब्रेस्ट इम्प्लान्ट). अनेक पर्याय उपलब्ध आहेत आणि कोणताही निर्णय घ्यायच्या अगोदर मला या सर्व पर्यायांवर नीट विचार करायचाय.

गेली काही वर्षं मी काही पुरुषांबरोबर नातं बनवायचा प्रयत्न केला, पण ही सर्व नाती गरजेपुरती होती. म्हणजे एक तर त्यांना आणि मला लैंगिक सुख हवं असायचं म्हणून आम्ही जवळ यायचो किंवा काहींना माझ्याशी जवळीक साधून माझ्याकडून पैसे हवे असायचे. लैंगिक सुखापलीकडे जाऊन नातं जोपासायची इच्छा त्यांच्यात नव्हती. सुरुवातीला मी एकनिष्ठपणे ही नाती जोपासायचा प्रयत्न केला, पण हळूहळू या असल्या नात्यांना वैतागू लागले. शेवटी, आपल्याला एक

जोडीदार मिळेल ही आशा मी सोडून दिली आणि माझ्या एका मित्राशी नातं जोडलं. तो माझा नवरा आहे आणि एक जवळचा मित्रही. पण आमच्या या नात्याला मर्यादा आहेत. त्याचं लग्न झालं आहे आणि त्याला एक मूलही आहे. आता तो आणि माझ्या मुली (माझे हिजडा चेले) हाच माझा संसार आहे.

गेले अठरा महिने मी 'इंडिया एचआयव्ही/एड्स अलायन्स'मध्ये 'पेहचान' नावाच्या प्रकल्पावर काम करत आहे. हा प्रकल्प एमएसएम, टीजी आणि हिजडा समाजासाठी विविध सुविधा पुरवतो. राष्ट्रीय पातळीवर माझ्या समाजासाठी काम करताना मला खूप आनंद मिळतोय.

*****

FOR FREE DISTRIBUTION

**टीप :** अबिना जेव्हा पहिल्यांदा साडी घालून समाजासमोर स्त्री म्हणून आली (लावण्यांच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून) तेव्हापासून स्त्रीलिंगी शब्दप्रयोग केला आहे. उदा., 'मी आले'.

**पायल** (पुणे)

मी राहुल खळदे. पुण्यात राहणारा. मला सर्व 'पायल' म्हणून ओळखतात. घरामध्ये आई, वडील, बहीण व मी असं छोटंसं कुटुंब. माझी बहीण माझ्यापेक्षा २ वर्षांनी मोठी. माझ्या जन्मापासून माझे वडील खूप दारू पित होते. त्यामुळे घरचा सर्व भार माझ्या आईवर पडला. मी थोडा मोठा झाल्यानंतर माझ्या आईने शिवण क्लास लावला व त्यानंतर क्लास करत तिने शिवणकाम करण्यास सुरुवात केली.

लहानपणापासून मला नटायला खूप आवडायचं. घरात कोणी नसलं, की मी साडी घालून, आरशासमोर उभं राहून मन शांत करायचो. माझ्या शेजारी राहणारा श्रेयस व मी नेहमी एकत्र खेळत असे व त्याच्या घरच्यांचाही मला आधार असे. श्रेयस आणि मी कधीच मुलांबरोबर खेळत नसे.

मी ७ वर्षांचा असताना प्रमोद (माझा नातेवाईक) या व्यक्तीने मला त्याच्या घरी पिक्चर पाहायला नेलं. त्याच्या घरात कोणीही नव्हतं. त्याने दार बंद केलं. आम्ही पिक्चर बघत बसलो. तेव्हा त्याने मला बेडवर झोप असं सांगितलं. मी त्याच्या शेजारी झोपलो. तेव्हा त्याने माझ्यावर जबरदस्तीने बॉडी सेक्स, मुखमैथुन करायचा प्रयत्न केला. माझा श्वास कोंडायला लागला. मी हात-पाय त्याच्या अंगावर आदळू लागलो. 'तू ओरडू नकोस, कोणीतरी येईल' असे तो म्हणाल्यावर मी खूप भ्यायलो. मग त्याने कपडे काढून गुदद्वारामध्ये लिंग घालायचा प्रयत्न केला. पण तेव्हा ते मला सहन न झाल्याने मी खूप रडायला लागलो, म्हणून त्याने मला सोडून दिलं. मला खूप भीती वाटली. मी घरी जाऊन माझ्या आईला सर्व सांगितलं. माझ्या आईनी नातेवाइकाला

FOR FREE DISTRIBUTION

सांगितलं. खूप भांडणं झाली. तेव्हापासून माझ्या घरचे मला घराबाहेर सोडत नसत.

वर्गात मला मुलं खूप चिडवायची. त्यामुळे माझी शाळेत जायला खूप चिडचिड होऊ लागली. शाळेतून घरी आल्यावर मी संध्याकाळी तोंड, हात-पाय धुऊन पावडर, काजळ व गंध लावत असे. त्यामुळे वस्तीमधल्या मुलांचा मला त्रास सहन करावा लागत असे. मी रस्त्याने चालत असताना ते पाठीमागून 'छक्का' म्हणायचे. माझी वेगळेपणाची चाहूल मला कळू लागली. वडील पिऊन आले, की मला ''तू घरात राहू नकोस, तू हिजडा आहेस. मला बाहेरून सर्व समजतं'' असं म्हणून शिव्या देत असत. त्यामुळे मला खूप एकटं एकटं वाटू लागलं. मी मनात म्हणे, देवा मला आता तुझीच साथ आहे. माझी देवावर खूप श्रद्धा होती. बहीण व आई मला नेहमी साथ देत होते, पण आईला माझे हावभाव व बोलणं कळू लागल्यावर मला आईचाही त्रास सहन करावा लागत असे. मला आत्महत्या करावी असे वाटे.

FOR FREE DISTRIBUTION

शाळेत हुशार असूनही मला घरामध्ये बहीण सोडून कोणाचीही साथ नसे. वडिलांच्या पिण्यामुळे रोज संध्याकाळी अभ्यासाची गैरसोय व्हायची. त्यामुळे मित्राच्या घरी अभ्यास करीत असे. जेव्हा दहावीच्या वर्गातली मुलं मला चिडवायची, तेव्हा माझ्या भावाची (माझा आतेभाऊ माझ्याच वर्गात होता) व त्याच्या मित्रांची खूप भांडणं व्हायची. मुलांच्या या त्रासामुळे मी शाळा बुडवून कुठेही जायचो व घरी कळल्यावर खूप मार बसायचा. चिडून आई मला जेवणाचा डबा देत नसे. ''वडील पितात आणि तू या गोष्टी कर'' असं बोलून ''मी जीव सोडते'' असं ती म्हणत असे. काकानी मला रोज अभ्यासाला बसवून कशीबशी माझी दहावी सोडवून घेतली. परीक्षेच्या काही दिवस आधी

वडिलांनी भांडणं करून आम्हा सर्वांना घराबाहेर काढलं. नापास होण्याच्या भीतीने मी खूप रडायचो. टेन्शन घेऊन मी आजारी पडलो, पण नशीब मी दहावीची परीक्षा ५३ टक्क्याने पास झालो.

वयाच्या सोळाव्या वर्षी माझ्या इथे राहणारे श्रीगुरू यांच्याशी माझी ओळख झाली. श्रीगुरू माझ्यासारखेच होते. त्यामुळे मी एकटाच असा बायकी नाही हे कळलं. मी त्यांच्याकडून देवाचा (माळ परडीचा) कार्यक्रम करून घेतला. मी जोगता बनलो.

माझे गुरू अतिशय मायाळू होते. मला साडी घालण्याची इच्छा होती. मी आईचा एकुलता एक असल्याने गुरू मला खूप समजून सांगायचे, की साडी घालू नकोस, पण माझ्यात कोणताही फरक पडला नाही. मी नटून देवाची गाणी गायला व नाचायला जाऊ लागलो. बसमध्ये प्रवास करायचो तेव्हा मी शेजारी बसल्यावर लोक उठून जायचे. शौचालयात (मी टीजी असल्यामुळे मी लेडिज बाथरूमचा वापर करायचो) गेल्यावर लेडिज मला पाहिल्यावर दूर व्हायच्या व मी जे बाथरूम वापरले ते बाथरूम लेडिज वापरत नसत. रस्त्याने चालताना लोक म्हणायचे, ''काय भारी आयटम चाललाय.'' मी त्यांच्याशी भांडण करून त्यांच्यावर टाळ्या वाजवायचो. रात्रीच्यावेळी आम्ही कार्यक्रमाला (नाचायला, देवीचे कार्यक्रम, भारूड) जायचो. तेथेही मला पैशाची आस दाखवून मुलं म्हणायची, ''चल, येतोस का? २०० रु. देतो.'' नाइटला या कार्यक्रमांसाठी बाहेर गेल्यावर खूप घाणेरडे अनुभव आले. मुलांनी अक्षरश: ओढून माझ्याबरोबर सेक्स केला आहे. मी सेक्स करणार नाही असे सांगितले, की मला मारहाण करून सेक्स करत.

काही दिवसांनी मी एका कंपनीमध्ये पार्ट-टाइम कामाला जाऊ लागलो. त्यामुळे घरच्यांना थोडा आधार वाटू लागला. काही दिवसांनी

FOR FREE DISTRIBUTION

आईला शुगरचा त्रास (मधुमेह) होऊ लागला. त्यामुळे घरची सर्व जबाबदारी माझ्यावर आणि बहिणीवर पडली. त्यानंतर माझी आई खूप आजारी पडली. तिला काळजी पडली, ती बहिणीच्या लग्नाची. म्हणून दर महिन्याला फंड व भिशी बाजूला टाकून आम्ही पैसे साठवू लागलो. माझ्या आईच्या वडिलांनी, म्हणजेच माझ्या आजोबांनी माझ्या बहिणीसाठी स्थळ पाहिले. ते आमच्या सर्व कुटुंबीयांना आवडले. माझ्या आईला अक्षरशः खुर्चीवर बसून माझ्या बहिणीचं लग्न पाहायला लागलं. माझं हे सगळं माहीत असल्याने माझ्या बहिणीचं लग्न सर्वांनी झटपट पार पाडलं.

हळूहळू माझ्या बहिणीने माझ्या दाजींना कल्पना दिली, की माझा भाऊ असा असा आहे. त्यांनी हे सर्व समजून घेतलं. एका राखीपौर्णिमेच्या दिवशी मी माझ्या बहिणीला फोन करून माझ्या घरी बोलावलं. तेव्हा, ''माझ्याबद्दल तू दाजींना काही सांगितलंस का?'' असा प्रश्न टाकला. तेव्हा तिनं मला सांगितलं, ''मी दाजींना सर्व सांगितलं आहे, तू अजिबात भिऊ नकोस.'' हे शब्द ऐकून मला खूपच आधार मिळाला. पुढे जेव्हा भाऊबीज आली व माझ्या बहिणीच्या सासरकडच्यांनी मला बोलावलं, तेव्हा मी आजारी आहे असं सांगून जायचं टाळलं. असं दर भाऊबीजेला घडू लागलं. शेवटी जेव्हा माझ्याबद्दल सर्वांना सांगायची वेळ आली, तेव्हा माझ्या बहिणीने सासरच्या सर्व लोकांना माझ्याबद्दल सांगून मन मोकळं केलं. तेव्हा तिच्या सासरकडच्या सर्वांनी, ''हे आम्हाला पटत नाही. तो असा नसेल, त्याला आपण व्यवस्थित करू'' ही आशा दिली. माझ्या बहिणीने ही गोष्ट मला फोनवरून कळवली, पण ''तू भिऊ नकोस काहीही होत नाही'' असं सांगून आधार दिला. ''मी असा आहे, मी

FOR FREE DISTRIBUTION

असाच राहणार'' असा जेव्हा मी हट्ट केला, तेव्हा माझ्या आईने मला घराबाहेर काढून, माझे सर्व कपडे रस्त्यावर फेकले. तेव्हा कैलास नावाच्या व्यक्तीने मला सहारा दिला. मी त्याच्या घरी राहायचो. मला टेन्शन आल्याने मी माझे काम सोडून दिले.

थोड्या दिवसांनी मी हिजडा समाजाची रीत घेतली. हिजड्यात लुंगी, शर्ट, पठाणी, साडी/पंजाबी ड्रेस ही वस्त्रं घालायची पद्धत आहे. हिजडा समाजात गेल्यावर केस वाढवणं व नाक टोचणं या दोन महत्त्वाच्या गोष्टी. म्हणून मी केस वाढवणं सुरू केलं. तेव्हाही श्री गुरू मला खूप ओरडायचे, पण त्यांचं न ऐकून शेवटी मी नाक टोचलं, कारण मला पूर्ण स्त्रीसारखं राहावंसं वाटायचं. पण गुरूंना कळल्यावर मला त्यांनी खूप मारून 'दयार'मध्ये नेलं व नायकला म्हटलं, ''याने नाक टोचले.'' ''मला नाक टोचायचे होते म्हणून मी नाक टोचले'' असं मी सांगितलं. मग नायकाने गुरूची समजूत काढली व मला नाकातला काटा घालायला दिला.

FOR FREE DISTRIBUTION

मी माझ्या गुरूंना विचारून पोटासाठी दुकानं मागायला जायला लागलो. असं करून मी त्यांच्या घरी महिना १५००/- रु. द्यायला लागलो. आईला मात्र कोणतेही उत्पन्न नव्हते.

माझ्या बहिणीला ७वा महिना लागला व तिला दवाखान्यासाठी पैशाची गरज भासू लागली. मी कैलासजवळ बहिणीसाठी १५०० रु. पाठवले. ती दवाखान्यात गेल्यावर मी तिला भेटलो. 'मी घरी यावे' असे सांगून तिने मला खूपच अडचणीत पाडले. पण लगेच घरी न जाता, मी थोडा विचार केला. माझ्या बहिणीने मला आईच्या आजाराविषयी सांगून मला समजावून घरी बोलावलं. मी पुन्हा घरी राहायला गेलो. आईने मला सांगितलं, ''तू मला काहीही करून महिन्याला ३ हजार रुपये

द्यायचे.'' मी दुकानं मागून रोज दोनशे रुपये मागे टाकून, दर महिना ३ हजार रुपये आईला द्यायला सुरुवात केली.

काही वर्षांनी श्री गुरूंचं निधन झालं. मला खूप दु:ख झालं. गुरू गेल्यानंतर तृतीयपंथी समाजातील लोक मला म्हणायचे, ''तू दुसरा गुरू कर'' पण मला कोणाचाही चेला होण्याची इच्छा नव्हती, कारण माझ्या गुरूने सतत चांगलं शिकवून आम्हाला चांगलं वळण लावलं होतं. पुढे आमच्या गुरूभावांमध्ये (श्रीगुरूंचे चेले) फूट पडायला सुरुवात झाली. आमच्यात ताळमेळ राहिला नाही व एकीही राहिली नाही. आमच्या समाजामध्ये ज्याचा गुरू मरेल, त्याचा शिष्य 'बेवा' असे समजतात. गुरू नसल्यामुळे जो तो आम्हाला सतत हाडहूड करायला लागला.

माझे गुरू मरण पावल्यानंतर दहा दिवसांनी सर्व तृतीयपंथी लोक दहाव्याला आले. यामध्ये सर्व जोगती, आराधी व हिजडा समाजाचे लोक आले होते. तेव्हा गुरूंचा यल्लमादेवीचा जग कोण घेणार यावरून मोठी चर्चा झाली व एका गुरूभावाने जग घ्यायची जबाबदारी घेतली.

*****

वयाच्या १६व्या वर्षापासून मला अनेक तृतीयपंथी मित्र भेटत गेले. आम्ही सर्वजण संध्याकाळी जवळच्या एका चौकात भेटायचो. त्यातले काही मित्र 'सेक्स वर्कर' म्हणून काम करायचे.

एका रविवारी संध्याकाळी मी या ग्रुपबरोबर होतो. मला एका मुलाने विचारलं, ''चल ना, येतो का?'' तेव्हा त्याच्याशी बोलत बोलत मलाही त्याच्याविषयी मनात भावना आली आणि मी त्याच्याबरोबर सेक्स केला. ''मला माझ्याबरोबर कायमचं माझं माणूस पाहिजे'' असं मी म्हणालो, तर तो म्हणाला, ''मी असं काही करणार नाही.'' तेव्हा मला अशा मुलांचा राग येऊ लागला. मला मुलं सारखी सेक्सची मागणी

FOR FREE DISTRIBUTION

करायची. ''तू खूप छान दिसतो, तुझ्याबरोबर राहीन.'' असे सांगत, पण माझा त्यांच्यावर विश्‍वास बसत नसे.

कालांतराने माझं एका मुलावर प्रेम जडलं. त्याचा माझ्यावर खूप जीव होता व माझाही त्याच्यावर खूप जीव होता. मी त्याच्याबरोबर सेक्स करू लागलो. थोड्या दिवसांनी तो गावाला जाणार आहे हे कळताच मी आणि तो खूप रडलो, पण त्याचे वडील गावाला खूप आजारी असल्याने त्याला गावी जावं लागलं. तो गेल्यावर मला खूप नैराश्य आलं. लोकांचा व घरच्यांचा खूप राग राग करू लागलो. मला आधार मिळायचा तो माझ्या तृतीयपंथी मित्रांचा. रोज संध्याकाळी मन हलकं करण्यासाठी मी त्यांच्याकडे जायचो. मला त्याच्या आठवणीनं जीव द्यावासा वाटू लागला. त्याचा व माझा सर्वच कॉन्टॅक्ट तुटला व मी व्यसनाच्या आहारी गेलो. दारू पिणं, तंबाखू खाणं सुरू झालं.

काही दिवसांनी मला मिलिंद भेटला. तो समपथिक ट्रस्टमध्ये कामाला होता. आम्ही तृतीयपंथी भेटायचो त्या साइटवर तो पिअर एज्युकेटर म्हणून काम करू लागला. तेव्हा आम्हाला एचआयव्ही/एड्स व गुप्तरोग या विषयी माहिती नव्हती. एचआयव्ही म्हणजे काय? गुप्तरोग म्हणजे काय? ही माहिती तो द्यायचा. मला व इतर तृतीयपंथीयांना कंडोम वाटायचा. कंडोम कसा लावायचा, हे शिकवायचा. यामुळे आम्ही शरीराची काळजी घ्यायला लागलो. ६ महिन्यांनी 'टीपीएचए' (सिफिलीस गुप्तरोगाची चाचणी) व दर ३ महिन्यांनी जननेंद्रियांची तपासणी करायला लागलो. दर सहा महिन्याला आम्ही एचआयव्ही टेस्टिंग करू लागलो.

संध्याकाळच्या वेळी सेक्स करताना मेडिकलच्या दुकानात कंडोम मागायची लाज वाटायची, म्हणून मिलिंदने कंडोम डेपो तयार

FOR FREE DISTRIBUTION

केला. आम्ही कंडोम वापरून सुरक्षित सेक्स करू लागलो.

काही काळानी मीही पिअर एज्युकेटर म्हणून साइटवर काम करू लागलो. मी जेव्हा पिअर म्हणून काम करत होतो, तेव्हा संध्याकाळी कामाची वेळ ७ ते १० अशी होती. पोलिस संध्याकाळी फिरताना आम्हाला अडवून विचारपूस करायचे, तेव्हा आम्ही समपथिक ट्रस्टचे आयकार्ड दाखवायचो. नंतर मग पोलिस स्टेशनला कामाच्या स्वरूपाचे एक पत्र दिले. हळूहळू संस्थेच्या कामात खूप मन लागले व कालांतराने मी 'आऊटरीच वर्कर' झालो. पुढे संस्थेनी मला 'टॅली' सॉफ्टवेअर शिकवलं व मी अकाउंटंट झालो.

*****

वयाच्या १९व्या वर्षी मला परिपूर्ण स्त्री व्हावं असं सारखं वाटू लागलं. मला माझ्या पुरुषाच्या जननेंद्रियांची खूप चिड येऊ लागली. मी पुण्यात एका हॉस्पिटलमध्ये ऑपरेशन करायचा निर्णय घेतला. जेव्हा मी हे ऑपरेशन केलं, तेव्हा माझ्या घरच्यांना माहीत नव्हतं. मी कलकत्त्याला चाललोय, महिन्यानी येईन असं सांगून मी निघून गेलो.

FOR FREE DISTRIBUTION

माझी निर्वाणी ७ जुलै २०१० रोजी पुण्यामध्ये एका हॉस्पिटलमध्ये झाली. शस्त्रक्रियेत वृषण व गोट्या काढून स्त्रीच्या योनीसारखी जागा बनवली. माझा एक चेला माझ्यापाशी होता व मी ऑपरेशन थिएटरमधून बाहेर आल्यावर मी माझ्या दोन मित्रांना व एका गुरूभावाला माझ्याविषयी फोनवरून माहिती दिली. त्यावेळेस ते लगेच मला पाहण्यासाठी हॉस्पिटलमध्ये आले. माझ्या राहण्याची जबाबदारी माझ्या एका गुरूभावाने घेतलेली होती, पण मला हॉस्पिटलमधून सोडल्यावर ऐनवेळेस मला त्याने दगा दिला. आता कुठे जाऊ? कुठे राहू? मला खूप भीती वाटू लागली. कारण ऑपरेशन करून, मी फक्त २

तास हॉस्पिटलमध्ये काढले. डॉक्टरने लगेच डिस्चार्ज दिला. ***(लगेच असा डिस्चार्ज देणं अजिबात योग्य नव्हतं).*** सुदैवाने मला माझ्या एका दुसऱ्या गुरूभावाने रूम दिली. दगदगीमुळे मला घरी आणताना माझ्या डोळ्यांसमोर अंधारी आली. मला असं वाटलं, की मी आता जगू शकणार नाही. पण त्या अवस्थेत मी मन कठोर करून, एका वसाहतीत पहिल्या दिवशी राहिले.

ज्या खोलीत मी राहिले ती खोली पत्र्याची व फरशी नसलेली होती. संध्याकाळी माझ्या गुरूभावाने मला डबा आणला. डॉक्टरांनी मला सांगितलं होतं, की तिखट, तेलकट व गार पाणी पिऊ नकोस, पण त्याने मला जड पदार्थ आणले, कारण त्याला काहीही कल्पना नव्हती. मी ते अन्न खाल्ले आणि मला जोराचा ठसका लागला. जखमेतून खूप रक्त आलं, खूप त्रास झाला. त्या रात्री माझ्याजवळ एकही जण नव्हता. मला आईची खूपच आठवण येऊन मी खूप रडले. सरळ अंगावर झोपून माझी कंबर खूप दुखली. त्यातच ऑपरेशन करताना मला पाठीला मशिनचा चटका बसला होता. त्याचीही जखम व वेदना सुरू होत्या. रात्री त्या खोलीत मोठी घूस व चिचुंद्री निघाली. ती माझ्या पायावर आल्याने मी दचकून उठायची व मला ठणक लागायची. वाटायचं आता मी जागीच जीव सोडते.

FOR FREE DISTRIBUTION

दुसऱ्या दिवशी माझ्या एका गुरूभावाला माझ्याबद्दल सर्व माहीत झालं. तोही त्या वसाहतीमध्ये राहात होता. त्याला कळल्यावर तो म्हणाला, 'मी बघायला येणार नाही. पायलचा आणि आमचा काहीही संबंध नाही.' तेव्हा मला माझ्या गुरूंची खूप आठवण आली. गुरू असते तर ही अडचण समजून त्यांनी मला जवळ केलं असतं.

दुसऱ्या दिवशी माझ्या दोन नंबरच्या गुरूभावाने मला त्याच्या

वसाहतीत खोली बघितली व मला तो न्यायला आला. खोलीचं भाडं १०००/- रु. होतं. मग मी तिकडे गेले. ती जागा व्यवस्थित होती.

डॉक्टरांनी वेळच्यावेळी औषधं घेण्यासाठी सांगितलं. मी औषधं व्यवस्थित घेतली. डॉक्टरांनी जखम रोज ओल्या फडक्याने पुसून घेण्यासाठी सांगितलं होतं. माझं ड्रेसिंग करायला माझ्याजवळ कोणीही नव्हतं. कसंबसं उठून मी ड्रेसिंग करायचे. डॉक्टरांनी लघवीच्या जागी १५ दिवस पाइप ठेवायला सांगितला होता, कारण जर पाइप काढला आणि जखम भरली तर लघवी तुंबण्याची जास्त शक्यता होती. संडासला जायचा खूप त्रास व्हायचा.

सकाळी दोन नंबरच्या गुरूभावाकडून मला जेवण यायचं. दिवसभर आजूबाजूच्या आयाबाया मला बघायला यायच्या. त्यांच्याशी ओळख वाढली. त्याही माझी काळजी करू लागल्या. मला त्या मावश्यांनी गरम पाणी व नाश्ता देण्याची सोय केली.

FOR FREE DISTRIBUTION

मग माझे पैसे संपले. जो पहिल्यांदा रूम शोधून देणार होता, त्याच्याकडे माझे ५०००/- रु. तसेच पडून होते. मी त्याला फोन लावला, की तो स्विचऑफ असायचा किंवा दुसरे फोन उचलायचे. ''तो बाहेर गेलाय'' असे सांगायचे. मी रोज फोन करून चिंता करून पैसे कोणाकडे मागायचे हा विचार करत असे. मग मी माझ्या जवळच्या मित्राला फोन करून बोलावून घेतले. मी त्याच्याकडे मदत मागितली. त्याने मला औषधं आणून दिली.

सहाव्या दिवशी निर्वाण झालेल्या व्यक्तीचा एक छोटासा कार्यक्रम केला जातो. त्याला 'छठी' असं म्हणतात. तेव्हा सर्व गुरूबंधू व बाहेरचे तृतीयपंथी लोक येऊन हळद लावून अंघोळ घालतात. पाच भाज्या आणून भात करून खायला देतात व नजर काढतात. हा कार्यक्रम

झाला.

कधी एकदा पंधरा दिवस संपतात व कधी लघवीचा पाइप काढतात असं झालं होतं. दिवस जाता जात नव्हते. दिवसा कोणी ना कोणीतरी येऊन गप्पा मारायचा, पण अडचण होती ती रात्र घालवायची. शेवटी एकदाचे १५ दिवस गेले व मला पाइप काढल्यावर बरं वाटू लागलं.

४० दिवसांनी आमच्या समाजात 'जलसा' म्हणजे ज्या व्यक्तीचे ऑपरेशन झाले त्या व्यक्तीची 'दूधधार' केली जाते. अशावेळी माहितीच्या हिजड्यांना बोलावून हळदीचा, मेहंदीचा व नाच-गाण्याचा कार्यक्रम होतो. 'दूधधार' म्हणजे नदीवर जाऊन दुधाची घागर घेऊन ती नदीत सोडणे व मनात इच्छा मांडणे. यावेळी सर्व हिजड्यांनी ढोलकी घेऊन व गाणी म्हणून रात्रभर कार्यक्रम केला.

आता मी पूर्णपणे तंदुरुस्त झाले आहे. मी पंजाबी ड्रेस घालते आणि निर्वाण हिजडा म्हणून आयुष्य जगते.

FOR FREE DISTRIBUTION

*****

**टीप :** या आत्मकथेत शस्त्रक्रियेनंतर स्त्रीलिंगी शब्दप्रयोग केला आहे. उदा., 'मी आले'.

**रूपाली** (सोलापूर)

माझ्या आईला मोठ्या पाच मुली व आम्ही दोन लहान भाऊ. एका छोट्या गावात माझं बालपण गेलं. बहिणींसोबत जास्त राहिल्यानं मीही मुलींसारखेच हावभाव करू लागलो. शिवाय आईनेही मला मुलींसारखंच वागवलं. 'रूपाली' हे नाव आईनंच मला दिलं. बहिणींचे कपडे नेसून फिरल्याने गावातही मला लोक रूपालीच म्हणू लागले. घरातल्या धुण्या-भांड्याच्या कामातही मी आवडीनं भाग घेत असे. नंतर आईनं मला शाळेत घातलं.

तिसरीत असताना एक नवे मास्तर आले. ते मोक्याच्या वेळी मला बोलावून घ्यायचे आणि मांडीवर बसवायचे. माझे मुके घेता घेता त्यांची राकट दाढी टोचायची, यामुळे मी त्यांच्यापासून लपत असे. एके दिवशी त्यांनी मला त्यांच्या रूमवर नेलं आणि पलंगावर बसवलं. जवळ बसताच माझे मुके घेऊ लागले. माझं संपूर्ण अंग शहारू लागलं. त्यावेळी बॉडी सेक्स झाला. यानंतर त्या मास्तराने पुन्हा मला त्याच्या रूमवर नेलं. यावेळी ते एकटे नव्हते. त्यांचे दोन मित्रही आले होते. त्या सर्वांनी माझ्यासोबत सेक्स केला.

FOR FREE DISTRIBUTION

गावची मुलं मला चिडवायची अन् शेतातही घेऊन जायची. हळूहळू सेक्स जणू माझी गरजच बनली. यावेळी माझ्या वडिलांनी दुसरे लग्न केले. घरात आई व बाबांची खूप भांडणे झाली. माझी आई सर्व मुलींना व लहान मुलाला घेऊन माहेरी (सोलापूरला) आली. मला बाबांकडेच ठेवलं गेलं. दिवस असेच जात होते. सावत्र आईनी जास्त दिवस माया लावली नाही. मग मलाही बाबांनी आईकडे पाठवलं. यानंतर मी आईकडे आनंदाने राहू लागलो. माझ्या बहिणी आता मोठ्या

झाल्या होत्या. त्या माझ्यासोबत त्यांच्या प्रेमाचे किस्से शेअर करत होत्या.

पाचही बहिणींची लग्नं झाली. आईला आता आम्हा दोघा भावांची काळजी वाटत होती. विशेषत: माझी. दिवस जात होते, तशीच मलाही समज येत होती. माझ्यासारख्यांची समाजात काय किंमत आहे, हे कळू लागलं. या जीवनाचं काय करायचं, हा विचार मला खूप त्रास देत होता. सोलापूरच्या शाळेत माझ्या वर्गात माझ्यासारखाच एक भेटला. त्याला मी 'छाया' म्हणायचो. मैत्री झाली. एकमेकांचे दु:ख वाटून घेत होतो. या जीवनास एकच पर्याय म्हणून आम्ही दोघांनी निर्णय घेतला, की गाव सोडून मुंबईला जायचं आणि हिजड्यांमध्ये भर्ती व्हायचं. ट्रेनमध्ये खूप वेळा आम्ही टीजींना बघत होतो. अखेर धाडस करून आम्ही मुंबई गाठली.

मुंबईचा असली चेहरा कळायला फार उशीर नाही लागला. गावाहून पळून आम्ही कल्याणला विनातिकिट उतरलो. टीजींना शोधण्यात खूप दिवस जात होते. आमचे हाल सुरू झाले. एका हॉटेलमध्ये भांडी धुण्याची नोकरी करत होतो. एकदा एक म्हातारा टीजी आमच्या हॉटेलमध्ये आला. आमच्या जिवात जीव आला. त्यासोबत बोलून झाल्यावर काही अटींवर तो आम्हाला घरी घेऊन गेला. त्याने आम्हाला साड्या व ब्लाऊज दिले. दुकानात भीक कशी मागायची याबद्दल ट्रेनिंग दिलं. यानुसार आम्ही दिवसभर दुकान मागायचो व सर्व कमाई त्याच्याकडे सुपूर्द करायचो. पैसे घेऊनही आता त्या टीजीचा त्रास सुरू झाला. रात्री झोपायला तो आम्हाला बाहेर पाठवत असे. रात्री आम्ही दादरला झोपायचो. मुलं मागे लागायची.

काही दिवसांनी एक मुलगा माझ्यावर प्रेम करू लागला. तो

FOR FREE DISTRIBUTION

मला त्याच्या गाडीवर बसवून फिरवून आणायचा, खाऊ घालायचा, जवळ येण्याचा प्रयत्न करायचा. छाया मला रागवायची, की त्याच्यासोबत जाऊ नको. त्यावेळी मला वाटे, की छाया माझ्यावर जळत आहे.

एके दिवशी त्याने मला शॉपिंगला पुण्यास नेण्याचं आश्वासन दिलं. छायाला न सांगता मी त्याच्याबरोबर गेलो. पुणे स्टेशनवर पोचताच त्याने मला हॉटेलात मस्तपैकी खाऊ घातलं. लॉज बुक केला. रात्री सेक्सही केला. दुसऱ्या दिवशी रिक्षात बसवून मला बुधवार पेठ येथे नेले. त्या गल्लीत फिरताना मला भीती वाटत होती. हाताची पकड त्याने मजबूत करताच माझी छाती धडधडू लागली. यानंतर त्याने मला एका मावशीकडे सोडलं व सामान घेऊन येतो असं सांगून निघून गेला.

त्या दिवशी मावशीने माझे लाड केले. नवीन कपडे, ज्वेलरी, मेक-अपचा सेट व इतर गोष्टी मिळाल्या. यानंतर मला नटवून बाहेरच्या कट्ट्यावर बसावयास लावलं. एक म्हातारा आला. हात लावू लागला. यावर मी त्याला टाळू लागलो. मावशीनं मोठ्या आवाजात खडसावलं आणि म्हटलं, ''तुझा आदमी तुला विकून गेला आहे, आता तुला इथंच राहावं लागेल व आमची परतफेड करावी लागेल.'' यानंतर माझी झीज सुरू झाली. खूप त्रास व्हायचा. नाही म्हटल्यावर मला पट्ट्याचा प्रसाद मिळायचा. यानंतर माझी हीच लायकी म्हणून मी स्वत:ला तयार केलं आणि धंद्याला बसलो. रोजच्या त्याच जीवनाला कंटाळून मी एक प्लॅन आखला. मावशीचा विश्वास कमावण्याचं ठरवलं. दिवस जात होते. मावशीला माझ्यावर विश्वास बसू लागला. माझी गल्लीत ये-जा सुरू झाली. मावशी मला चहासाठी बाहेर पाठवायची. एके दिवशी असंच मावशीला चहा आणण्यासाठी बाहेर आलो अन् थेट स्टेशन गाठलं. पुणे

FOR FREE DISTRIBUTION

स्टेशनवरील काही टीजींच्या आर्थिक मदतीनं मी गाडीत बसलो व थेट कल्याण गाठलं. तिथे छायाला झालेली गोष्ट सांगितली आणि झालेल्या चुकीबद्दल माफी मागितली. आईला भेटण्याची खूप तीव्र इच्छा झाली.

आम्ही आईला भेटायला घरी आलो. माझे मोठे केस बघून आई खूप रडली. आई माझ्यावर खूप प्रेम करत होती. हे सर्व दृश्य पाहून छायाही खूप रडली. मला न कळत रात्री मी झोपल्यावर तिने कात्रीने माझे केस कापले. छायाच्या अशा वागण्याने मी तिच्यावर नाराज झालो. यावर तिनं मला खूप चांगल्या गोष्टी समजावल्या. मीही खूप विचार केला आणि आईकडेच राहण्याचा निश्चय केला.

आईने कंपनीत कामाला लावलं. तेव्हा मी २० वर्षांचा झालो होतो. कंपनीतही जास्त दिवस माझं पुरुषी नाटक टिकलं नाही. तिथले कामगार माझी थट्टा करू लागले. या काळात सोलापूरमधील एमएसएम लोकांसोबत ओळख झाली. ही समस्या मी सर्वांसमोर सांगितली. यावर त्यांनी मला सांगितलं, ‘‘कुणाचे काही ऐकून घेऊ नको, त्यांच्याशी भांड, प्रसंगी आम्हीही तिथे येण्यास तयार आहोत.’’ यानंतर मी त्या कामगारांना चांगलेच बोललो. यावर त्यांनी माझी तक्रार मालकाकडे केली. मालकानी मला जाब विचारला. यावर आतापर्यंतची माझी कहाणी व कामगारांचा त्रास मी मालकासमोर मांडला. मालकाच्या डोळ्यात पाणी आलं. मालकाकडून मला चांगलाच आधार मिळाला. त्यानंतर कंपनीतले मला घाबरू लागले.

काही काळाने माझं एका ड्रायव्हरबरोबर लफडं सुरू झालं. अमजद, एक धिप्पाड तरुण. तो मला छेडायचा. गोडाउनमध्ये आमचे सेक्स रंगायचे. आतापर्यंतचे सेक्स विनाकंडोमचेच होत होते. एक वर्षापर्यंत हे प्रकरण सुरू होतं. यानंतर त्याचं लग्न ठरलं. त्याने मला

FOR FREE DISTRIBUTION

लग्नाचं कार्ड दिलं नाही. लग्न झाल्यावर काही दिवसांनी जेव्हा मी त्याच्यासंगे बोलायला गेलो, तेव्हा तो माझ्यावर रागावला. त्या दिवशी आणि त्या रात्री मी खूप रडलो आणि देवाला शिव्याशापही दिले.

काही दिवसांनी आई म्हणाली, ''आता तुझं लग्न ठरवू.'' यावेळी मी पेचात पडलो. हळूहळू ही गोष्ट आमच्या नातेवाइकांपर्यंत पोचली. माझ्याच मामाने माझ्या आईला सर्वांसमोर सांगितलं, ''तुझा मुलगा हिजडा आहे, तो लग्नाच्या लायकीचा नाही, त्याच्याशी कुठल्या मुलीचं लग्न लावण्या आधी त्या मुलीला विहिरीत ढकलून द्या.'' यानंतर माझ्या आईवर खूप दडपण आलं. हे कळताच मी ठरवलं की लग्न करणारच. आईला या गोष्टीचा आनंद झाला. माझं लग्न झालं. मी एकदा माझ्या आईची व बहिणीची चर्चा चोरून ऐकली. आई पेचात होती, म्हणाली, ''याला मुलं होतील का?'' पायाखालची जमीन मला गिळून गेली असती तर मी त्यावेळी खूप नशीबवान ठरलो असतो. मंदिरात गेलो आणि सर्वकाही देवाकडे सोपवलं. खरंच देव माझ्या ऐकण्यातला होता. वर्षातच माझ्या बायकोला दिवस गेले. आज मला एक मुलगी व मुलगा आहे. माझ्या लहान भावालाही दोन मुलं झाली. आम्ही मिळून राहत होतो. दिवस चांगले जात होते. घरच्या जबाबदारीचं भान ठेवून होतो.

काही दिवसांनी माझी 'निरामय' संस्थेशी ओळख झाली. मी 'निरामय' संस्थेच्या कार्यक्रमांस जाऊ लागलो. तिथे कंडोमची माहिती कळाली व ते वापरण्याचं महत्त्वही पटलं. एचआयव्ही टेस्टची माहिती व गरज समुपदेशकाने समजावून सांगितली. यानंतर एचआयव्ही टेस्ट करण्याचं ठरवलं. पिअर एज्युकेटरच्या सोबत सिव्हिल हॉस्पिटल येथे रक्त तपासलं. तीन दिवसांनंतर निगेटिव्ह म्हणून रिपोर्ट मिळाला.

FOR FREE DISTRIBUTION

आनंदाला पारावार उरला नाही. मित्रांना पार्टीही दिली.

पुढे मी निरामयमध्ये पिअर म्हणून कामाला लागलो. मी स्पॉटवर जाऊन एमएसएम, टीजी लोकांना भेटू लागलो. त्यांना कंडोम देणे, कंडोम डेमो दाखवणे, गुप्तरोग व एचआयव्हीची माहिती देणे व त्यांना क्लिनिकला आणणे ही कामे करू लागलो.

सर्वकाही व्यवस्थित घडत असताना अचानक कंपनी बंद पडली. घरची लोकसंख्या वाढली होती. पिअरच्या कमी पगारात घर चालवणं शक्य नव्हतं. भावाकडेही चांगली नोकरी नव्हती. खूप मोठी अडचण आली होती. ९वी पासच्या क्वॉलिफिकेशनवर मी नोकरी शोधत होतो, पण नोकरी मिळत नव्हती. मी निराश झालो आणि पुन्हा त्याच 'फिल्ड'चा विचार करू लागलो. मनाशी चंग बांधला आणि पुन्हा केस वाढवले. सोलापूरच्या बाहेर जाऊन, साडी घालून पैसे कमवू लागलो. मनाचा कोंडमारा होत होता, पण माझी मजबुरी होती. आता अशा मार्गाने पैसे कमावणे हाच उपाय उरला होता. काही दिवसांतच आईला या सर्व गोष्टी कळाल्या.

FOR FREE DISTRIBUTION

आईला यल्लम्मादेवी होती. मी या देवीला खूप मानतो. विधीनुसार आईकडून मला यल्लम्मा कधी मिळते याच्या प्रतीक्षेतच होतो. माझ्या मनात लोकांच्या समोर राहून टीजी बनण्याची इच्छा वाढत होती. शेवटी नाइलाजाने आईने यल्लम्मादेवीचा घडा माझ्या डोक्यावर दिला. मी देवासमोर सांगितलं, की मी हे सर्व माझ्या पोटासाठी करत आहे. यानंतर मी देवरुसपण शिकून घेतलं. लुंगी-कुडत्यावर राहू लागलो. केस पण चांगलेच वाढवले. आता मी एका जोगतीचं रूप घेतलं आहे. जेव्हा आमच्या जोगती लोकांचे कार्यक्रम असतात तेव्हा मी घरामधून साडी घालून सर्वांसमोर बाहेर पडतो. काही भक्त लोक माझ्या

पाया पडतात.

मला माझ्या या जीवनाबद्दल खूप वाईट वाटतं. ज्याप्रमाणे एका बाईची/महिलेची जागा समाजात असते, तशी आमची नाही. देवाने आम्हाला असं अर्धवट का ठेवलं हा विचार करून वाईट वाटतं. लोकांची बोलणी ऐकून मन:स्ताप होतो आणि हे जीवन नकोसं वाटतं. आत्महत्या करावी वाटते, पण मुलांचा चेहरा बघून, तसं धाडसही होत नाही. समाजाने आम्हाला स्वीकारावं ही आशा कायमस्वरूपी मनात राहील एवढंच.

*****

FOR FREE DISTRIBUTION

**बापी** (पुणे)

प्रिय वाचक, नमस्कार!

मी संजय. मला बापू किंवा बापी म्हणतात. माझा जन्म एका 'स्लम एरिया'त झाला. तसं पाहिलं तर माझं बालपण खूप गरीब अशा परिस्थितीत गेलं. अशा परिस्थितीतही मला शिकवण्याची माझ्या आईची खूप जिद्द होती, पण तिची ती इच्छा अपूर्णच राहिली, कारण वडील दुसऱ्या एका बाईबरोबर निघून गेले. त्याच्यात माझ्या लहान बहिणीचा जन्म झाला.

तेव्हा माझं वय साधारण ९ वर्षांचं होतं. आई बाळंत झाल्यामुळे घरात कमवतं कुणीच राहिलं नाही. त्यामुळे खाण्याची खूप आबाळ झाली. आम्ही दोन्ही भावंडं आणि आईची उपासमार व्हायला लागली. माझ्या आजीने (आईच्या आईने) आम्हाला मदत केली, पण ती तरी किती दिवस मदत करणार? मग मी पहाटे ४ वाजता उठून, काही बायकांबरोबर कचरा गोळा करण्यासाठी जाण्यास सुरुवात केली. रोज सकाळी उठायचं, कचरा गोळा करायला जायचं. १० वाजता घरी येऊन भात शिजवून, धुणी-भांडी करून मी ११ वाजता शाळेत जायचो. हा माझा रोजचा दिनक्रम बनला.

बहीण २ वर्षांची झाली आणि आईनेही कामाला जायला सुरुवात केली. आई ज्या घरची धुणी-भांडी करायची त्याच घरी मी झाडून-पुसून घ्यायचं काम करू लागलो.

हळूहळू मला जाणीव झाली, की मी इतर मुलांपेक्षा खूप वेगळा आहे. माझ्या बोलण्यात फरक पडला होता. माझा बायकी स्वभाव वाढत होता. माझं मुलांकडे लक्ष जाऊ लागलं. एखादा सुंदर मुलगा

FOR FREE DISTRIBUTION

दिसला तर मनात विचार करायचो, की असा मुलगा आपल्याला जोडीदार (नवरा) म्हणून मिळाला तर किती छान होईल.

माझ्या परिसरातील मुलंही माझ्याकडे वेगळ्या नजरेनं व वेगळ्या भावनेनं बघू लागली. कुणी सेक्सची मागणी, तर कुणी जबरदस्तीने सेक्स करण्याचा प्रयत्न करू लागले.

माझ्या वर्गात असणाऱ्या एका मुलावर माझं एकतर्फी प्रेम बसलं. त्याने त्याचा गैरफायदा घेतला व त्याच्या चार मित्रांसोबत माझ्यावर बळजबरी केली. मी लहान असल्यामुळे त्यापैकी कोणाचंच लिंग माझ्या गुदात गेलं नाही. हा माझ्या आयुष्यातील पहिलाच असा प्रसंग होता. हळूहळू माझ्या एरियामध्ये सगळ्यांना समजलं. मग माझ्या आईलाही कळलं, की आपला मुलगा हा पुरुष नाही.

मी दहावीत गेलो. मोठी शाळा, आणि मुलंही मोठी. पण माझी परिस्थिती बदलली नव्हती. गरिबी असल्याने शाळेची वर्षाची फी भरण्याची माझी ऐपत नव्हती. आणखी त्यात भर म्हणजे फुलपँट, बूट, शाळेचा युनिफॉर्म घालणं अनिवार्य होतं. पण तोही घ्यायला पैसे नव्हते. आईने कामावरून उचल आणली व शाळेतून युनिफॉर्म खरेदी केला. ती माझ्या आयुष्यातील पहिली फुलपँट(नवीन). आयुष्यात पहिल्यांदा बूट घातला.

FOR FREE DISTRIBUTION

वर्गातल्या एका मुलाने– संदीप याने मला ओळखले, की मी वेगळा आहे. त्याने माझ्याशी मैत्री केली. आम्ही रोज शाळा सुटल्यानंतर शाळेच्या समोर गप्पा मारू लागलो. त्यातून त्याला माझी परिस्थिती समजली. तो बऱ्यापैकी चांगल्या घरचा मुलगा होता. त्याने मला मदत करायला सुरुवात केली आणि यातूनच आमच्या दोघांच्या प्रेमाला सुरुवात झाली. तो मला रोज घरी सोडवायला व न्यायला येऊ लागला.

मी सकाळी कचरा गोळा करून विकून येतो, हे मी त्याच्यापासून लपवलं होतं, कारण त्याला जर हे कळलं तर तो मला सोडून देईल याची भीती माझ्या मनात होती. पण हे फार दिवस लपून राहिलं नाही. त्याला ते कळलं. तेव्हा तो म्हणाला, ''तू हे काम करतोस ना? मग सांगायला लाजू नको.''

आमच्या दोघांबद्दल पूर्ण शाळेत चर्चा सुरू झाली, अगदी प्रिन्सिपॉलसहित. त्याचे मित्र मला शाळेत 'वहिनी' म्हणून चिडवायला लागले. मला शाळेत जायची लाज वाटायला लागली. मी संदीपच्या घरी अभ्यासाला जायला लागलो आणि त्यातूनच मग एक दिवशी त्याचा व माझा सेक्स झाला. या सेक्समुळे माझी गुदद्वाराची जागा फाटली. त्यातून 'ब्लीडिंग' होऊ लागलं. जेव्हा आईनं चड्डीवर रक्त पाहिलं, तेव्हा तिनं घाबरून याबद्दल विचारलं. पण आईला कसं सांगणार? आईनी मला दवाखान्यात नेलं. डॉक्टरांनी माझ्याकडून खरं वदवून घेतलं व टाके घातले.

FOR FREE DISTRIBUTION

मला पुस्तकं, वह्या घेण्यासाठी पैसे नव्हते. तेव्हा मी चुलत्याजवळ पैसे मागितले, पण त्याच्याकडे असतानाही त्यानी मला पैसे दिले नाहीत व उलट उत्तर दिलं, ''माझ्याकडे भीक मागण्यापेक्षा बाहेर जाऊन भीक मागून घे.'' हे वाक्य अजूनही माझ्या मनात आहे. आमचं हे बोलणं माझ्या शेजारच्या माणसानं ऐकलं. त्यानं मला रात्री बोलावलं व म्हणाला, ''मी तुला पुस्तकाला पैसे देतो, पण तू माझ्याबरोबर सेक्स कर.'' मी त्याची अट मान्य करून त्याच्याबरोबर सेक्स केला. तेव्हा मला कळलं, की पैसे घेऊन सेक्स करता येतो.

बोर्डाची परीक्षा संपली. ४ मार्कांसाठी माझा गणित विषय राहिला. मी पुन्हा तपासणीसाठी पेपर पाठवला, पण त्याचा काही उपयोग

झाला नाही.

माझी इच्छा होती, की माझ्या भावंडांनी खूप शिकावं, मोठं व्हावं. पण तसं झालं नाही. ८वीपर्यंत शिकून बहिणीने व माझ्या मधल्या भावाने दोघांनीही शाळा सोडून दिली.

शाळा संपल्यानंतरही संदीप येऊन माझी चौकशी करून मला थोडेफार पैसे देऊन जाऊ लागला. आता शाळा तर संपली, पुढे काय? हा प्रश्न माझ्यापुढे उभा राहिला आणि पुन्हा मागच्यासारखं पहाटे उठून, मी कचरा गोळा करण्यासाठी जाऊ लागलो आणि पैसे घेऊन सेक्सही करून घेऊ लागलो.

कचरा गोळा करत असताना मला एका फॅक्टरीत झाडण्या-पुसण्याचं काम लागलं. त्यांना माहीत नव्हतं, की माझं शिक्षण १०वीपर्यंत झालंय. जेव्हा मी काही पावत्या बनवल्या तेव्हा त्यांना आश्चर्य वाटलं व काही दिवसांनी त्यांनी मला फॅक्टरीत कामाला लावलं. ते २००२ साल होतं. तो मालक माझ्यासाठी देवमाणूस ठरला. त्याला मी कोण आहे, हे माहीत असतानासुद्धा त्यांनी मला कामावर ठेवलं व खूप मदत केली. त्यानी मला पुन्हा परीक्षेला बसवलं, पण मला यश आलं नाही. त्यानी माझी भाषा बदलली. माझं राहाणीमान बदलून टाकलं. त्याचप्रमाणे पैशाची बचत कशी करायची हे शिकवलं.

काही दिवसांनी फॅक्टरी बंद पडली. मला कामाची सवय झाली होती. राहाणीमान आणि बोलणंही सुधारलं होतं. आता मला कचरा गोळा करण्याची लाज वाटू लागली.

या काळात मला माझ्यासारख्याच एका व्यक्तीची ओळख झाली. हळूहळू आमची मैत्री वाढत गेली. आम्ही एकमेकांना जीवनातील सुखदु:खाच्या गोष्टी सांगू लागलो. एकास दोघे, मग दोघास

FOR FREE DISTRIBUTION

चौघे अशी आमची साखळी वाढू लागली. नंतर मला कळलं, की आपल्यासारखी अशी बरीच मुलं जगात आहेत. मग रोज रात्री आम्ही जमायला लागलो. गप्पा मारायला लागलो. नंतर काही जण साडी घालून यायला लागले. त्यांना पाहून मनात थोडी भीती वाटायची, पण काही काळाने ती भीती निघून गेली व त्याच वर्षी मी हिजडा समाजात प्रवेश केला. माझी रित गणेश गुरूंच्या नावाने पडली. नंतर ही गोष्ट माझ्या आईला कळाली. ती एक-दोन दिवस रडली, पण नंतर तिने ॲक्सेप्ट केलं.

काही दिवसांनी मी आईपाशी साडी घालण्याचा हट्ट केला; पण आईने सांगितलं, की साडी घालायची नाही.

मला नाचण्याचा फार छंद होता. आम्ही ग्रुपने कोणाच्या ना कोणाच्या लग्नात नाचायला जायला लागलो. त्यात मला खूप पैसे मिळायला लागले. नंतर मी लोकधारेत प्रवेश केला व स्टेज शो करू लागलो. हळूहळू माझी मोठमोठ्या कलाकारांशी ओळख झाली. मी जरी तृतीयपंथी असलो तरी कलाकार म्हणून ओळखला जाऊ लागलो.

या काळात माझ्या आईला नशिबाने महानगरपालिकेच्या हॉस्पिटलमध्ये 'पर्मनंट जॉब' मिळाला. आमच्याजवळ पैसे साठत गेले. पावसाळ्यात गळणारं छप्पर बदलून सिमेंटचे पत्रे बसवले. मला आईने एका लॉन्ड्रीमध्ये ऑपरेटर म्हणून कामाला लावलं.

२००४मध्ये, माझा एक मित्र- सलमा (हिजडा)ने मला, 'एका संस्थेत काम करशील का?' असं विचारलं. काम संध्याकाळी दोनच तास असल्यामुळे मी होकार दिला. ती संस्था म्हणजे समपथिक ट्रस्ट. ही संस्था पुरुष लैंगिक आरोग्यावर काम करते. या संस्थेत मी सुरुवातीला निरोध वाटण्याचं काम करत होतो. काही दिवसांनी या संस्थेत मी

FOR FREE DISTRIBUTION

'आउटरिच वर्कर' म्हणून काम करू लागलो. सकाळी लॉन्ड्रीत काम करून दुपारी ऑफिसला येऊ लागलो.

हे सगळं चालू असताना पुन्हा एका मुलाशी माझी मैत्री झाली आणि त्या मैत्रीचं पुन्हा प्रेमात रूपांतर झालं. त्याचं नाव प्रतीक. आम्ही रोज भेटू लागलो. तो जेवणाच्या सुट्टीतही मला भेटायला येऊ लागला. पण एक ना एक दिवस जे व्हायचं तेच झालं. प्रतीकचं लग्न झालं आणि त्याचा त्याच्या बायकोबरोबर संसार सुरू झाला.

या गोष्टीला आता बरेच दिवस झाले, पण आजही त्याचं व माझं नातं आहे. मी लाँड्रीत काम करतो आणि समपथिकमध्येही काम करतो. मिळतील तेव्हा डान्स शोजही करतो. असा माझ्या जीवनाचा प्रवास चालू आहे.

FOR FREE DISTRIBUTION

*****

## विद्या (पुणे)

माझ्या घरची परिस्थिती खूप गरिबीची होती. वडील बिगारी काम करायचे आणि आई बंगल्यामध्ये जाऊन धुण्याभांड्याचं काम करायची. त्यामुळे घरात पैसा कमी येत होता. आम्ही ३ मुले आणि आईवडील असं कुटुंब होतं. आम्ही तिघेही खूपच लहान होतो. मी ५ वर्षांचा, मोठा ७ वर्षांचा, लहान ३ वर्षांचा. तेव्हा आमच्या वडिलांनी दुसरे लग्न केले आणि ते जास्त करून दुसऱ्या बायकोकडे राहू लागले. त्यामुळे आईची मन:स्थिती खूप बिघडली.

दिवस, महिने पुढे पुढे चालले होते आणि इथे आमची परिस्थिती खूपच वाईट होत होती. जगायचे कसे हा प्रश्न होता. नातेवाईक आम्हाला जवळ करत नसायचे. कारण वडिलांच्या वागणुकीला ते आम्हालाच दोषी ठरवायचे आणि भांडणे करायचे. आईही खूप रडत बसायची. त्यावेळेला स्वयंपाक फक्त एकाच वेळी होत होता– सकाळी. तो पण कधी व्हायचा, कधी नाही. आई एका बंगल्यामध्ये काम करायची. संध्याकाळी कामावरून येताना आई बंगल्यामधून जे जेवण आणायची, तेच आम्ही खायचो. असे ८–९ महिने चालले. तेव्हा वडिलांनी आमच्याकडे वळून पाहिलं आणि ते घरामध्ये थोडे पैसे देऊ लागले.

आई काम करून दमून जायची. अशा वेळेला आई कधी कधी आमच्यावर ओरडायची, मार द्यायची, पण प्रेमही तेवढंच करायची. आई जेव्हा कामावर जायची तेव्हा, वय लहान असल्यामुळे मी व माझा लहान भाऊ आईबरोबर कामावर जायचो. आई काम करायची आणि मी भावाला घेऊन पार्किंगमध्ये बसायचो. त्याच्याबरोबर खेळायचो आणि

FOR FREE DISTRIBUTION

संध्याकाळी घरी जायचो. असा रोजचा दिनक्रम होता. मोठा भाऊ घरीच असायचा. तो सकाळी शाळेत जायचा आणि शाळेतून आल्यावर घरीच थांबायचा. मला बाहेरील पोरांमध्ये खेळायला जायला मिळतच नव्हतं. दिवसभर मी भावाला सांभाळायचो व संध्याकाळी आई त्याला जवळ घ्यायची.

पावसाळ्यात आमचे खूप हाल व्हायचे. झोपडीवर प्लास्टिकचा कागद टाकल्यामुळे तो काही ठिकाणी फाटायचा. तिथून पावसाचं पाणी घरात यायचं. असं आमचं बरेच दिवस चाललं.

मी मराठी माध्यमाच्या शाळेत जाऊ लागलो. शाळा सकाळची होती. मी मोठ्या भावाबरोबर शाळेत जायचो. शाळा सुटल्यावर आईच्या कामावर जायचो आणि भावाला सांभाळायचो. काही दिवसांनंतर लहान भावाला शाळेत टाकलं. आम्ही तिघेही शाळेत जाऊ लागलो. घरी असताना मी भांडी धुवायचो, कपडे घडी करायचो, लहान भावाला घेऊन अभ्यासाला बसायचो.

FOR FREE DISTRIBUTION

काही दिवसांनंतर आईला दुसऱ्या एका बंगल्यामध्ये चांगलं काम लागलं. त्या मालकिणीला आईने परिस्थिती सांगितल्यावर ती जशी जमेल तशी मदत करू लागली. बंगल्यामध्ये काम जास्त पडू लागलं, तेव्हा मी आईच्याबरोबर कामावर जाऊ लागलो. त्या कामात आईला मदत म्हणून छोटी छोटी कामं करू लागलो. फर्निचर पुसणं, झाडू मारणं, पाणी भरणं, अशी कामं करायचो. मालकीण मला बऱ्याच वेळा त्यांच्या मुलांबरोबर खेळायला पाठवायची. मी त्यांच्याबरोबर जायचो, पण मला मनातून खेळणं आवडत नव्हतं, म्हणून मी त्या मुलांबरोबर फक्त उभा राहायचो.

मी जेव्हा ७-८ वर्षांचा होतो, त्यावेळेस आपण साडी घालून

बघावं असं मला वाटू लागलं. मुली शाळेत रंगीबेरंगी कपडे घालून यायच्या, ते खूप आवडायचं. मी जर हे कपडे घातले तर किती छान दिसेन हा विचार करायचो. त्यावेळेस मी मुलींसंगे बोलत थांबायचो. त्या बोलतात कसं ते बघायचो. मला त्यांचं बोलणं खूप आवडायला लागलं. मी घरी एकटा असल्यावर त्यांच्या बोलण्याची नक्कल करू लागलो. शाळेतील मुलांशी बोलताना मुलींचा हावभाव करून बोलायचो. काही मुलं मला, ''असं नको बोलू'' असं सांगत, पण मला असं बोलणं मनातून खूप आवडायचं. काही मुलं माझी मस्करी करू लागली. मुलांना शिव्या देताना मुली जशा शिव्या देतात– 'हलकट', 'मेल्या', त्या मी मुलांना देऊ लागलो. पुढे मोठा होत गेलो तरी मनातून मला मुलींचं बोलणं सोडवत नव्हतं. विचार यायचा, की मी मुलगी असतो तर किती बरं झालं असतं.

या काळात माझ्या अंगात देवीचा संचार होऊ लागला. सुरुवातीला माझ्या घरच्यांनी दुर्लक्ष केलं, पण शेजारील वयस्कर लोकांनी घरच्यांना समजावल्यावर त्यांनी माझा कार्यक्रम करण्याचं ठरवलं (म्हणजे देवीचा संचार असला, की देवीबरोबर त्या माणसाचं लग्न लावून देणं). कार्यक्रम करण्यास हिजडे, जोगते, आराधी येतात आणि त्यांच्यासमोरच कार्यक्रम करतात. कार्यक्रम झाल्यावर मला ते वेगवेगळ्या ठिकाणी कार्यक्रमाला नेऊ लागले. मलाही ते आवडायचं. मी नेहमी त्यांच्याबरोबर कार्यक्रमाला जात असे. त्यावेळेस माझी एका आराधीशी ओळख झाली. त्याचं नाव सुधाकर होतं. तो साडी घालायचा. मी त्याला माझ्या मनातील प्रत्येक गोष्ट सांगत होतो. त्यामुळे मला बरं वाटायचं. काही दिवसांनंतर मी त्याच्या बरोबर वस्तीमध्ये हिंडू फिरू लागलो.

सुधाकरबरोबर फिरण्यास मला माझ्या घरच्यांचा कधी विरोध

FOR FREE DISTRIBUTION

झाला नाही, कारण त्यांना तो आराधी आहे हे माहीत होतं. वस्तीमधील मोठी माणसं मला देवमाणूस म्हणून मान द्यायची. मला हे खूप चांगलं वाटू लागलं. लोक माझ्याकडे देवीचे कोडे (घरातील अडीअडचण, भांडण, आजार) घेऊन येऊ लागली. मला असं वाटायचं, की तृतीयपंथी होणं किती चांगलं.

या दरम्यान मला वस्तीतला एक मुलगा आवडू लागला. काही दिवसांनी त्याने माझ्यासंगे सेक्स केला व नंतर त्याने ते इतर मित्रांना सांगितलं. वस्तीतील मुलांना माहीत पडलं, की मी असा आहे. ती मुलं माझ्या मागे लागू उागली. माझ्या संगे सेक्स करायची आणि माझी खूप चेष्टाही करायची.

मी विचार केला, की माझा देवीचा कार्यक्रम झालाय म्हणजे माझ्या घरच्यांना मी असा आहे हे माहीत असेलच, पण तसं नव्हतं. त्यांना मी कोण आहे हे माहीत नव्हतं. मनात विचार यायचा, की त्यांना कळलं तर ते मला घरात ठेवतील का? ठेवलं तर मला माझ्या मनासारखं जीवन जगता येईल का? जर नाही ठेवलं तर मी कुठं राहणार? मला कुणाचा आधार असेल का? हा सगळा विचार करता मी मला धन्य वाटून घेत होतो, की मला माझ्या देवीचा आधार आहे. लहानपणापासून ते आत्तापर्यंत देवीची पूजा करतो म्हणून हे सर्व झाकून गेलं.

हळूहळू माझ्या घरच्यांना हिजड्यांचा राग येऊ लागला. आपल्या मुलाने केस वाढवून साडी घालायची, बायकी चाळे करायचे, हे त्यांना आवडत नव्हतं. त्यांनी काही दिवसांनी मला हिजड्यांच्याबरोबर रात्रभर जाण्यास बंदी केली. जवळ कुठे कार्यक्रम असला तरच मला पाठवत.

मी दहावीत गेलो. महत्त्वाचं वर्ष. पण माझं अभ्यासात लक्ष

FOR FREE DISTRIBUTION

नव्हतं. वर्गामध्ये मुलं नेहमी मुलींबद्दल बोलायची. मुलं मुलींच्याबद्दल जे बोलायचे त्याच्यावरून मला कधी कधी असं वाटायचं, की मी मुलगी असतो तर माझ्याबद्दलपण मुलं बोलली असती. विचार यायचा, की मी हिजडा का आहे? मी मुलगा असतो तर मी पण आज कुण्या मुलीबद्दल बोलत बसलो असतो. हे विचार डोक्यात खूप यायचे. त्यामुळे अभ्यासाकडे लक्ष लागत नसे. त्यावेळेस माझं मला समजत नव्हतं, की मी नक्की कोण आहे? पण मी घरात आणि बाहेर हे कोणाला सांगू शकत नव्हतो. कधीकधी माझ्या मनात यायचं, की मी पुरुष आहे का हिजडा? काय करावं हे समजत नव्हतं.

आरशामध्ये मी जेव्हा बघायचो त्या वेळेला चेहऱ्यावर आलेल्या लहान लहान मिश्या, हातावर आलेली केसं हे सगळं इतर मुलांमध्येही असायचं. किशोरवयात होणारे हे बदल इतर मुलांकडून ऐकल्यावर खूप वेगळंच वाटायचं. मुलं म्हणायची, की बगलेत केस आले, की सेक्सच्या भावना होतात. मग मी विचार करायचो, की मला मुलींबद्दल तसं काही का नाही जाणवत? मला मुलींचं आकर्षण का नाही? पण मुलांचं आकर्षण होतं. मला हेच काही समजत नव्हतं. या अशा परिस्थितीत मी कमी मार्कांनी दहावी पास झालो व अकरावीला प्रवेश घेतला.

FOR FREE DISTRIBUTION

असेच दिवस जात होते. एके दिवशी माझ्या वस्तीमध्ये देवीचा कार्यक्रम होता. त्या ठिकाणी मोठमोठे हिजडे आले होते. तिथे त्यांची जमात बसली होती. त्या ठिकाणी माझी ओळख बऱ्याच जणांबरोबर झाली. त्या कार्यक्रमात ते दारू पित होते. त्यांनी मला एक ग्लास दिला. मी नको म्हणत असताना माझ्या गुरूने सांगितलं, ''जमातीमध्ये नाही म्हणायचं नसतं. नाहीतर दंड लागतो.'' म्हणून मी तिथे ४-५ ग्लास दारू

पिलो आणि कार्यक्रम संपल्यावर घरी आलो. घरी आईनं तोंडाचा वास घेतला आणि तिनं मला मारलं. मी गप्प झोपी गेलो. दुसऱ्या दिवशी माझ्या गुरूशी आईने संवाद केला. गुरूने सांगितलं, ''हा देवाचा मान असतो. सगळेच थोडीतरी घेतात, पण मी याला यापुढे जास्त पिऊ देणार नाही'', पण हळूहळू मला दारूची गोडी निर्माण झाली.

१२वीची परीक्षा जवळ आली. माझे अभ्यासाकडे लक्ष नव्हते. परीक्षेच्या वेळेस मी अभ्यासासाठी एका मित्राच्या रूमवर जायचो व तिथे दारू प्यायचो. पिल्यानंतर माझा काहीच अभ्यास व्हायचा नाही. मी नापास झालो. घरचे माझ्यावर खूप ओरडले.

१२वी नापास झाल्यावर माझं शिक्षण तिथेच थांबलं व मी बिगारी कामाला जाऊ लागलो. त्यावेळेला दर शनिवारी पगार व्हायचा. पगार घेतल्यावर मी दारू पिण्यासाठी जायचो, पुरुष जोडीदार शोधायचो. जोडीदार मिळाला, की त्याच्या संगे सेक्स करायचो.

FOR FREE DISTRIBUTION

पुढे आईची तब्येत बिघडली. त्यामुळे घरात स्वयंपाक आणि धुणीभांडी करण्यास कोणच नव्हतं. आई म्हणाली, ''मी जिवंत आहे तोपर्यंत कुणीतरी लग्न करा.'' दोघेपण तयार नव्हते. आई मला म्हणाली, ''तू लग्न कर.'' माझ्या मनात लग्नाचा विचार नव्हता. मी माझ्या मावशीला सांगितलं, की मला मुलांमध्ये आवड आहे, मुलींमध्ये नाही. त्यावर मावशी म्हणाली, ''असं काही नसतं.'' मला वाटलं मावशी मला समजून घेईल, कारण मावशीचं आणि माझं बोलणं जास्त चालायचं. पण तसं झालं नाही. माझा नाइलाज झाला. मी होकार दिला. आईने मुलगी बघण्यास सुरुवात केली. मुलगी बघणे, साखरपुडा हे कार्यक्रम होत असताना मी गप्पच राहिलो. लग्नाचे दिवस जवळ आले. मला खूप भीती वाटत होती. लग्नाच्या आठ दिवस अगोदरपासून मी

खूप रडत होतो. मला असं वाटायचं, की होणाऱ्या बायकोला सर्व सांगावं, पण गप्प राहिलो. मनात विचार यायचे, की मी एका मुलीच्या आयुष्याबरोबर खेळत आहे. हा अधिकार मला देवाने दिला नाही. मी खूप अस्वस्थ होतो.

लग्न झालं. त्या दिवशीही मला खूप भीती वाटत होती. मी माझ्या मनाला सावरले. लग्नाला आलेले पाहुणे आठ दिवस होते. त्यानंतर आम्ही देवाला तुळजापूरला गेलो. तिथं माझ्या अंगात वारे (देवीचा संचार) आले. मला वाटलं, हे बघून आता ती माझ्याबरोबर राहणार नाही. तिनं मला विचारलं, ''तुम्ही देवीची पूजा-आरती वगैरे करता का?'' मी ''हो'' म्हटलं. ''मला हे लहानपणापासून आहे.'' ती थोडी नाराज झाली. मला वाटलं आता ती निघून जाणार, पण तिच्या आईवडिलांनी तिला सांगितलं, की काही त्रास होत नाही.

मग मी विचार केला, की मी दारू पितो हे तिला दिसलं, तर ती निघून जाईल. पण मी दारू पिल्यावर मला आईनं खूप झापलं, ''आता संसाराकडे लक्ष दे. दारू पिऊ नकोस.''

FOR FREE DISTRIBUTION

मनाने तर दु:खी होतोच पण विचार केला, की आपल्याला व आपल्या घरच्यांना कोणी वाईट बोलू नये म्हणून स्वत:मध्ये बदल केलाच पाहिजे. वस्तीमधून मी बायकोबरोबर चालत असताना मुले हसायची. ते मला आवडत नव्हतं. ते लक्षात घेऊन मी स्वत:मध्ये बदल करू लागलो. बायकी भाषेत बोलणं बंद केलं. बोलताना जे हातवारे व्हायचे ते सर्व पुरुषाप्रमाणे करायचा प्रयत्न करू लागलो.

लग्न झाल्यावर ७-८ महिने गेल्यानंतर बायकोला दिवस गेले. मला खूप आनंद झाला. हे देवा तुला धन्यवाद! काही दिवसांनंतर मला पहिला मुलगा झाला. कालांतराने दुसरा मुलगा झाला. आता कुणाला मी

हिजडा आहे हे सांगून फायदा नव्हता.

आता माझे बाहेरचे जीवन बाहेर जगतो. पुरुषांबरोबर सेक्स बाहेर करतो. पुरुष जोडीदार लांबचेच शोधतो, म्हणजे घरात खबर लागणार नाही. माझ्या पुरुषांबद्दलच्या सेक्सच्या भावना बंद होऊ शकणार नाहीत.

पूर्वी मला साडी घालण्याची इच्छा होती. केस वाढवण्याची इच्छा होती. घरात 'ओपन' व्हायची इच्छा होती. या सर्व इच्छा आता आपल्या मनातच ठेवून हे जीवन जगावे लागणार. विचार येतो, लग्न नसतं केलं तर बरं झालं असतं. पण आता दुहेरी जीवन जगण्याशिवाय पर्याय नाही.

FOR FREE DISTRIBUTION

*****

**संती** (पुणे)

माझी कौटुंबिक परिस्थिती तशी ठीक होती. माझ्या कुटुंबात माझे बाबा, मी, माझी बहीण, भाऊ व माझी आई असा ५ जणांचा आमचा परिवार होता. माझ्या आईला हृदयविकार असल्याने ती कुठेही बाहेर काम करत नसायची व डॉक्टरांनी सांगितलं होतं, की तिने बाहेर काम केल्याने तिची तब्येत खालावत जाईल. माझे बाबा तिची खूप काळजी घ्यायचे. त्या दोघांचा एकमेकांवर खूप जीव होता. माझे बाबा रोजंदारीवर कामाला जायचे. ते खूप कष्टाळू, प्रामाणिक व शांत स्वभावाचे होते. त्यांनी आम्हाला कधीही काही कमी पडू दिलं नाही.

बाबांना दोन बहिणी होत्या. त्यांचे लग्न होऊन त्या सासरी असायच्या. माझ्या आत्यांना, एकीला एक मुलगा होता व दुसरीला एक मुलगा व एक मुलगी होती. त्या जेव्हा सण उदा., रक्षाबंधन, भाऊबीज या कालावधीत आमच्या घरी यायच्या, तेव्हा घर खूप भरगच्च वाटायचं आणि खूप मजा असायची. मग आम्ही सर्व सिनेमा बघायला जायचो, बागेत जायचो. इतर दिवशी आम्ही कधी घराबाहेरसुद्धा जात नसायचो.

माझ्या बाबांचा माझ्यावर तिळमात्र जीव नव्हता. त्यांना माझी बहीण व भाऊ खूप आवडायचे. माझी आई मला खूप जीव लावायची. मी कुठे बाहेर चाललो, की माझी आई बरोबर यायची. घरात आई स्वयंपाक करत असली तर मी तिच्याजवळ बसायचो. माझे बाबा खूप चिडायचे, म्हणायचे, 'याला सारखी आई जवळ पाहिजे. आईला चिकटून बसतो.'

माझं लहानपण खूप मजेत गेलं. मी लहान असताना मुलींमध्ये खेळायचो. मुलींचा सहवास मला ओढून न्यायचा आणि मलाही खूप

FOR FREE DISTRIBUTION

मनमोकळं वाटायचं. मन रमून जायचं. त्या मुलींमध्ये मला खेळताना आनंद मिळायचा. आम्ही सर्व एकत्र जेवायचो, खेळायचो, मात्र झोपताना आम्ही आपापल्या घरी जायचो. मी घरी गेल्यावर बाबा जरा उदास, नाराज दिसायचे. बाबा बोलायचे– ''आला तो मुलींमध्ये खेळून.'' झोपताना उद्या कोणता खेळ खेळायचा हा विचार माझ्या मनात शिजायचा. सकाळी सकाळी त्या मुली मला उठवायला यायच्या, कारण मी खूप आळशी होतो. मला लवकर उठायचा खूप कंटाळा यायचा. त्या आरडाओरडा करून मला उठवायच्या. एकतर सकाळच्या वेळेस घरात स्वयंपाकाचा पसारा, राडा असायचा. तशात मी खेळायला त्या मुलींबरोबर जायचो. माझ्या मैत्रिणी (पिंकी, गुड्डी, रेश्मा, सविता) सकाळी आल्या, की बाबा चिडचिड करायचे. डबा घ्यायचे व चहा न पिता निघून जायचे.

आम्ही सर्व बालवाडीच्या शाळेच्या कट्ट्यावर खेळायचो. माझ्या घराच्या जवळ एक पडीक, मोकळी जागा होती व तिथे मातीचे ढिगारे होते. आम्ही तिथून माती आणायचो, ती चाळून चिखल करून त्याची चूल बनवायचो व ती चूल उन्हात ठेवायचो. ती सुकल्यावर काड्या, लाकडाचे बारके तुकडे, वाळलेल्या फांद्या आणायचो आणि ती चूल पेटवायचो. आम्ही सर्वजण घरातली छोटी भांडी, घरातली भाजी, चपातीचे तुकडे आणायचो. मग ती भाजी गरम करायचो आणि एकत्र बसून खायचो. त्यावेळी खूप आनंद व्हायचा. ती मजा खूप निराळी होती.

मी मुलींमध्ये खेळत असताना मुलं खूप चिडवायची, ''अरे मुलींमध्ये काय खेळतोस, चल आमच्याबरोबर खेळायला. आपण पतंग, बॅट बॉल, गोट्या खेळू.'' मी मुलांना टाळायचो. ती मुलं आली, की मला भीती, घबराट व घाम यायचा. हे असं का? माहीत नाही.

FOR FREE DISTRIBUTION

मुलांबरोबर माझी मैत्री सहजासहजी लवकर होत नव्हती. मुलांबरोबर बोलतानाही माझी जीभ अडखळायची आणि मी घाबरत बोलायचो. पण एक अपवाद होता. माझ्या घराजवळ सागर नावाचा मुलगा होता. त्याच्याबरोबर खेळायला मला आवडायचं. तो खूप शांत असायचा आणि त्याचं आणि माझं खूप जमायचं.

वयाच्या सहाव्या वर्षी मला माझ्या बाबांनी इयत्ता १लीमध्ये टाकलं. शाळा कॉर्पोरेशनची होती. एका वर्गात ६० मुलं असायची. मला शाळेत जायचा खूप कंटाळा यायचा. त्या ६० मुलांमध्ये दुपारी १२ ते संध्याकाळी ५.३० पर्यंत बसायला लागायचं. तिथं गेल्यावर वर्ग म्हणजे सिनेमातलं कारागृह वाटायचं. कधी ५.३० वाजतात आणि मी येथून कधी घरी जाईन असं वाटायचं. शाळा सुटल्यावर सर्वांत प्रथम मी धावत घरी जायचो. कपडे बदलायचो व लगेच त्या मुलींमध्ये खेळायला जायचो. पण उन्हाळ्यात व सुट्टीत त्या मुली त्यांच्या नातेवाइकांकडे जायच्या. मग मात्र मी एकटा पडायचो. मग नाइलाजाने मी सागरबरोबर खेळायचो.

FOR FREE DISTRIBUTION

सागर मुद्दामहून मला मुलांमध्ये खेळायला न्यायचा. मी दबकत, घाबरत जायचो. एकदा असं झालं, की आम्ही लपंडाव खेळत होतो. आम्ही सर्व अंधाऱ्या, गल्ली-बोळ अशा ठिकाणी लपायचो. मी एका दुकानाच्या मागे अंधारात लपलो व माझ्या शेजारी सागर होता. त्या अंधारात तो मला चिकटून उभा राहिला. माझ्या मागच्या बाजूला तो घासू लागला. त्या वेळेस मला काहीतरी वेगळं वाटलं. मी शांतपणे उभा राहिलो. त्यावेळेस मला एवढं काही समजत नव्हतं. माझी इच्छा नसली तरी मला लाडीगोडी लावून सागर मला खेळायला न्यायचा व चोळाचोळी करायचा.

का कोण जाणे, हळूहळू मला शाळेची आवड निर्माण झाली.

असं वाटायचं, की रविवारची शाळा असावी. चौथीत असताना जाकिर नावाच्या मुलाशी माझी मैत्री झाली. तो माझ्यापेक्षा थोडा मोठा होता. खूप मारामारी, धिंगाणा करायचा. माझी छेडछाड करायचा, पण मी कधीही त्याच्याशी भांडण केलं नाही. मी शांत बसायचो. हळूहळू जाकिर माझ्याशी खूप छान बोलू लागला. मला कोणी बोललं, की तो त्यांना बोलायचा. म्हणून मुलांनी मला छेडणं, बोलणं बंद केलं. तो माझ्याशी चांगलं बोलायला लागल्यावर माझा विश्वासच बसत नव्हता. मला असं वाटायचं हा जाकिर नसून दुसराच कोणीतरी आहे. आम्ही दोघं एकाच पाटावर बसायचो. मी जर दुसऱ्या पाटावर बसलो तर तो तिथं यायचा. तो माझ्या शेजारी बसल्यावर माझ्या मनात भीतीचा डोंगर उभा राहायचा. पण माझ्याबरोबर राहून तोही शांत झाला. भांडण, मजामस्ती करत नव्हता. तो मन लावून अभ्यासही करू लागला.

त्याला पोहण्याचा खूप नाद होता. पोहायला येत नसायचं, पण नदीच्या कडेला कंबरेइतक्या पाण्यात बसायचा. तो पोहायला जाताना माझ्या घरी यायचा व मला घेऊन जायचा. मला त्या नदीच्या पाण्याची खूप भीती वाटायची. त्याचे कपडे संभाळण्यासाठी मी कपड्यापाशी बसायचो. पाण्यात पोहताना तो अंगावरचे कपडे काढायचा. अंडरवेअरसुद्धा. कारण अंडरवेअर ओली झाल्यावर त्याचे आईबाबा त्याला मारायचे, म्हणायचे की पोहायला जाऊ नको. तो उघडा झाल्यावर मी त्याच्याकडे एकटक बघायचो.

त्यावर्षी माझा दुसरा नंबर आला. जाकिरचा २४वा नंबर आला, तरीही जाकिर आनंदी होता, कारण जाकिर तिसरीत असताना कसाबसा काठावर पास झाला होता. मी पेढे आणले, सर्वांना दिले. जाकिरच्या घरचे खूप खूश झाले होते. त्यांनी गोड जेवण केलं व मला जेवायला बोलवलं, म्हणाले, ‘‘अरे संतोष, तुझ्या संगतीने जाकिर चांगल्या

FOR FREE DISTRIBUTION

मार्कांने पास झाला.'' मी पहिल्यांदा त्यावेळी त्याच्या घरी गेलो.

पुढे पुढे तो माझी खूप काळजी घेऊ लागला. दुपारी जेवताना तो माझ्याबरोबरच जेवायचा. आम्ही एकमेकांना घास भरवायचो. तेव्हा ते मित्रप्रेम वाटायचं, पण नंतर काही दिवसांमध्ये माझ्या मानसिक भावना वेगळ्या तऱ्हेच्या होऊ लागल्या. मला तो आवडू लागला. त्याच्याबद्दल माझ्या मनात वेगळीच भावना उफाळू लागली. तो दिसला किंवा माझ्या शेजारी जरी बसला तरी माझ्या मनात काहीतरी वेगळं वाटायचं. याच्या आधी असं होत नव्हतं. माझ्याबरोबर खेळणाऱ्या मुलीही मोठ्या झाल्या होत्या. त्यांना मुलं आवडतात असं त्या मला सांगायच्या. मला असं वाटलं, की त्यांनाही मुलं आवडतात, मलाही मुलं आवडतात. माझ्या मित्रांना व सागरला मुली आवडतात. मग माझ्या बाबतीतच असं का? मी खूप घाबरलो. मला काहीच सुचेना. मी काय करू? कुणाला सांगू? मनात भीती वाटायची, मी कुणाला सांगितलं व त्यानी जर दुसऱ्या कोणाला सांगितलं तर हे सर्वांना माहीत पडेल.

FOR FREE DISTRIBUTION

मी अस्वस्थ होतो. शांत शांत असायचो. माझी आई मला विचारायची, ''तुला बरं वाटत नाही का? काय होतंय? तू असा शांत का राहतोस?'' मी त्यावर बोलणं टाळायचो. त्यात माझ्या शेजारच्या मुलांनी मला नोकर करून ठेवलं होतं. ती मुलं मला सांगायची, ''अरे, मला ती पिंकी खूप आवडती, जरा दोस्ती करून दे, कारण तू मुलींमध्ये असतोस त्यामुळे ती तुझं ऐकेल.'' दुसरा म्हणायचा, ''अरे संतोष, त्या सविताकडे माझं प्रेमपत्र दे.'' इतर मुलं मला चिडवायची. अशा वेळेस मला वाईट वाटायचं, पण काय करणार? पर्याय नव्हता, हिंमत नव्हती, धाडस नव्हतं, नाइलाज होता. असं वाटायचं, की ती मुलं त्या मुलींची एवढी काळजी घेतात; पण माझी काळजी घेणारा असा कोणता मुलगा असेल का? त्यांचं प्रेम बघून मी खूप जळायचो, त्या मुलामुलींवर

चिडचिड करायचो. माझ्या वाट्याला असं का नाही? मग ठरवलं, की शाळा सुटल्यानंतर घरातून बाहेर पडायचं नाही. तो प्रयत्न काही दिवसांपुरता यशस्वी झाला. घरी मला टीव्हीवर वर्ल्ड रेसलिंग एन्टरटेन्मेंट खूप आवडायचं. माझ्या अभ्यासातही प्रगती झाली खरी, पण मनात, ध्यानात, स्वप्नात जाकिर यायचा. त्याचा शाळेतला सहवास मला मोहून टाकायचा. पण जाकिरला माहीत नव्हतं, की मी त्याच्याकडे वेगळ्या भावनेनं पाहतोय.

एक दिवस जाकिर म्हणाला, ''माझ्या घरचे गावी गेलेत, तर तू दोन दिवस घरी झोपायला येशील का?'' मनात तर लाडू फुटत होते. मी त्याला म्हटलं, ''माझ्या घरच्यांना मी नाही सांगणार, घरच्यांना तू सांग तर ते ऐकतील.'' घरच्यांनी होकार दिला. मग मी त्याच्याबरोबर त्याच्या घरी गेलो. मला चालताना क्षणभर वाटलं, की मी खरंच माझं घर सोडून चाललोय. मग घरी गेल्यावर जेवण गरम केलं व आम्ही दोघं जेवलो. जेवण झाल्यावर थोड्या गप्पा मारल्या व झोपलो. माझ्या मनात आलं, की हा माझ्या अंगावर हात टाकेल, मला स्पर्श करेल, पण तसं त्यानी काहीच केलं नाही. मला असं वाटायचं, की मी त्याला स्पर्श करावा, पण मला ते योग्य वाटत नव्हतं. मी रात्रभर झोपलो नाही. सकाळी मी घरी गेलो. माझे डोळे लाल झाले होते. कचकच करत होते.

संध्याकाळी जाकिर आला. मला म्हणाला, ''चल घरी जाऊया.'' माझ्या डोळ्यावर झोप आली होती. आम्ही माझ्या घरी जेवलो व त्याच्या घरी गेलो. झोपायच्या आधी तो गप्पा मारू लागला, पण माझा मूड नव्हता. झोपल्यावर मला अचानक मध्यरात्री जाग आली, मला त्याला स्पर्श करावासा वाटत होता. माझा माझ्यावरचा संयम सुटला. मी त्याच्या पायावर पाय टाकला. त्या रात्री मी त्याला उत्तेजित केलं व आमचा सेक्स झाला.

FOR FREE DISTRIBUTION

सकाळी उठल्यावर तो माझ्याकडे बघू लागला. मी घाबरलो आणि लाजलोही. तो म्हणाला, ''अरे संतोष, हे असं कसं काय केलं तू? हे मला स्वप्नातही वाटलं नव्हतं. मला तुझ्याकडून चांगल्या मैत्रीची अपेक्षा होती, पण त्या सर्वांचा अपेक्षाभंग झाला.'' मी तिथून निघून गेलो.

घरी गेल्यावर मी परत झोपलो. मागच्या बाजूला वेदना होत होत्या. मला ताप व कणकण आली. मी घरच्यांना सांगितलं माझी तब्येत जरा ठीक नाहीये तर मी आज शाळेत जात नाही. दिवसभर जाकिरची मी वाट पाहत राहिलो, पण जाकिर काही आला नाही. संडास करताना खूप वेदना होत होती. रक्त पडायचं. खूप वेदना व चमका यायच्या. देवाच्या नावाने शपथा घ्यायचो, की आई जगदंबे असं परत कधीच करणार नाही. त्या दिवशी मी डॉक्टरांकडे गेलो आणि त्यांना सांगितलं, की मला असं असं होतंय. त्यांनी मला टॉनिक लिहून दिलं, गोळ्या दिल्या. मी दवाखान्यातून घरी गेलो. माझ्या भावाने मला सांगितलं, ''अरे जाकिर आता येऊन गेला. तो म्हणाला, 'संतोषला सांग जर बरं वाटत नसेल तर अजून चार-पाच दिवस आराम कर. संतोष येईपर्यंत मी थांबतो', पण मीच त्याला घरी पाठवलं.'' जाकिर आला म्हणून मला बरं वाटलं. आठ दिवसांनी मी शाळेत गेलो. तो शाळेच्या पटांगणावर भेटला. त्याने मला मिठी मारली. म्हणाला, ''संतोष, आता बरं वाटतंय का?'' मी म्हटलं, ''हो.'' माझे डोळे भरून आले. मला क्षणाक्षणाला तो बरोबर असावा, आम्ही दोघं नवरा-बायकोसारखं राहावं, एकमेकांच्या सल्ल्याने, मार्गदर्शनाने जीवन जगावं, आमच्या दोघांमध्ये तिसरं कोणी नसावं असं वाटत होतं.

मी विचार केला, मला होणाऱ्या मानसिक भावना त्याला सांगाव्या, कारण मला मन हलकं करायचं होतं. मी जाकिरला म्हटलं,

FOR FREE DISTRIBUTION

''रविवारी आपण जरा बाहेर जाऊ. तुला मला काहीतरी सांगायचंय.'' मग आम्ही बागेत गेलो. बाकड्यावर बसलो. भीती वाटत होती. मी दबकत दबकत सर्व सांगितलं. त्याला ते ऐकून विश्वास बसेना, पण त्याला मी म्हटलं, ''हे सर्व खरं आहे.'' तो म्हणाला, ''मी यातलं कुणालाही कधीच सांगणार नाही हे मी तुला वचन देतो, पण हे सर्व एखाद्या चांगल्या डॉक्टरांना सांग.'' घरी गेल्यावर माझं मन हलकं झालं होतं आणि माझ्या चेहऱ्यावर बऱ्याच दिवसांनंतर थोडंसं हसू आलं होतं.

काही दिवसांनंतर माझ्यावर दु:खाचा डोंगर कोसळला. वडील मरण पावले. त्याचं कारण असं, की त्यांनी मद्यपान केलं होतं. चक्कर येऊन दुकानात डोक्यावर पडले आणि दवाखान्यात नेईपर्यंत ते मरण पावले. त्यावेळेस त्या दुकान मालकाने मदतनिधी म्हणून आम्हाला ५०,००० रुपये दिले. माझ्या आईने माझ्या नावावर २०,००० रुपये, माझ्या भावाच्या व बहिणीच्या नावावर १५,००० रुपये बँकेत एफ.डी. करून ठेवले.

FOR FREE DISTRIBUTION

आर्थिक परिस्थिती खालावली. बाबा गेले, त्यात आईला हृदयविकार असल्याने आईची तब्येत खालावत गेली. माझं शाळेकडे दुर्लक्ष झालं. जाकिर आणि माझ्या भेटी कमी झाल्या. मी घरातील साफसफाई करायचो, कपडे धुवायचो. त्यातच माझ्या बहिणीने १०वीत शाळा अर्धवट सोडली. आई मला ओरडायची, ''अरे तू शाळेत जा.'' मग मी परत शाळेत जाऊ लागलो. शाळेत सर्वांना माहीत झालं होतं, की माझे बाबा गेले. जाकिर, त्याचे मित्र आणि बाई यांनी मला आधार दिला. म्हणाले, ''तू हार न मानता तुझं शिक्षण असंच पुढे चालू ठेव. शिक्षण सोडू नकोस.'' मी शाळेत जायचो आणि माझ्या मामाच्या दुकानात संध्याकाळी ६ ते १० या वेळात जाऊन बसायचो. माझा मामा थोडीफार आर्थिक मदत करायचा.

काही दिवसांनी माझी आई मरण पावली. मग मात्र कौटुंबिक स्थिती खूप बिकट झाली. माझी बहीण आणि भाऊ आजी व मामाकडे राहायला गेले. शाळेतून आल्यावर मी लग्नसराईमध्ये रात्रपाळी करायचो. केटररकडे भाजी चिरणे, मसाला वाटणे ही कामे करायचो. त्यात थोडीशी रक्कम मिळायची व वरखर्च निघून जायचा. माझी बहीण सोसायटीमध्ये घरकाम, पोळ्या लाटणे, हे काम करायची व मलाही थोडे पैसे द्यायची. पैसे कमी पडले तर मी मुंबईला जाऊन आत्याकडून पैसे घेऊन यायचो.

दिवाळीची सुट्टी चालू झाली व मी मुंबईला आत्याकडे गेलो. तिथे मी एका ऑफिसात ऑफिसबॉयचं काम करू लागलो. तिथे काम करत असताना वडाळा बस डेपोसमोर एक मुलगा रोज माझ्याकडे बघायचा. हळूहळू त्याने माझ्याशी दोस्ती केली. एक दिवस त्यानं मला दूर नेलं व तिथे गेल्यावर त्यानं मला त्याच्यावर गुदमैथुन करायला लावलं. पुढे आमची मैत्री छान जमली. सुट्टी असल्यावर मी त्याच्याबरोबर फिरायला जायचो. आम्ही जेव्हा मार्केटमध्ये जायचो तेव्हा मुलं आम्हाला 'गुड', 'मामू' असं म्हणायचे. माझ्यासाठी हे नवीन होतं. मी त्याला विचारायचो, ''हे नक्की काय रे?'' तेव्हा त्यानी मला सांगितलं. मला खूप वाईट वाटलं.

मी पुण्यात आल्यावर शाळेत जाऊ लागलो. त्यावेळी माझ्या नातेवाइकाच्या एका मुलाशी– पांडूशी ओळख झाली. तो लेडिजसारखे हावभाव करायचा, बोलायचा, वेशभूषा करायचा. मी त्याच्याशी पहिल्यांदा बोललो तेव्हा घाबरत घाबरत बोललो. मी त्याला म्हटलं, ''असं का करतोस?'' तो म्हटला, ''मला असंच आवडतं''. मला माझ्या मनात तसंच वाटायचं, पण काय करू? मनावर खूप मोठं दडपण यायचं. त्याचं देवाची पूजा करणं, देवीला साडी घालणं, देवीला नटवणं दिवसभर तेच चालायचं. नंतर नंतर मी रविवारी सुट्टी असल्यावर

FOR FREE DISTRIBUTION

त्याच्याकडे जाऊन बसायचो. तोही माझ्याशी खूप छान बोलायचा. बोलता बोलता तो मला म्हणाला, ‘‘मला पुरुष आवडतात. मी त्यांच्याबरोबर संभोग करतो.’’

पांडूबरोबर राहून माझ्या वागणुकीत बदल होत गेला. मी बाहेर जाताना काजळ घालू लागलो. कुंकवाचा टिका लावू लागलो आणि हात हालवत चालू लागलो. मुलं माझ्याकडे पाहायची, आवाज द्यायची, शुक शुक करायची व शीळ वाजवायची. कुणीतरी आपल्याकडं बघतंय म्हणून आनंद व्हायचा. शाळेकडे दुर्लक्ष व्हायचं. माझ्या बायकीपणामुळे मला शाळेत जायचीही लाज वाटू लागली. जेव्हा मनात येईल तेव्हा मी शाळेत न जाता, अलका थिएटर चौकाजवळ नदी काठावर फिरायचो आणि ६च्या बसनी घरी जायचो. नंतर पांडूचा सहवास एवढा आवडू लागला, की मी शाळेत जाणं बंद केलं. हे माझ्या आत्याला कुणीतरी सांगितलं. मग माझ्या दोन्ही आत्या व दोन मामा मला भेटायला पुण्याला आले.

FOR FREE DISTRIBUTION

मी घरात झोपलो होतो. माझ्या कानात रिंगा होत्या. केसाचं वेगळं वळण होतं. मी दाढी मिश्याही काढल्या होत्या व डोळ्यात रात्री घातलेलं थोडंसं काजळ होतं. त्यांनी दरवाजा वाजवला, मी दरवाजा उघडला. ते आत आल्यावर माझ्याकडे पाहता क्षणी त्यांच्या डोळ्यात अश्रू आले. ‘‘हे असं कसं झालं. पुरुषासारखा पुरुष तू, हे काय बायल्यावाणी केलंस?’’ त्यांच्या रडण्यानी घरापाशी शेजारपाजाऱ्यांचा जमाव जमला. मला तो प्रसंग पाहून खूप रडायला आलं. त्यांनी मला रिंगा काढायला लावल्या, डोळ्यातलं काजळ पुसायला सांगितलं. केस व्यवस्थित विंचरायला लावले. मग ते शाळेकडे वळले. मी सांगितलं, ‘‘मला मुलं हसतात, चिडवतात, त्यामुळे मी शाळेत जात नाही व जाणारही नाही.’’ दुसऱ्या दिवशी ते चौघेजण माझ्याबरोबर शाळेत आले

व त्यांनी सरांना विचारलं, तेव्हा सर बोलले– ''संतोष खूप शांत आहे. वर्तणूक चांगली आहे. अभ्यासातही तो हुशार आहे, पण गेले काही दिवस तो शाळेत आला नाही. आला तरी तो खूप अस्वस्थ असतो. मी त्याला एकदा विचारले, 'तुला काही अडचण आहे का?' तर तो 'नाही' म्हटला.'' मग सर म्हटले, ''जर काही प्रॉब्लेम असेल, तर तुम्ही त्याला गावाला घेऊन जा.'' तेवढ्यात मामा पचकला, ''याला आपण वसतिगृहात पाठवूया, म्हणजे हा सुधारेल व पुढं त्याचं भविष्यही उज्ज्वल होईल.'' मी संतापलो व तिथून निघून घरी आलो. घरात दार लावून मी एकटाच रडत बसलो. नंतर ते चौघे घरी आले. माझ्या दुसऱ्या आत्याचा माझ्यावर खूप जीव होता. ती म्हणाली, ''हा काय मुद्दाम करत नाही. त्याला असं का होतं, ते आपण देवऋषाला विचारू, तो नक्की खरं सांगेल आणि त्याला वसतिगृहात वगैरे काही ठेवायचं नाही. तो जरी अनाथ झालाय तरी त्याला आपण आहोत. त्याला असं कधी वाटलंही नाही पाहिजे, की त्याला कोण नाहीये.'' हे ऐकताच माझं रडणं थांबलं. त्याच दिवशी संध्याकाळी दारात पांडू आला. मग हे सगळे पांडूवर संतापले व त्याला शिव्या देऊ लागले, ''तुझ्यामुळे आमचं पोरगं बिघडलं.'' ते ऐकताच पांडू टाळ्या वाजवून निघून गेला.

मंगळवार चांगला दिवस म्हणून त्या दिवशी मला देवऋषाकडे नेलं. देवऋषी पैशांच्या मागे लागलेले असतात. त्यानी नेहमीसारखं, ''त्याला घरच्या कुलदैवताची नड आहे. तुम्ही त्याला तिथे नेऊन देवाच्या पायावर मस्तक ठेवून देवाला हार, नारळ, ओटी, साडी देऊन या''असं सांगितलं.

काकाला समजल्यावर, तो माझा खूप द्वेष करू लागला. माझ्याशी बोलणंही बंद केलं. तो नेहमी म्हणायचा, ''यानी आमच्या नावाला काळिमा फासला. आता आमचं नाकच कापलं गेलं. आम्ही

FOR FREE DISTRIBUTION

आमच्या जातीत वर मानेनं जगत होतो, पण आता ते शक्य नाही. एवढा मोठा कलंक लागेल, असं कधीच वाटलं नव्हतं.'' माझी छोटी आत्या म्हणाली, ''हे तो मुद्दाम करत नाही, त्याला देवाची नड आहे.'' काका म्हणाला, ''कसली नड? हा त्या लोकांमध्ये राहून असं करायला लागला. हे देवाचा शापबिप सर्व खोटं आहे.'' त्यानंतर काका रागाने उठून गेला. मग आत्या म्हणाली, ''तू आता आमच्याबरोबर मुंबईला चल.'' मग मी मुंबईला गेलो व तिथे राहू लागलो.

मुंबईत मला एक मुलगा (तो गुजराती होता) भेटला. तो दिसायला सुंदर व रुबाबदार होता. तो मला खूप जीव लावायचा. आम्ही दोघं रोज संध्याकाळी फिरायला जायचो. त्याच्या घरी कोणी नसताना त्याच्याबरोबर सेक्स करायचो.

त्याला दारू पिण्याची सवय होती. तो दारू प्यायचा व तो पिताना मी त्याच्याशी गप्पा मारत बसायचो. तो पिताना मला पिण्याचा आग्रह करायचा. मग मी एक पेग घ्यायचो. त्याच्यामुळे मला बियर प्यायची सवय लागली. काही दिवसांनंतर मी एकनिष्ठ नाही, हे कळल्यावर त्यानी मला मारलं व रागानं मी ते नातं तोडलं.

FOR FREE DISTRIBUTION

पुण्याला आलो. पुण्यात एका इस्टेट एजन्सीमध्ये कामाला लागलो. तिथे मला २०००/- रु. महिना पगार मिळायचा. त्यातले १००० रु. आत्याला पाठवायचो व ते पैसे ती माझ्या नावानं बँकेत जमा करायची. तिला बरं वाटायचं, की आता हा नक्की सुधारलाय, काम करतोय. मी मात्र काम सुटल्यावर संध्याकाळी पांडूला व त्याच्या मित्रांना भेटायचो. त्यांच्यात जास्त वावरू लागलो. ते वेगळ्या भाषेत बोलायचे. त्यातलं मला काही कळत नव्हतं. पांडू मला सांगायचा- ''ही 'कोती' भाषा आहे.'' ती भाषा शिकू लागलो. काही दिवसांनी पांडूने गुरू केला. त्यांच्या प्रथेप्रमाणं त्याचं नाव पांडू ऐवजी 'साक्षी' ठेवलं गेलं. मग

साक्षीने तिच्या गुरूंना भेटवलं. मी त्यांच्या घरी गेलो. मीही त्यांना गुरू मानून त्यांच्या पाया पडलो.

हे सगळं बघून माझ्यात बदल होत होता. कामाला जाणंही कठीण झालं. मन सगळं हिजड्यांमध्ये रमलं होतं. मी काम सोडून दिलं. आठ ते दहा दिवस मी घरी होतो. मी हिजड्यांसारख्या टाळ्या वाजवायला शिकलो. काम सोडल्यावर माझ्याकडे पैसे नव्हते. दुसऱ्या कुणाला पैसे मागायची लाज वाटायची. साक्षी साडीवर शरीरविक्रीचा व्यवसाय करायची. तिचं बघून मी साडी घातली. आरशात पाहिलं तर माझा विश्वास बसेना, की मी इतकी सुंदर दिसते. साक्षी तर माझ्याकडे पाहातच राहिली. साडी घातली खरी, पण गिऱ्हाइकांना कसं पटवायचं हे माहीत नव्हतं. तरी पहिल्या दिवशी मला सातशे रुपये मिळाले. मला तर विश्वासच बसेना. दिवसेंदिवस त्यात वाढ होत गेली. आम्ही दोघी रात्री ११ वाजता भेटायचो. चहा प्यायचो. साडी घालून मेक-अप करून व्यवसायाला निघायचो. पहिलं गिऱ्हाईक दारू न पिता करायचो, कारण हा साक्षीचा नियम असायचा. पहिलं गिऱ्हाईक झाल्यावर आम्ही दोघी बारमध्ये जाऊन बसायचो. तिथं दारू पिताना तिथं बसलेल्या लोकांकडे बघायचो. मादक अदा करायचो व बसलेल्यांपैकी दोघंतिघं तरी आमच्या मागे यायचे. आम्ही बारमधील गिऱ्हाइकांना जास्त रेट लावायचो. असं करत रात्र घालवायचो व पहाटे चार वाजता साडी काढायचो व पँट-शर्ट घालून घरी जायचो.

दिवसेंदिवस साक्षी खूप दारू प्यायला लागली. सुरुवातीला ती एक वेळा प्यायची, पण आता मात्र ती दिवसरात्र पिऊ लागली. ती दारूमध्ये डुंबून जायची. पुढे तिला क्षयरोग झाला आणि तो खूप वाढला. तिला चालताना थकवा यायचा. खोकला यायचा, बारीक ताप यायचा. त्यामुळे तिने साडी घालून रात्रभर जागरण करणं बंद केलं. मी मात्र रोज

FOR FREE DISTRIBUTION

संध्याकाळी पँट, टी-शर्ट घालून जायचे. दोन-तीन गिऱ्हाइकं करायचे. त्यातून ५० एक रुपयांची तिला दिवसाआड मदतही करायचे.

साक्षीने अंथरूण धरलं. मग तिला दवाखान्यात अ‍ॅडमिट करावं लागलं. तिचे केस वाढलेले होते. नर्सनी केस कापायला सांगितलं. हॉस्पिटलमध्ये तिला वाईट वागणूक मिळाली. मला जाणवलं, की आमच्यासारख्या लोकांना सर्वच ठिकाणी हीन वागणूक मिळते. दोन-अडीच महिन्यांनी ती मरण पावली.

काही दिवसांनी मला काही टीजी भेटल्या. त्या समपथिक ट्रस्ट संस्थेमध्ये काम करत होत्या. त्या म्हणाल्या, ''संती, तू संस्थेत काम कर.'' मी त्यांच्या आग्रहावरून या संस्थेत कामाला लागले. हे लिहितेवेळी मी या संस्थेत आउटरिच वर्कर म्हणून काम करत आहे.

FOR FREE DISTRIBUTION

******

**टीप :** संतीने साडी घातली तेव्हापासून स्त्रीलिंगी शब्दप्रयोग केला आहे. उदा., 'मी आले'.

## परिशिष्ट अ - अधिक वाचन

### • लैंगिकतेचे विविध पैलू

1. **मानवी लैंगिकता-** एक प्राथमिक ओळख
   लेखक : बिंदुमाधव खिरे

### • लिंगभाव/ट्रान्सजेंडर

1. **Gender Outlaw.**
   Kate Bornstein. Vintage Books.
2. **Trueselves. Understanding Transsexualism.**
   Mildred L. Brown and Chloe Ann Rounsley. Jossey-Bass Publishers.

### • समलैंगिकता

1. **इंद्रधनु-** समलैंगिकतेचे विविध रंग. लेखक : बिंदुमाधव खिरे
2. **पार्टनर-** लेखक : बिंदुमाधव खिरे
3. **अंतरंग-** समलिंगी मुलामुलींच्या आत्मकथा
   संकलन : बिंदुमाधव खिरे
4. **मनाचिये गुंती-** समलिंगी मुलामुलींच्या पालकांच्या आत्मकथा
   संकलन : बिंदुमाधव खिरे

FOR FREE DISTRIBUTION

## परिशिष्ट ब - ट्रान्सजेंडर, तृतीयपंथी समाजाबरोबर काम करणाऱ्या काही संस्था

### 1. Samapathik Trust (समपथिक ट्रस्ट, पुणे)

Address : 1004, Budhwar Peth,
Office No. 9, 3rd floor,
Rameshwar Market, Pune 411 002
Phone : (020) 6417 9112
Timings : Monday to Saturday. 10.00 AM to 6.00 PM.
Email : samapathik@hotmail.com
Helpline : 9763640480 (Mondays Only from 7PM to 8PM)
Facebook Page : Samapathik-Trust-Pune
Website : http://www.samapathiktrust.wordpress.com

### 2. The Humsafar Trust (द हमसफर ट्रस्ट, मुंबई)

FOR FREE DISTRIBUTION

Address : Manthan Plaza, 3rd floor,
Nehru Road, Vakola,
Santacruz (East), Mumbai- 400 055
Phone : (022) 26673800
Email : humsafar@vsnl.com
Website : http://www.humsafar.org

### 3(a). Niramaya Arogya Dham, Solapur (निरामय आरोग्य धाम, सोलापूर)

Address :14, Laxmi Park Apartment,
Hotgi Road Corner, Gandhinagar, Solapur.
Phone : (0217) 2601669
Email : bvkinikar@hotmail.com , kinikar.seema@yahoo.co.in
Website : http://www.nad.org.in

### 3(b). Dostana Sangh, Solapur (दोस्ताना संघ, सोलापूर)

Email : dostana696@gmail.com

## 4. Sarathi Trust (सारथी ट्रस्ट, नागपूर)

Address: 140, YMCA Premises,
Opp. Eternity Mall, M. G. road,
Civil Lines, Nagpur.
Phone : (0712) 2560376
Email : sarathitrust_2005@yahoo.co.in

## 5. Pravara Medical Trust's MSM TI, Malegaon (प्रवरा मेडिकल ट्रस्ट, एमएसएम हस्तक्षेप प्रकल्प, मालेगाव)

Address: Sanskar Apartment,Shop No.8,9,
Near Sujan Theatre, Old Agra Road,
Sangmeshwar,
Malegaon-423203.
Phone : (02554) 236136
Email : muktanashikmsm@gmail.com

FOR FREE DISTRIBUTION

"कालांतराने मी बारा-तेरा वर्षांचा झालो. मी मुलींसारखाच वागायचो. मला मुलींसारखे कपडे घालायला खूपखूप आवडत होते. मी स्वतःला एक मुलगा कधीच समजत नव्हतो. घरात कुणी नसताना मी आईच्या बांगड्या घालून पाहायचो. ताईची ओढणी, तिच्या उंच टाचेच्या सॅण्डल्स घालून पाहायचो. का कोण जाणे, पण हे सगळे करण्यामध्ये मला स्वर्गीय आनंद मिळायचा. माझ्यातले हे वेगळेपण माझ्यासमोर बरेच प्रश्न उपस्थित करत होते. आपण असे मुलींसारखे का वागले? आपण का सामान्य मुलांपेक्षा वेगळे? आपल्यासारखे इतरही काहीजण असतील का? जे आपल्याला जाणवते ते चांगले की वाईट? आपल्या अशा वागण्यामुळे आपले भविष्यात चांगले होईल का वाईट?"

FOR FREE DISTRIBUTION

समपथिक ट्रस्ट, पुणे